पाच हजारांची मदत अपुरी; १ लाखांची मागणी

वाशीममध्ये समृध्दी महामार्गावर ठाकरेंच्या शिवसेनाचा एल्गार !

प्रचंड गर्दीने रस्ता व्यापून गेला, नितीन देशमुख पोलिसांच्या ताब्यात; परिसराला छावणीचे स्वरूप

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

आंदोलकांवर सौम्य लाठीचार्ज

वाशिम/प्रतिनिधी- अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या मागणीसाठी समृद्धी महामार्ग रोखणाऱ्या ठाकरे गटाच्या आंदोलनाला वाशिम जिल्ह्यात संघर्षाचे स्वरूप आले. वनोजा परिसरात महामार्गावर उतरून वाहतूक रोखणारे ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख आणि त्यांच्या समर्थकांना हटवताना पोलिसांशी जोरदार झटापट झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. त्यानंतर पोलिसांनी आमदार देशमुख यांना ताब्यात घेतले. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पाच हजारांची मदत अपुरी; एक लाखांची मागणी- अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत शासनाकडून जाहीर करण्यात आलेली पाच हजार रुपयांची मदत अत्यंत अपुरी असल्याची भूमिका ठाकरे गटाने घेतली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना किमान एक लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करत आमदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पुकारण्यात आले.वाशिम जिल्ह्यातील वनोजा येथे समृद्धी महामार्गावर हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनासाठी पोलिसांनी परवानगी नाकारली होती. मात्र, त्यानंतरही आमदार नितीन देशमुख आणि त्यांच्या समर्थकांनी महामार्गावर उतरून वाहतूक रोखली. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला.

आंदोलकांना महामार्गावरून हटवण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला असता दोन्ही बाजूंमध्ये धक्काबुक्की आणि झटापट झाली. परिस्थिती चिघळत असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज करून जमावाला पांगवण्याचा प्रयत्न केला. या कारवाईनंतर आंदोलकांनी शासन आणि पोलिसांविरोधात नाराजी व्यक्त केली.महामार्गावरील आंदोलनादरम्यान पोलिसांनी आमदार नितीन देशमुख यांच्यासह अन्य आंदोलकांवर कारवाई केली. देशमुख यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलन करत असताना पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

दीड हजार पोलिसांचा तगडा बंदोबस्त

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा-सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली होती. वनोजा परिसरासह समृद्धी महामार्गावर तब्बल दीड हजार पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मोठ्या पोलीस बंदोबस्तानंतरही आंदोलनादरम्यान संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. दरम्यान, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना एक लाख रुपयांची मदत देण्याच्या मागणीवरून ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतल्याने या आंदोलनाचे पडसाद आता राजकीय वर्तुळात उमटू लागले आहेत. शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न आणि आंदोलनादरम्यान झालेली पोलिसांची कारवाई यामुळे वाशिममधील राजकीय वातावरण तापले आहे.

शेतकऱ्याचे घर सील केल्याने कडू संतापले

■ हातोडा घेऊन तोडले कुलूप
■ कर्जाचे हप्ते थकल्याने फायनान्स कंपनीची दुष्काळात कारवाई

अकोला/प्रतिनिधीः- दुष्काळामुळे शेतीचे नुकसान, डोक्यावर वाढलेले कर्ज आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबावर अखेर स्वतःच्या घराबाहेर राहण्याची वेळ आली. जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील निंबा गावात गोपाल राठोड यांच्या घरावर कर्ज वसुलीसाठी जप्तीची कारवाई करण्यात आली. महिंद्रा रुरल होम फायनान्स कंपनीकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड थकल्याने न्यायालयाच्या आदेशानुसार घराला सील लावण्यात आले. या कारवाईमुळे राठोड कुटुंबाला रात्र उघड्यावर काढावी लागली. दरम्यान, आमदार बच्चू कडू यांनी गावात पोहोचून घराचे सील तोडत कुलूप उघडले. या घटनेनंतर राठोड कुटुंबीय भावूक झाले. माहिती ⇨(पान २ वर)

बद्रीनाथजवळ ६ जणांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर कोसळले

पायलटसह ६ प्रवाशांचा मृत्यू

चमोला- शुक्रवारी उत्तराखंडमधील जोशीमठजवळ बद्रीनाथहून डेहराडूनला जाणारे एक खासगी हेलिकॉप्टर कोसळले. या अपघातात पायलटसह सहा जणांचा मृत्यू झाला. सर्वांचे मृतदेह सापडले आहेत. हे हेलिकॉप्टर दुपारी सुमारे १:१४ वाजता बद्रीनाथहून डेहराडूनमधील सहस्त्रधारासाठी निघाले होते. जोशीमठ खोऱ्यावरून उडत असताना त्याचा संपर्क तुटला. त्यानंतर ट्रॅकिंग सिस्टीमने त्याचे स्थान गमावले. ही घटना अशा वेळी घडली, जेव्हा उत्तराखंडच्या अनेक भागांमध्ये पाऊस आणि बर्फवृष्टी होत असल्याने हवामान खराब होते. २०१६ ते २०२६ दरम्यान उत्तराखंडमध्ये हेलिकॉप्टरच्या १२ दुर्घटना घडल्या, ज्यात २१ जणांचा मृत्यू झाला. ⇨(पान २ वर)

पोलीस निरीक्षक अरुण साळुंखे यांचा मृत्यू



या अपघातात प्राण गमावलेले अरुण साळुंखे हे बेळगाव जिल्ह्यातील अथाणी तालुक्यातील 'आरताळ' गावचे रहिवासी होते. साळुंखे हे २००७ च्या बॅचचे कर्नाटक पोलीस सेवेतील अधिकारी होते. त्यांनी यापूर्वी दिल्लीत गुप्तचर विभागात सेवा बजावली होती. सध्या ते बंगळुरूच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेत पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. अरुण साळुंखे यांच्या अपघाताची बातमी समजताच आरताळ गावासह संपूर्ण बेळगाववर शोककळा पसरली. साळुंखे यांच्या नातेवाईकांनी अत्यंत भावूक होत सांगितले, 'दुपारी साडेतीनच्या सुमारास अपघाताची माहिती मिळाली. त्या वेळी सुरुवातीला भारतीय सैन्याकडून ते बेपत्ता असल्याचे सांगण्यात आले

मायक्रो फायनान्सला कंटाळून ५ महिलांनी विक्रीला काढली राहती घरे

हिंगोली/प्रतिनिधी- नांदेड आणि लातूर जिल्ह्यांत मायक्रो फायनान्सच्या जाचाला कंटाळून शेतक-यांनी आत्महत्या केल्याच्या घटना ताज्या असतानाच, हिंगोली जिल्ह्यातील वागणुकीला कंटाळून गावातील पाच कर्जदार महिलांनी चक्क आपली राहती घरेच विक्रीला काढली आहेत. काही घरांच्या दरवाजांवर 'मायक्रो फायनान्सचे कर्ज फेडण्यासाठी घर

वाघजळी (ता. सेनगाव) येथे मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कथित सक्तीच्या कर्जवसुलीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कर्जाचे हप्ते थकविल्यामुळे होणा-या सततच्या धमक्या आणि अपमानास्पद विकणे आहे' असे फलकही लावण्यात आले आहेत.लातूर पर्यटन माहिती

राज्यात यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिक आर्थिक संकटात सापडले⇨(पान २ वर)

एफडीएच्या नोटिशीविरुद्ध अभिनेता अजय देवगण मुंबई उच्च न्यायालयात !

मुंबई : 'विमल इलायची'ची जाहिरात केल्याप्रकरणी राज्य अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) बजावलेल्या कारणे दाखवा नोटिशीविरोधात बॉलिवूड अभिनेता अजय देवगण याने शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर ४ नोव्हेंबर रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे.एफडीएद्वारे अजय याला कारणे दाखवा नोटीस बजावली होती. या नोटिशीत, 'विमल इलायची' च्या जाहिराती 'विमल पान मसाला' या महाराष्ट्रात बंदी घातलेल्या च्युएबल उत्पादनाच्या सरोगेट जाहिरातीसाठी पैसे देतात, असा आरोप करण्यात आला आहे. एफडीएने याच जाहितीत अजयसह झळकलेला अभिनेता शाहरुख खान आणि टायगर श्रॉफ यांनाही अशाच प्रकारची कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. अजय याने याचिकेद्वारे एफडीए नियमांमधील तरतुदींच्या घटनात्मकतेला आव्हान दिले आहे.⇨(पान २ वर)



'विमल इलाईची' जाहिरातीत झळकल्याचे प्रकरण

वाघांच्या हल्ल्यांत दोन ठार

चंद्रपूर : जिल्ह्यात मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र झाला असून, शुक्रवारी एकाच दिवशी वाघांच्या हल्ल्यांच्या तीन घटना घडल्या. चिमूर वनपरिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर सिंदेवाही तालुक्यातील धुमणखेडा येथे वाघाच्या हल्ल्यात ७५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला. दुसरीकडे, पोंभुर्णा तालुक्यातील सातारा तुकूम परिसरात वाघाच्या हल्ल्यात गुराखी गंभीर जखमी झाला. या घटनांमुळे जिल्ह्यातील जंगलांलगतच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण आहे.चिमूर उपक्षेत्रातील गदगाव नियतक्षेत्रात शुक्रवारी (३० ऑक्टोबर) दुपारी १.३० वाजताच्या सुमारास पहिली घटना घडली. सदाशिव चिरकटा खडसंग (५५, रा. गरडापार) हे शेताला लागून असलेल्या जंगल परिसरात शौचास गेले होते. यावेळी दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वनविभागाला कळविण्यात आले. हा परिसर ब्रह्मपुरी वनविभागांतर्गत येतो. दुसरीकडे, धुमणखेडा येथे वाघाच्या हल्ल्यात ७५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला. पत्रु रामाजी मेश्राम (रा. धुमणखेडा) असे मृताचे नाव आहे. शुक्रवार, ३० ऑक्टोबर रोजी ⇨(पान २ वर)



अमरावतीमधील एअर इंडियाच्या पायलट अकादमीला डीजीसीएची मंजुरी!

नवी दिल्ली : एअर इंडिया आता स्वतःच्या वैमानिकांना प्रशिक्षण देणार आहे. कंपनीला महाराष्ट्रातील अमरावती येथील बेलोरा विमानतळावर उड्डाण प्रशिक्षण अकादमी सुरू करण्यासाठी नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाकडूनमंजुरी मिळाली आहे. ३४ विमानांनी सुसज्ज असलेल्या या अकादमीचे उद्दिष्ट दरवर्षी अंदाजे १८० व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचे आहे. देशात एखाद्या भारतीय विमान कंपनीने स्थापन केलेली ही पहिली उड्डाण प्रशिक्षण अकादमी असेल.एअर इंडियाने सांगितले की, बेलोरा विमानतळावर १० एकर जागेवर ही अकादमी उभारली जाईल. यामध्ये ३१ सिंगल-इंजिन आणि ३ ट्विन-इंजिन विमाने असतील. व्यावसायिक पायलट बनू इच्छिणाऱ्या तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी या विमानांचा वापर केला जाईल. या अकादमीमध्ये डिजिटल वर्गखोल्या, विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्था आणि एक डिजिटल ऑपरेशन्स सेंटर यांचा समावेश असेल. विमानांच्या देखभालीसाठी एक स्वतंत्र हँगरदेखील असेल. कंपनीने सांगितले की, सुरक्षा आणि कार्यप्रणालीच्या मानकांचे काटेकोरपणे पालन केले जाईल.अकादमीमधील कमर्शियल पायलट लायसन्स प्रशिक्षण कार्यक्रम अंदाजे १८ महिने चालेल. प्रशिक्षणार्थींना एकूण २०० तासांचा उड्डाणाचा अनुभव मिळेल, ज्यामध्ये सिंगल-इंजिन विमानांवर १८५ तास आणि मल्टी-इंजिन विमानांवर १५ तासांचा समावेश असेल. अमरावतीमध्ये वर्षातील ३०० हून अधिक दिवस उड्डाण प्रशिक्षणासाठी अनुकूल हवामान असण्याची शक्यता आहे, ज्यामुळे प्रशिक्षण पूर्ण करणे सोपे होईल. ⇨(पान २ वर)

सेवा, सेवा आणि फक्त सेवा... शेवटच्या श्वासापर्यंत जनतेच्या सेवेतच राहणार

विरोधकांच्या टीकेवर पंतप्रधान नरेंद्र मोदींचं उत्तर

नवी दिल्ली : माझ्या आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत देशातील जनतेची सेवा करत राहणार, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे विधान अत्यंत महत्वाचे आहे. काही दिवसांपूर्वीच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी एका कार्यक्रमात पंतप्रधानांसंदर्भात आक्षेपार्ह विधान केले होते. खर्गे यांच्या या विधानाने देशभरात प्रचंड गदारोळ झाला होता. या पार्श्वभूमीवर, जनतेची सेवा हेच आपले एकमेव ध्येय असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. मोदी म्हणाले, 'मला फक्त दोनच गोष्टी माहीत होत्या; एक म्हणजे जनसेवेतून राष्ट्रसेवा आणि दुसरी म्हणजे गुजरातच्या विकासातून देशाचा विकास! मात्र, हे सर्व कसे करायचे आणि पुढे कसे जायचे? हे तुम्हीच मला शिकवले. आज देशासाठी मी जे काही करू शकलो, त्या यशाचे श्रेय केवळ आणि केवळ माझ्या देशवासीयांना जाते. या प्रवासात तुम्हा सर्वांचेही मोठे योगदान आहे. यासाठी मी तुमचा जन्मभर ऋणी राहीन आणि माझ्या आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत मी तुमच्याच सेवेत कार्यरत राहीन. सेवा, सेवा आणि फक्त सेवा... देशवासीयांची सेवा आणि तुम्हा सर्वांची सेवा.'



१४००० कोटींच्या विकास प्रकल्पांचे लोकार्पण - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यातील भिलडी येथे 'भारत बोवाइन ब्रीडिंग अँड रिसर्च सेंटर' चे उद्घाटन केले.⇨(पान २ वर)

'ई केवायसी' न झालेल्या लाडक्या बहिणींनाही १५००

मुंबई/प्रतिनिधी- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेविषयी महत्वाची माहिती राज्यातील ८१ लाख लाडक्या बहिणींना दिवाळी गिफ्ट मिळू शकते. काही कारणास्तव त्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. यामध्ये आदिवासी आणि गरीब कुटुंबातील महिलांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता. या महिलांना लवकरच १५०० रुपयांचा सन्माननिधी मिळू शकतो. या महिलांना १५०० रुपयांचा हप्ता मिळवून देण्याची हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर कष्टकरी, शेतक-यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करताना फडणवीस यांनी हे आश्वासन दिल्याची माहिती समोर येत आहे.अखिल भारतीय किसान सभेने कष्टकरी, शेतकरी यांचा न्याय मागण्यासाठी मोर्चा काढला. हा मोर्चा मुंबईकडे निघाला असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोर्चेक-यांच्या शिष्टमंडळाला भेटीस बोलावले होते. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहावर शिष्टमंडळासोबत साधकबाधक चर्चा झाली. ⇨(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

पान १ व १० वरून

शेतकऱ्याचे घर सील केल्याने

नुसार निंबा गावातील गोपाल राठोड यांनी महिंद्रा रुरल होम फायनान्स कंपनीकडून एक लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, दुष्काळामुळे शेतीचे नुकसान झाल्याने त्यांच्या समोर आर्थिक संकट उभे राहिले. शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने कर्जाची परतफेड करणे कठीण झाले.राठोड यांनी घेतलेल्या एक लाख रुपयांच्या कर्जापैकी ४४ हजार रुपये परत केले होते. मात्र, उर्वरित कर्जाची परतफेड थकल्याने त्यांच्या घरावर जप्तीची कारवाई करण्यात आली. न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित कंपनीकडून घराला सील लावण्यात आले. त्यामुळे स्वतःच्या घरात राहणाऱ्या राठोड कुटुंबाला अचानक घराबाहेर राहण्याची वेळ आली.

कंपन्यांविरोधात आपला हातोडा तयार – बच्चू कडू

गरजू कुटुंबांना त्रास दिला, तर अशा कंपन्यांविरोधात आपला हातोडा तयार असेल, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला. शेतकऱ्यासोबत असे घडल्याचे कळताच, त्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी त्याच्या घरी जायचे आणि त्या घराचे कुलूप तोडायचे हे ठरवले. हे शेतकरी गेल्या दोन ते तीन दिवसांपासून कुटुंबासह बाहेर झोपले. कुटुंबात लहान मुली आहेत. दुष्काळाचे गंभीर संकट आहे. हा शेतकरी शेत विकायला तयार होता, पण त्याला कोणीही घेत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी कायदा हातात घेतला, असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले. ६० टक्के दिव्यांग असलेले गोपाल राठोड यांच्या डोक्यावरील आधी वडिलांचे छत्र हरपले, नंतर मुलाचाही मृत्यू झाला. आर्थिक संकटामुळे कर्जाचे हप्ते थकले अन् फायनान्स कंपनीने घराला सील लावले. ज्या घरात आयुष्याच्या आठवणी जपल्या, त्याच घराच्या दारात दोन दिवस उघड्यावर राहण्याची वेळ आली. कर्ज थकले म्हणून माणुसकीही संपली का? गरीब, दिव्यांगाच्या डोक्यावरचे छप्पर हिरावून घेणे हा कसला न्याय? असे प्रश्न बच्चू कडू यांनी केले आहेत.

एफडीएच्या नोटिशीविरुद्ध

तसेच, एफडीएने बजावलेली ही नोटीस निर्मात्या कंपनीला न देता त्यात काम केले म्हणून थेट आपल्याला मनमानी पद्धतीने बजावण्यात आल्याचा दावा केला आहे. याआधी, पीबी ?ग्रो या उत्पादनाच्या उत्पादकाने ऑगस्टमध्ये नोटीस रद्द करण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तथापि, दिल्ली उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली होती आणि त्यात प्रादेशिक अधिकार क्षेत्राचा अभाव असल्याचे नमूद केले होते. त्याचवेळी, महाराष्ट्रातील कथित कारवायांबाबत मुंबई एफडीएने केलेल्या कृतींशी संबंधित वादांसाठी तेथील न्यायालयेच योग्य मंच असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. या पार्श्वभूमीवर, अजय याने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

वाघांच्या हल्ल्यांत दोन

सायंकाळी ही घटना उघडकीस आली. मेश्राम हे दुपारी दोनच्या सुमारास शेतातील धानपिकाची पाहणी करण्यासाठी गेले होते. सायंकाळपर्यंत घरी न परतल्याने कुटुंबीय व ग्रामस्थांनी शोध सुरू केला. शेतात त्यांचा चष्मा, काठी, चप्पल आणि रक्ताचे डाग आढळले. वनविभागाच्या पथकाने शोध घेतला असता प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ त्यांचा मृतदेह आढळला. वाघाने त्यांना फरफटत नेऊन ठार केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यापूर्वी २४ ऑक्टोबरला पळसगाव येथे नानाजी कामडी, तर २५ ऑक्टोबरला भेंडाळा येथे अंगणवाडी सेविका प्रेमिला महाडोरे यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता.

बद्रीनाथजवळ ६ जणांना घेऊन

बचाव पथक डोंगर चढत आहे-SDRF चे पथक मदत आणि बचाव कार्य करण्यासाठी डोंगर चढत आहे. डीएसपी मदन सिंग बिष्ट यांनी सांगितले की, घटनेची माहिती गोळा केली जात आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नंदकिशोर जोशी यांनी सांगितले की, जेपी धरणाच्या वरील जंगलात एका पांढऱ्या वस्तूला आग लागल्याची माहिती मिळाली आहे. तपासणीसाठी अतिरिक्त हेलिकॉप्टर पाठवण्यात आले आहेत. हे हेलिकॉप्टर ट्रान्स भारत एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेडचे होते. हेलिकॉप्टरमध्ये पायलट कॅप्टन हिमांशू, प्रताप, अरुण, शंकर गौडा, सुधीर के. आणि एच.एस. नटराज यांच्यासह पाच प्रवासी होते. या अपघातानंतर, खबरदारीचा उपाय म्हणून ट्रान्स भारत एव्हिएशनची सर्व हेलिकॉप्टर्स थांबवण्यात आले आहेत. केंद्र सरकारच्या माहितीनुसार, २०२० ते जुलै २०२५ या कालावधीत उत्तराखंडमध्ये ७ हेलिकॉप्टर दुर्घटना घडल्या असून, त्यात २१ जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, २०२३ ते २०२५ या काळात ६ हेलिकॉप्टर दुर्घटना घडल्या आहेत. राज्यात आतापर्यंत बेपत्ता झालेल्या हेलिकॉप्टरच्या संख्येबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. ही घटना घडल्यानंतर जोशीमठ आणि पांडुकेश्वर येथील एसडीआरएफची पथके संबंधित ठिकाणाच्या दिशेने रवाना झालेले आहेत असे वृत्तात म्हटले आहे.नकाशे पहा

हेलिकॉप्टर कोसळल्याची घटना दुर्दैवी : मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी

या घटनेवर प्रतिक्रिया देताना उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी म्हटले की जोशीमठजवळील चाई गावाजवळ हेलिकॉप्टर कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि एसडीआरएफ यांच्या संयुक्त विद्यमाने बचाव कार्य सुरू आहे. मी स्वत: संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या व्यक्तींना उपचारांसाठी तातडीने हवाई मार्गे हलवण्याचे निर्देश दिले आहेत. मी देवाकडे सर्व प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करतो असे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

मायक्रो फायनान्सला कंटाळून ५ महिलांनी

आहेत. शेतीतून उत्पन्न मिळत नाही. परिणामी कर्जाचे हप्ते भरणेही अशक्य झाले आहे. अशा परिस्थितीत शासनाने दुष्काळी भागात कर्जवसुलीसाठी सक्ती करू नये, असे निर्देश दिले असतानाही काही मायक्रो फायनान्स आणि खासगी वित्तीय संस्थांकडून वसुलीसाठी दबावतंत्राचा वापर होत असल्याचा आरोप आहे. वाघजळी गावातील जवळपास ७० ते ८० नागरिकांनी विविध फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतले आहे. यामध्ये बचत गटांच्या माध्यमातून घेतलेल्या कर्जांसह वैयक्तिक, शेती आणि व्यावसायिक कर्जांचाही समावेश आहे. मात्र, आर्थिक परिस्थिती खालावल्याने कर्जदारांना हप्ते भरणे कठीण झाले आहे. त्यातच वसुलीसाठी येणारे कर्मचारी वारंवार फोन करून धमकावत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. काही वेळा रात्री उशिरापर्यंत कर्जदारांच्या घरात बसून राहण्याचे प्रकारही घडत आहेत.धम्मरत्न मोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मीनाबाई धम्मरत्न मोरे यांच्याकडे ८० हजार ते एक लाख रुपये, रेखाबाई प्रकाश मोरे यांच्याकडे एक ते सव्वा लाख रुपये, नंदाबाई सिद्धार्थ मोरे यांच्याकडे ७० ते ९० हजार रुपये, दीपाली समाधान मोरे यांच्याकडे ९० हजार ते एक लाख रुपये, तर चंद्रभागाबाई संजय मोरे यांच्याकडे ९० हजार ते एक लाख रुपयांचे कर्ज आहे. कर्जफेडीसाठी सातत्याने तगादा लावला जात असल्याने या महिलांनी राहती घरे विक्रीला काढल्याचे समोर आले आहे.

दिव्यांग कर्जदारही वसुलीच्या जाचात-वर्षभरापूर्वी विदर्भातील एका फायनान्स कंपनीकडून दोन लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. मी दिव्यांग असून, दुष्काळामुळे सध्या उत्पन्नाचे कोणतेही साधन राहिलेले नाही. तरीही कंपनीचे कर्मचारी रात्री नऊ वाजेपर्यंत घरी येऊन बसून राहतात. गावातील ७० ते ८० महिलांनी विविध फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतले आहे. दुष्काळी परिस्थितीत हप्ते भरणे शक्य नसतानाही वसुलीसाठी दबाव आणला जात आहे अशी व्यथा धम्मरत्न मोरे यांनी मांडली.

अभिलेखे सादर करण्याचे निर्देश-या प्रकरणाची दखल घेत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने जिल्ह्यातील मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून कर्जवाटप आणि वसुलीविषयक माहिती मागविली आहे. कंपन्यांनी किती कर्जवाटप केले, कोणत्या नियमांनुसार कर्ज दिले आणि वसुलीची पद्धत काय आहे, यासंदर्भातील अभिलेखे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नियमांचे उल्लंघन किंवा कर्जवसुलीसाठी सक्तीचा अवलंब होत असल्याचे आढळल्यास तत्काळ कारवाई केली जाईल, असे जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुपाटे यांनी स्पष्ट केले आहे.

सोमवारी बैठक घेणार : जिल्हाधिकारी

वागजळी गावातील काही महिलांनी कर्ज घेतले होते. ते वसूल करण्यासाठी त्रास होत असल्याने त्यांनी घर विक्रीला काढले आहे, अशी माहिती कळाल्यानंतर सोमवारी या कंपन्यांच्या प्रतिनिधींबरोबर बैठक घेणार आहे. यातून कसा मार्ग काढता येईल ते ठरवू असे हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

अमरावतीमधील एअर इंडियाच्या

नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाच्या मते, देशाला पुढील दशकात अंदाजे ३०,००० अतिरिक्त वैमानिकांची आवश्यकता भासू शकते.

ही अकादमी गुरुग्राममधील एअर इंडियाच्या प्रशिक्षण अकादमीला पूरक ठरेल. ही अकादमी ६,००,००० चौरस फूट परिसरात पसरलेली आहे. कंपनीचा दावा आहे की ही दक्षिण आशियातील सर्वात मोठी विमानचालन प्रशिक्षण संस्था आहे. एअर इंडियाने म्हटले आहे की, या दोन सुविधांमुळे विमानचालन क्षेत्रातील प्रतिभा आणि पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक अधिक मजबूत होईल, ज्यामुळे देशात एक आत्मनिर्भर विमानचालन परिसंस्था निर्माण होईल. तरुणांना परदेशात प्रवास न करता भारतातच जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळेल.

सेवा, सेवा आणि फक्त सेवा.

यावेळी त्यांनी सुमारे १४००० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे लोकार्पण आणि पायाभरणी केली. याच कार्यक्रमादरम्यान त्यांनी 'प्रधानमंत्री किसान सम्मान निधि' योजनेचा २४ वा हप्ताही जारी केला. या अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६००० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते.

ई केवायसी न झालेल्या

या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि पाच महत्त्वाच्या खात्याचे मंत्री हजर होते. तसेच विविध विभागाचे सचिवही उपस्थित होते. शेतक-यांच्या अडीअडचणीसोबतच किसान सभेने लाडक्या बहिणींचा मुद्दा उपस्थित केला. राज्यातील अनेक महिलांना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करता न आल्याचा मुद्दा हिरारीने मांडला. तांत्रिक अडचणी समोर आणल्या.

मुख्यमंत्र्यांचे मोठे आश्वासन-शिष्टमंडळाशी चर्चेदरम्यान मुख्यमंर्त्यांनी ई-केवायसी रखडलेल्या, प्रलंबित महिलांना दिलासा दिला. कागदपत्रांची पूर्तता केली नाही अथवा ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही अशा सर्व पात्र महिलांच्या बँका खात्यात पैसे जमा करण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले. जवळपास ८१ लाख महिलांची तांत्रिक अडचण दूर करण्यात येईल अशी हमी मुख्यमंत्र्यांनी दिली. यामुळे या महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रशासनाला तातडीने याप्रकरणी अंमलबजावणीचे निर्देशही देण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

पोर्टल लवकरच सुरू होणार- 'ई केवायसी' अभावी आर्थिक लाभापासून वंचित ८१ लाख लाडक्या बहिणींना पुन्हा योजनेत समावून घेण्यात येणार आहे. केवायसी प्रक्रिया सुरू ठेवण्यात येणार आहे. सध्या बंद असलेले पोर्टल पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. ज्या लाडक्या बहिणींची केवायसी प्रक्रिया झालेली नाही. अथवा ज्यांची केवायसी प्रक्रिया होऊनही त्यांना सन्माननिधी मिळत नसेल. त्यांना तो लगेच मिळण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळणार आहे.

लाखो गुरुदेवभक्तांची राष्ट्रसंत

दि.११ ऑक्टोबर १९६८ साली) सायंकाळी ४ वाजून ५८ मिनिटांनी आजच्या दिवशी झाले होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना त्यांच्या विचारांचे सर्वधर्म पंथातील गुरुदेव प्रेमी व भाविक भक्त या दिवशी गुरुकुंज आश्रमात येऊन श्रद्धांजली अर्पण करितात. मागील ५७ वर्षापासून हा सोहळा गुरुकुंज आश्रमात अविरतपणे होत आहे.

मौन श्रद्धांजलीच्या मुख्य कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी महाद्वारावरील घंटीचा गजर करण्यात आला. नंतर मुख्य मंडपात शंखनाद करण्यात आला. नंतर दुपारी ३ वाजता गुरुदेव हमारा प्यारा या अर्चनागीताने मौन श्रद्धांजलीच्या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी राष्ट्रसंतांच्या भव्यदिव्य विश्वव्यापक कार्याची माहिती शब्द सुरांच्या माध्यमातून लाखो जनसमुदायाला करुन दिल्या गेली. यामध्ये 'तुम बिन कौन है? अब नाथ तारलो', 'हम भारत की शान है', सच्चे सेवक बनेंगे हम', 'जन्मोजन्मी हेची देई। विठोबाई माझे आई' इत्यादी भजनांचा समावेश होता.

मोबाइलवर संदेश अन्

सुरळीत असल्याचे वाटत होते. मात्र, सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास त्यांच्या मोबाइलवर बँक व्यवहाराचा संदेश आला. खात्यातून ४९ हजार ९९९ रुपये ९२ पैसे कपात झाल्याचे त्यात नमूद होते. हा संदेश पाहताच मोरे यांना धक्का बसला. त्यांनी स्वतःहून कोणालाही पैसे पाठविले नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर त्यांनी संबंधित बँकेकडे व्यवहाराची माहिती दिली आणि सायबर पोलिसांकडेही तक्रार नोंदविली. पुढे या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वृद्ध नागरिकांनी अनोळखी फोन, संदेश किंवा बँक खात्याशी संबंधित माहिती मागणाऱ्या व्यक्तींपासून सावध राहण्याची आवश्यकता आहे.

आमदाराच्या कार्यालयातून शासकीय

नेमका का लंपास केला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ही चोरी केवळ आर्थिक फायद्यासाठी करण्यात आली की कार्यालयातील काही महत्त्वाची कागदपत्रे किंवा माहिती मिळविण्याचा अथवा नष्ट करण्याचा उद्देश होता, याबाबत आता चर्चा सुरू झाली आहे.

लोकप्रतिनिधींच्या कार्यालयातच चोरी होणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. विशेषतः शासकीय कागदपत्रे आणि नागरिकांच्या निवेदनांची चोरी झाल्याने या प्रकरणाचा तपास अधिक गांभीर्याने होण्याची गरज आहे. पोलिसांच्या तपासातून चोरीमागील नेमका उद्देश, चोरट्यांची ओळख आणि चोरीला गेलेल्या साहित्याचा शोध लागणार का, याकडे दर्यापूरकरांचे लक्ष लागले आहे पुढील तपास दर्यापूर पोलीस करत आहे.

तुरीला पाणी देताना

मृतदेह शवविच्छेदनासाठी चांदूरबाजार ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला असून, पोलिसांनी सध्या मर्ग दाखल केला आहे. शवविच्छेदनाचे अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. अर्पितच्या अचानक मृत्यूमुळे त्याच्या मूळ गावात हळहळ व्यक्त होत आहे.

अवैध रेतीसाठा आणि

गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे, तर दोघे फरार आहेत. २९ ऑक्टोबर रोजी गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली की, गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राजपूत ढाबा ते लालखडी रोडवरील व्हॅली लॉनजवळ एका ट्रकमधून अवैधरित्या रेतीची वाहतूक केली जात आहे. या माहितीच्या आधारे पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मंडळ अधिकारी आणि तहसील कार्यालयाच्या पथकाच्या उपस्थितीत १४ चाकी ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये अंदाजे ५६ हजार किलो (५६ टन) रेती आढळून आली. रेती वाहतुकीसंदर्भात आवश्यक परवानगी नसल्याचे आढळल्याने ट्रकसह रेती जप्त करण्यात आली. या प्रकरणात जेनुल आबेदीन अब्दुल कयुम (वय ३६, रा. पोरगव्हाण, ता. मोर्शी), शफिक खान रफीक खान (वय ५९, रा. अलीमनगर, कब्रस्थानजवळ, अमरावती), रिजवान हुसेन शौकत हुसेन (वय ४३, रा. अन्सारनगर, अमरावती) आणि अब्दुल अलिम अब्दुल गणी (वय ३०, रा. मस्केट दवाखान्याजवळ, अमरावती) यांच्याविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील रिजवान हुसेन आणि अब्दुल अलिम हे दोघे फरार असल्याची माहिती आहे.

पोलिसांनी एमएच २७ बीएक्स ९१२३ क्रमांकाचा २२ लाख रुपये किमतीचा ट्रक आणि अंदाजे ५६ टन रेती, किंमत १ लाख ८०० रुपये, असा एकूण २३ लाख ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, शाम घुगे, प्रांजल सोनवणे (मुख्यालय) आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांनी केली.

ई-बाइक डिलरशिपचे

ई-बाइक कंपनीच्या वेबसाइटवर डिलरशिपसंदर्भातील जाहिरात दिसली. जाहिरातीतील माहितीनुसार त्यांनी ऑनलाइन अर्ज भरला. त्यानंतर त्यांच्या ई-मेलवर कंपनीकडून संपर्क साधण्यात आला. आवश्यक कागदपत्रे पाठविण्याची सूचना करण्यात आली. ई-मेलमध्ये संपर्कासाठी मोबाइल क्रमांक आणि एक लिंकही देण्यात आली होती. मात्र, संबंधित लिंक उघडत नव्हती. तरीही डिलरशिप मिळण्याच्या अपेक्षेने झंवर यांनी मागविलेली सर्व कागदपत्रे ई-मेलद्वारे पाठविली. काही काळानंतर त्यांना अर्ज मंजूर झाल्याचा संदेश मिळाला. डिलरशिप प्रक्रियेसाठी एक लाख ७७ हजार रुपये प्रोसेसिंग फी भरावी लागेल, असे त्यांना सांगण्यात आले. त्यानुसार त्यांनी संबंधित रक्कम पाठविली. पैसे भरल्यानंतर त्यांच्या ई-मेलवर कंपनीच्या नावाने पेमेंट इनव्हाइस प्राप्त झाले. मात्र, संपूर्ण व्यवहाराबाबत संशय निर्माण झाल्यानंतर त्यांनी आपली फसवणूक झाल्याचे ओळखले. त्यानंतर त्यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

एमआयडीसीत बिबट्याचा

निर्माण झाला आहे. जुना बायपास रोडवरील एमआयडीसी परिसरात अनेक कारखाने रात्री उशिरापर्यंत सुरू असतात. एक्स्प्रेस महामार्गालगत असलेल्या एफ-४९ येथील गोविंद कृपा उद्योग या दालमिलमध्येही सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत कामकाज सुरू असते. बुधवारी मध्यरात्री एक्स्प्रेस महामार्ग ओलांडून एक बिबट्या थेट या दालमिलच्या परिसरात घुसला. तेथे दबा धरून त्याने एका कुत्र्याची शिकार केली. यावेळी दुसऱ्या कुत्र्याने बिबट्याचा प्रतिकार करण्याचा आणि त्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र, शिकार तोंडात धरून बिबट्याने तेथून पळ काढला. या घटनेने परिसरातील वन्यप्राण्यांच्या वावराचा धोका अधोरेखित झाला. बुधवारच्या घटनेनंतर गुरुवारी मध्यरात्री १ वाजून ३ मिनिटांनी बिबट्या पुन्हा त्याच दालमिलमध्ये दाखल झाला. विशेष म्हणजे, आदल्या दिवशी ज्या ठिकाणी त्याने कुत्र्याची शिकार केली होती, त्याच परिसरात तो पुन्हा पोहोचला. यावेळी शिकार न मिळाल्याने त्याने मिलजवळील झाडाशेजारी काही काळ ठाण मांडले. आजूबाजूला नजर फिरवत संपूर्ण परिसरात फेरफटका मारला. बराच वेळ भटकंती केल्यानंतर तो तेथून निघून गेला. दोन दिवसांपासून बिबट्याचा वावर सीसीटीव्हीत कैद होत असतानाही त्याच्या बंदोबस्तासाठी वनविभागाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात आणि कामगारांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी उद्योजक व कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

आमदार गायकवाड यांचे

अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.एकनाथ शिंदे यांनी संजय गायकवाड यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी माजी खासदार फौजिया खान यांनी यावेळी केली.

देवडी रस्ता डांबरीकरणाच्या

व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

२९ ऑक्टोबर रोजी अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांनी या भागाची पाहणी सुद्धा केली होती . पण आता आश्वासन नको तर डांबरीकरण या रस्त्याचे तात्पुरत्या स्वरूपात सुरू करण्याची मागणी व्यापारी वर्गाकडून करण्यात आली होती . दरम्यान याबाबत अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांच्याशी संपर्क केला असता , त्यांनी मीटिंग मध्ये उपस्थितीत असल्याने यावर माहिती घेऊन प्रतिक्रिया देणार असल्याचे सांगितले .

यावेळी प्रहार चे बल्लू जवंजाळ,स्वीकृत नगरसेवक अभय माथने, नील महेश्वरी, नितीन आखुड,गजू दीक्षित ,नगरसेवक चिंटू बहोरिया ,बांधकाम विभागाचे अभियंता मनिष शर्मा , गोपाल खोलापुरे, सुभाष अग्रवाल , आशिष अग्रवाल ,आतिश सुंडेवाले, रोहित शर्मा, सुपार्ष डागा,साकेत खंडेलवाल ,अनिकेत मिश्रा आदी उपस्थितीत होते.

देवडी परिसरातील मुख्य रस्त्या संदर्भात नगर परिषद प्रशासनाने नागरिक व व्यापाऱ्यांशी समन्वय साधून रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे. मतदारसंघातील शहरी व ग्रामीण भागाच्या सर्वागीण विकासासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत.

-आ.प्रवीण तायडे,अचलपूर

अचलपूर - परतवाडा जुळ्या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आमचे प्रयत्न सुरू आहे.अचलपूर शहरातील देवडी रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट काँक्रीटीकरण कामासाठी सर्व शासकीय प्रक्रिया राबविली जात आहे. काल देवडी परिसरातील व्यापाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तत्काळ तात्पुरत्या स्वरूपात या रस्त्याचे डांबरीकरण केले जाणार आहे.

- रुपाली अभय माथने,नगराध्यक्ष अचलपूर

चोरीच्या उद्देशाने फिरणारा

पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. बसस्थानकासमोरील कौशल्य मोबाईल शॉपी परिसरात एक संशयित इसम फिरताना आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने विक्रम कृपाप्रसाद नादणे (वय २६, रा. वाकी रायपूर, ता. भातकुली, जि. अमरावती) असे नाव सांगितले.

त्याची अंगझडती घेतली असता एक लोखंडी रॉड, ओपो कंपनीचा मोबाईल आणि काळ्या रंगाची स्प्लेंडर दुचाकी (क्र. एमएच २७ एएक्स ३६५६) आढळून आली. दुचाकीबाबत विचारपूस केली असता ती धामणगाव रेल्वे येथील दत्तापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरी केल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी दत्तापूर पोलीस ठाण्यात यापूर्वीच गुन्हा क्रमांक ३२५/२०२६, कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल आहे. दरम्यान, बडनेरा परिसरात चोरीच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या फिरताना आढळल्याने विक्रम नादणे याच्याविरुद्ध बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा कलम १२२ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI
No.SGBAU/8/C-2605/2026 DATE: 23/10/2026

Name of Society: Hanuman Gramvikas Pratishthan, Hingana Kumbhari, Dist-Akola.

Name of the College: Shri Ganesh Arts College, Kumbhari, Dist-Akola.

WANTED

Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology/ Humanities/ Commerce & Management/ Interdisciplinary Studies.

Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes

Sr. No.	Name of the Post	Subject/Course	No. of Posts	Category as per NOC on Dt.05/06/2025
01	Principal	----	01	Open

For Qualifications/Experience/Pay Scale and other details/conditions visit university website www.sgbau.ac.in and College website www.sgac.ac.in

Application be submitted to President, Hanuman Gramvikas Pratishthan, C/o. Prakash H.Birkad, Shastri Nagar, Amankha Plot, Opp.Dr. Lole Hospital, Akola-444 001 (M.S.) on or before 15/11/2026.

(Prakash Birkad)
President
Hanuman Gramvikas Pratishthan,
Hingana-Kumbhari.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.ए.बी.कटट्े सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१५००/२०२६
लिलाबाई व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.३०.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार
1. Lilabai Manohar Awaghad, **Age 77 yrs. Occ.- Household W/o. Manohar Awaghad, Sai Vihar Near Moti Garden Moti Nagar, Amravati**
2. Pratibha Manohar Awaghad, Sau. Pratibha Sanjay Kale (after Marriage) **Aged 52 yrs. Occ.- Private Job R/o. C/o. 11-B, Ma Jijau Colony, Near SSD Banglow, Arjun Nagar, PO. Shivaji Nagar, Tq. Dist. Amravati**
3. Jayashri Manohar Awaghad, Sau. Jayashri Pradip Dakhole (after marriage) **Age 51 yrs. Occ.- Job R/o. Moti Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati**
4. Amol Manohar Awaghad **, Age 45 yrs. Occ.- Doctor R/o. Near Prashant Nagar, Ram Nagar, Rukhmini Nagar, Tq. & Dist. Amravati**
5. Bhagyashri Manohar Awaghad, **Sau. Bhagyashri Ankaj Ramekar (after Marriage) Age 42 yrs. Occ.- Privage Job R/o. Near Moti Garden Moti Nagar, Amravati**

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत मनोहर शामराव अवघड **हे दिनांक** १७.१०.२०२५ **रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार** लिलाबाई व इतर विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा लिलाबाई व इतर विरुध्द निरंक **वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

आज दि.२८.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

Civil Surgeon, Akola, Government of Maharashtra
- NOTICE FOR TENDER -

Procurement of Medicine, Surgical, Pathology Reagents and small Instruments 2026-27 Civil Surgeon Akola invites proposals from reputed and experienced companies/ firms to participate in the competitive bidding process to Procurement of under dpc -2026-27 scheme for WH.SDH RH in Akola district.

For the detailed tender document, interested bidders should visit.
http://mahatenders.gov.in
Last Date to submit Bid is 06/11/2026

Dr. Arati Kulwal
Civil Surgeon, Akola
Govt. of Maharashtra

वि.मा.का./अम./जाहि./५६८/२०२६-२०२७

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.५२६/२०२६ ने.ता.०७.१२.२०२६

अर्जदार :
१. गुणवंत पुंजाजी खोडे, **वय ७१ वर्षे, धंदा- सेवानिवृत्त रा.कोल्हे दळण केंद्र, जलाराम नगर, अमरावती, ता.जि.अमरावती**
२. सुनंदा गोपाळराव खोडे, **वय ५७ वर्षे, व्यवसाय - घरकाम**
३. गिरीश गोपाळराव खोडे, **वय ३५ वर्षे, व्यवसाय - मजुरी**
४. रोहित गोपाळराव खोडे, **वय ३१ वर्षे, व्यवसाय - मजुरी**
अर्जदार क्र.२,३ व ४ रा.माळीपुरा, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

इंडियन सक्सेशन ॲक्टचे कलम ३७२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. पार्वताबाई पुंजाजी खोडे **यांचा** मृत्यू दि.१०/०५/२०१२ **रोजी तसेच** गोपालराव पुंजाजी खोडे यांचा मृत्यू दि.०३/०१/२०२५ **रोजी तसेच पुंजाजी बापुजी खोडे यांचा मृत्यू दि.३१/०१/१९८५ रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.**

पार्वताबाई पुंजाजी खोडे यांचे स्टेट बॅक बचत खाते क्र.११५९०७५४४२० **असुन त्यामध्ये** रुपये ८३,६८४/- (एकुण त्र्याऐंशी हजार सहाशे चौ-यांऐशी रुपये फक्त) **इतकी रक्कम जमा आहे.**

अर्जदारांना सदर रक्कम मिळण्याकरिता तसेच इतर कार्यालयीन कामाकरिता वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.५२६/ २०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२६.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

जाहीर नोटीस

याव्दारे सर्व संबधित व्यक्ती, हक्कदार, हितसंबंधित व्यक्ती व जनतेस कळविण्यात येते की, मौजे शेगाव, प्रगणे-नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती येथील सर्वे क्र.१४,२९ मधील लेआउट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील प्लॉट क्र. २५ याचे एकूण क्षेत्रफळ ५०१.६७ चौ.मी.(५४०० चौ.फुट) येथील मिळकतीच्या अभिलेखांबाबत मा.तहसिलदार साहेब अमरावती यांच्या न्यायालयात ज्योती देशमुख विरुध्द तलाठी, शेगाव अमरावती हे प्रकरण सुरु आहे. सदर मिळकतीचे एकूण क्षेत्रफळ ५०१.६७ चौ.मी.असून,त्यापैकी २३०.०० चौ.मी.क्षेत्राच्या ७/१२ महसुली अभिलेखावर माधव गणपतराव विरखरे, नागोराव गणपतराव विरखरे व पांडूरंग गणपतराव विरखरे यांची नावे नोदविली आहेत. तथापी अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदर नोदीसंबंधी फेरफार नोंद अथवा आदेश उपलब्ध नसून, सदर मिळकत श्री प्रल्हाद नामदेवराव जगताप यांची दिनांक १२/०७/१९७८ रोजीच्या अनु.दस्त.क्र. २०४४/१९७८ नोंदणीकृत खरेदीखताव्दारे खरेदी केली आहे. तसेच संबंधित मिळकतीबाबत भूमिअभिलेख कार्यालयातील प्रॉपटी कार्डवरील नोंदीची पडताळणी करण्यात आलेली असून त्यावर श्री प्रल्हाद नामदेवराव जगताप यांच्या वारसांची नोंद आहे. मूळ अर्जदार यांनी प्लॉट क्र. २५, संबंधित ७/१२ महसुल अभिलेखांतील नोंदीबाबत अर्ज दाखल केलेला आहे. पत्र क्र. ११०८/२०२६ दिनांक २७/०३/२०२६ नुसार संबंधितांना नोटिस काढल्या होत्या परंतु ते उपस्थित राहिले नाही.

त्याअर्थी सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, बोजा,हक्क, हितसंबंध, वारसाहक्क व ईतर कोणतीही भानगड असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास , इतर अधिकार जे कायदेशिररित्या अडथळा करतील असे व्यवहार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ (सात) **दिवसाच्या आत मा.तहसिलदार, साहेब अमरावती यांचे न्यायालयात, सदर प्रकरण मध्ये उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे, तथापि ही नोटीस कोणत्याही व्यक्तीचा मालकीहक्क अंतिमतः ठरविणारी नसून, सबंधित व्यक्तीना आपली बाजू मांडण्यासाठी संधी देण्यासाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.**

करिता ही जाहीर नोटीस करत आहे.

सही/-
(ॲड.निलेश ज.पुंड)
अर्जदार यांचे अधिवक्ता
१०२, गजानन अपार्टमेंट, मोहन कॉलनी अर्जुन नगर, अमरावती
मो.नं.- ८४२१७२२१११

दिनांक :- ३०/१०/२०२६
ठिकाण :- अमरावती

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

समृद्धी महामार्गावर पोहोचण्यापूर्वीच आंदोलकांना रोखले

आमदार नितीन देशमुखांसह पदाधिकारी पोलिसांच्या ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोला/ वाशिम ■

दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत देण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी शुक्रवारी (३० ऑक्टोबर) वाशिमच्या मंगरुळपीर तालुक्यातील बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या वनोजा येथिल अकोला–आर्णी इंटरचेंज परिसरात रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शेतकऱ्यांसह उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

हेक्टरी एक लाख रुपये मदतीच्या मागणीसाठी रास्तारोको आंदोलन

पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त, कार्यकर्त्यांची धरपकड, रोखण्याचा इशारा

दरम्यान, आंदोलक महामार्गावर पोहोचण्यापूर्वीच पोलिसांनी त्यांना रोखले. यावेळी आंदोलन आणि पोलिसांमध्ये काही वेळ झटपट झाल्याचेही पाहायला मिळाले यानंतर पोलिसांनी आमदार नितीन देशमुख यांच्यासह काही पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. दरम्यान, शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही, तर पुढील टप्प्यात विदर्भातून जाणारी रेल्वे रोखण्यात येईल, असा इशारा आमदार नितीन देशमुख यांनी दिला आहे.

वनोजा इंटरचेंज परिसरात आयोजित सभेला आमदारांसह अमरावती विभागातील विविध जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष उपस्थित होते. यावेळी लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांनी दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकटाची विदारक परिस्थिती मांडली. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान, आर्थिक अडचणी आणि शेती व्यवसायासमोरील वाढती आव्हाने यामुळे शेतकरी हवालदिल झाला असल्याचे सांगण्यात आले. शासनाने शेतकऱ्यांच्या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनासाठी आलेल्या शेतकरी, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसाठी आयोजकांच्या वतीने भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे आंदोलनस्थळी दिवसभर मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व शेतकऱ्यांची उपस्थिती दिसून आली. दुपारी एक वाजताच्या सुमारास आंदोलकांनी बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या दिशेने कूच केली. यावेळी पोलिसांनी आधीच मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात करून बॅरिकेड्स लावले होते. आंदोलकांनी दोन बॅरिकेड्स ओलांडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पुढे तैनात असलेल्या पोलिसांच्या मोठ्या फौजफाट्याने आंदोलकांना महामार्गावर पोहोचण्यापूर्वीच रोखले. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये काही काळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. सुमारे एक तासाच्या प्रयत्नांनंतर पोलिसांनी आंदोलकांना पुढे जाण्यापासून रोखण्यात यश मिळविले. त्यानंतर आमदार नितीन देशमुख यांच्यासह उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या काही पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईनंतर आंदोलनस्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. आमदार नितीन देशमुख व काही पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांची एकेक करून धरपकड सुरू केली. ताब्यात घेतलेल्या कार्यकर्त्यांना पोलीस व्हॅनमधून अकोल्याच्या दिशेने रवाना करण्यात आले. या संपूर्ण घडामोडींमुळे इंटरचेंज परिसरात मोठी धावपळ सुरू होती. शेतकऱ्यांच्या हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदतीच्या मागणीसाठी आयोजित आंदोलनात महामार्गावर जाण्यापूर्वीच पोलिसांनी आंदोलकांना रोखल्याने आणि त्यानंतर केलेल्या कारवाईमुळे हे आंदोलन चर्चेचा विषय ठरले. या आंदोलनात आमदार प्रवीण दरेकर, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार गजानन लवटे, वाशिम जिल्हाप्रमुख बालाजी वानखडे, वाशीम जिल्हा समन्वयक डॉ. सुधीर कवर, यवतमाळ जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे, अकोला जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, सिद्धार्थ देवळे, जयश्री शेळके, नरेंद्र खेडकर, कॅप्टन प्रशांत सुर्वे, निवासी जिल्हाप्रमुख सचिन परळीकर, मंगरूळपीर तालुकाप्रमुख अर्जुन सुर्वे, अनिल राऊत, यांच्यासह काही प्रमुख पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळग्रस्त महिलांच्या प्रश्नांवर राष्ट्रवादी महिला काँग्रेस आक्रमक!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील महिलांना बसत असून, त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी राष्ट्रवादी महिला काँग्रेस महिला आघाडीच्या वतीने 'दुष्काळ आणि महिलांचे प्रश्न' या विषयावर महिलांशी जनसंवाद व वस्तुस्थिती सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. या माध्यमातून महिलांच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्यात येत असल्याची माहिती राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा माजी खासदार डॉ. फौजिया खान यांनी दि. ३० ऑक्टोबर रोजी वाशीम येथील हॉटेल इंव्हेटो येथे पत्रकार परिषदेत दिली.

दुष्काळामुळे केवळ शेती आणि शेतीच्या उत्पादनावरच परिणाम होत नसून, महिलांच्या पाणी, रोजगार, आरोग्य, पोषण, सुरक्षितता आणि मुलांच्या शिक्षणावरही गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र तरतूद, विशेष आर्थिक मदत आणि त्यांच्या गरजांनुसार योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी दुष्काळग्रस्त गावांतील विहिरींचे

पाणीटंचाई, रोजगार, आरोग्य व आर्थिक मदतीसाठी शासनाकडे विशेष उपाययोजनांची मागणी

पुनर्भरण, बोअरवेलची तपासणी आणि नवीन पाणीस्रोत विकसित करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच प्रत्येक गावात महिलांच्या सहभागातून ग्रामस्तरीय पाणी व्यवस्थापन समित्या स्थापन कराव्यात, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील विधवा महिलांना स्वतंत्र आर्थिक सहाय्य, निवृत्तिवेतन आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. दुष्काळामुळे उत्पन्न बंद झालेल्या महिला बचत गटांना विशेष अनुदान देऊन कर्जफेडीसाठी सवलत किंवा आवश्यकतेनुसार मदत करावी. महिला बचत गटांच्या कर्जावरील व्याजाचा काही भाग शासनाने भरावा, तसेच रोजगार गमावलेल्या महिलांसाठी तातडीच्या निर्वाह सहाय्याची तरतूद करावी दुष्काळग्रस्त गावांमध्ये महिलांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे. रोजगार हमीच्या कामांवर समान वेतन, वेळेवर मजुरी, पिण्याचे पाणी, सावली आणि स्वच्छतागृहांची सुविधा द्यावी. दुष्काळग्रस्त भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करून दुर्गम गावांमध्ये फिरत्या आरोग्य पथकांद्वारे वैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले दुष्काळग्रस्त महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन पाणीटंचाई, रोजगार, आर्थिक मदत, आरोग्य व पोषणासंदर्भातील मागण्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन डॉ. फौजिया खान यांनी केले आहे. यावेळी पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष बाबाराव खडसे पाटील, आशाताई मिरगे, वर्षाताई निकम, ॲड. अंजलीताई साळवे, सोनाली ताई देशमुख, ज्योतीताई गणेशपुरे महिला जिल्हाध्यक्षा वैशालीताई मेश्राम यांची उपस्थिती होती.

तीन दिवसीय मोफत योग शिबिराचा समारोप

अकोला : महिला पतंजली योग समिती, तहसील अकोला, म.पूर्वच्या वतीने शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून खडकी येथील गजानन माऊली योग ग्रुप येथे आयोजित तीन दिवसीय मोफत योग शिबिराचा समारोप झाला. शिबिरात 'नारीशक्ती सशक्त व्हा, निरोगी रहा' हा प्रेरणादायी संदेश देत महिलांना योग, प्राणायाम आणि निरोगी जीवनशैलीचे पटवून देण्यात आले. शिबिराला महिलांचा प्रतिसाद लाभला. योगाच्या माध्यमातून शारीरिक आरोग्य, मानसिक शांतता, सकारात्मक विचारसरणी आणि आत्मविश्वास वाढविण्याच्या महत्त्वाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

चालकावरील हल्ल्याच्या निषेधार्थ एसटी कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलनाचा इशारा!

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड आगारातून रिसोड– गोरगाव–ताकतोडा मार्गावर धावणाऱ्या एसटी बसच्या चालकावर माळशी येथे चाकूने हल्ला झाल्याच्या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपीला तातडीने अटक करून कर्मचाऱ्यांना सुरक्षिततेची हमी द्यावी.

अन्यथा संबंधित मार्गावरील बससेवा बंद ठेवण्यासह कामबंद आंदोलन करण्याचा इशारा रिसोड आगारातील विविध कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने आगार व्यवस्थापकांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.४५ वाजता क्रमांक ३३ ची रिसोड–गोरगाव–ताकतोडा बस माळशी येथे आली असता, एका प्रवाशाने बसचालक

शेखर ढोले यांच्यावर चाकूने हल्ला केल्याचे निवेदनात नमूद आहे. या घटनेमुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

निवेदनानुसार, माळशी गावात ५० ते १०० हून अधिक नागरिक असतानाही संबंधित चालकाच्या मदतीसाठी कोणीही पुढे आले नाही. चालकाने ११२ क्रमांकावर फोन करून पोलिसांची मदत मागितली. मात्र, पोलिस घटनास्थळी आल्यानंतरही आरोपीला तातडीने अटक करण्यात आली नसल्याची तक्रार संघटनांनी केली आहे.एसटी कर्मचारी जनतेची अहोरात्र सेवा करतात; मात्र अशा घटनांमुळे त्यांच्या जीविताला धोका निर्माण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. भारतीय संविधानातील सुरक्षिततेच्या अधिकाराचा उल्लेख करत, आरोपीला अटक करून लेखी सुरक्षिततेची हमी मिळेपर्यंत रिसोड–ताकतोडा –माळशी मार्गावरील बससेवा बंद ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे.या निवेदनाच्या प्रती परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच रिसोड आणि गोरगाव पोलिसांना पाठविण्यात आल्या आहेत. कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी संयुक्त कृती समितीने केली आहे. आरोपीला अटक व सुरक्षिततेची लेखी हमी मिळेपर्यंत संबंधित मार्गावरील बससेवा बंद ठेवून कर्तव्य न करण्याचा इशारा कर्मचारी संघटनांनी दिला आहे.

पाण्याअभावी फळबागा संकटात; झाडे वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड!

विहिरी, तलाव कोरडे; बांधावरच्या फळबागांना विमा संरक्षणही नाही, शेतकरी दुहेरी संकटात!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

भीम जय

निसर्गाची अवकृपा, पावसाचा खंड आणि भूजलपातळीत झालेली घट यामुळे शेतीसमोर गंभीर संकट उभे ठाकले आहे. पावसाच्या भरवशावर जगणाऱ्या शेतकऱ्यांना आता पिके जगवण्यापेक्षाही बांधावरच्या फळझाडांचे अस्तित्व टिकवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. विहिरींनी तळ गाठला, तलाव कोरडे पडले आणि पाण्याचे स्रोत आटल्याने फळझाडांना पाणी द्यायचे तरी कुठून, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे.

शेताच्या बांधावर अनेक वर्षांच्या मेहनतीने वाढवलेली फळझाडे ही शेतकऱ्यांसाठी भविष्यातील उत्पन्नाची आशा असते. मात्र, यंदाच्या प्रतिकूल परिस्थितीत हीच झाडे वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना पाण्याची जुळवाजुळव करावी लागत आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब मोलाचा झाला असून, उपलब्ध पाण्याचा वापर कसा करायचा, याचे नियोजन करताना शेतकऱ्यांची दमछाक होत आहे. एकीकडे खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीची चिंता, तर दुसरीकडे वर्षानुवर्षे जपलेल्या फळझाडांना वाळण्यापासून वाचवण्याचे आव्हान, अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडत आहे ती बांधावरच्या फळझाडांना पुरेसे विमा संरक्षण नसल्याची. शेताच्या बांधावर आंबा, चिंच, सीताफळ, लिंबू किंवा अन्य फळझाडांची लागवड केलेल्या शेतकऱ्यांना दुष्काळसदृश परिस्थितीत झाडांचे नुकसान झाल्यास आर्थिक आधार मिळण्याचा प्रश्न निर्माण होतो. पीकविमा योजनामध्ये अधिसूचित पिके, क्षेत्र आणि ठरवलेल्या अटीनुसार संरक्षण मिळते. त्यामुळे बांधावर लावलेल्या प्रत्येक फळझाडाला आपोआप विमा संरक्षण मिळतेच असे नाही. परिणामी, पाण्याअभावी झाडे वाळली किंवा उत्पादन घटले, तर त्याचा आर्थिक भार शेतकऱ्यालाच सहन करावा लागतो.

फळझाडे जगवण्यासाठी केलेला खर्च त्यातून मिळणारे उत्पन्न यांचा ताळमेळ बिघडण्याची भीतीही वाढली आहे. शेतकऱ्यांनी पर्यावरण संवर्धनासोबतच भविष्यातील उत्पन्नाचा स्रोत म्हणून बांधावर झाडे वाढवावीत, असे आवाहन केले जाते.

वन्यजीव सप्ताह विशेष चित्रकला स्पर्धेत विद्याभारतीची उत्तुंग भरारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वन्यजीव सप्ताहानिमित्त वनविभागाद्वारे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा वन विभागातर्फे गौरव वन्यजीव सप्ताहानिमित्त वाशिम वन विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा वन विभागातर्फे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेमध्ये इयत्ता ७ वीतील श्रद्धा गणेश इंगळे प्रथम क्रमांक मिळवला. तर द्वितीय क्रमांक इयत्ता ५ वीतील आराध्या संदीप नागे हिने तर तृतीय क्रमांक इयत्ता ६ वीतील मोहित विनोद पोपळघट याने पटकावला.वन विभागाचे उपवनसंरक्षक (DCF) माधवराव

आणि सहाय्यक वनसंरक्षक सुशील मंतावार आर एफ ओ शिपे वन्यजीव रक्षक आकाश आहाळे यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. शाळेचे अध्यक्ष प्रा.सुरेशराव मिटकरी संचालक सुमित मिटकरी मुख्याध्यापक नितेश मिटकरी तसेच पर्यवेक्षक विजय गोटे यांच्या हस्ते देखील गुणवंत विद्यार्थी तसेच इतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. चित्रकलेच्या माध्यमातून वन्यजीव संरक्षणाचा संदेश प्रभावीपणे मांडला. या यशाबद्दल विजेत्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांच्या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

महाबोधी महाविहार मुक्तीसाठी वाशिममध्ये बौद्ध धर्म संमेलन

उपासिका संघाचे पुनरुज्जीवन व धम्मप्रचारक निर्मितीवर होणार मंथन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला दिशा देण्यासह धम्मप्रचारकांची निर्मिती आणि उपासिका संघाच्या पुनरुज्जीवनाच्या उद्देशाने धम्मकाया मिशनच्या वतीने रविवार, १ नोव्हेंबर रोजी वाशिम येथे बौद्ध धर्म संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. विठ्ठलवाडी मंगल कार्यालय येथे सकाळी ११ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत हे संमेलन होणार आहे.

संमेलनात महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन, धम्मप्रचारकांची निर्मिती आणि उपासिका संघाचे पुनरुज्जीवन या विषयांवर विचारमंथन होणार आहे. बौद्ध धर्माच्या प्रचार-प्रसारातील धम्मप्रचारकांची

भूमिका या विषयावर डॉ. सुजित बोधी, तर महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी पाच कोटी प्रचारकांची निर्मिती या विषयावर धम्मकाया मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रवीण पंडित मार्गदर्शन करणार आहेत. उपासिका संघाच्या पुनरुज्जीवनावर राष्ट्रीय संयोजिका ॲड. माधुरी भालेराव विचार मांडणार आहेत.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानी धम्मकाया मिशनचे विदर्भ विभागप्रमुख शैलेश कापसे राहणार असून, विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रांतील मान्यवरांसह बौद्ध चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला व्यापक जनाधार मिळवून देणे, संघटनात्मक बळ वाढविणे आणि धम्मप्रचाराला गती देणे, या दृष्टीने संमेलन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या संमेलनाला जिल्ह्यातील बौद्ध बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपासिका संघाच्या अध्यक्ष सविता गौतम शेजूळ यांनी केले आहे.

जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार भारतीय स्टेट बँक यांच्या कडून रवी साहेबराव म्हातारमारे हे त्यांच्या मालकीचे मौजे शेरपूर, ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथील शेत सर्व्हे / गट नंबर १३/१ मधील प्लॉट नंबर ४ याचे एकंदर क्षेत्रफळ १२०.०० चौरस मीटर जागेवर कर्ज घेत आहे. परंतु सदर प्लॉटचा जुना खरेदीखताचे दस्त कारंजा दुय्यम निबंधक कार्यालया मध्ये नोंदविला असून त्याच दस्त क्र. ५४६०/२०१९ अन्वये दिनांक ३०/१२/२०१९ हा आहे, या मूळ खरेदीखताच्या दस्ता दिनांक १५/१०/२०२६ रोजी रवी साहेबराव म्हातारमारे यांच्या राहते घरून म्हणजेच रा. पो. शिक्षक कॉलनी, कारंजा (लाड), ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथून गहाळ झाले असुन, त्या स्वरूपाची तक्रार रवी साहेबराव म्हातारमारे यांनी पोलीस स्टेशन कारंजा (शहर) ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथे दिनांक २८/१०/२०२६ रोजी दिली असून त्याचा साना क्र. २२/२०२६ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदीखताबाबत कोणाला कोणत्याही प्रकार दावा अथवा इतर अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाचे आंत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा जर विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाच्या मुळ खरेदीखता दस्त कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ८ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी. करीता ही जाहीर नोटीस.

शिक्का

सही
ॲड. व्ही. व्ही. ठाकरे
शॉप नं. एल १०, वर्धमान प्लाझा,
स्टेट बँक समोर, कारंजा (लाड), जि. वाशीम
मो. नं. ९७६६८८०७६४, ९१४६०४८३१४

मालेगाव तहसील कार्यालयाच्या प्रांगणातील झाडाची कत्तल

झाडे तोडण्याच्या प्रकाराची निष्पक्ष चौकशी करा - रिझवान उस्मान

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

एकीकडे वाशिम जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची वेळ आली आहे हिवाळ्याचे दिवस असतानाही उन्हाचा कडाका जाणवत असताना दुसरीकडे मालेगाव येथील तहसील कार्यालयाच्या प्रांगणातील सावली देणारी झाडे तोडण्यात आल्याने पर्यावरणप्रेमींसह नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे या प्रकाराची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी रिझवान मोहम्मद उस्मान यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तहसील कार्यालयाच्या परिसरात असलेली ही झाडे अनेक वर्षांपासून नागरिकांना सावलीचा आधार देत होती ग्रामीण भागातून विविध शासकीय कामांसाठी येणारे वृद्ध नागरिक,महिला आणि सर्वसामान्य नागरिक या झाडांच्या सावलीत काही वेळ विश्रांती घेत असत तसेच परिसरात येणाऱ्या दुचाकी व इतर वाहनांसाठीही या झाडांमुळे सावली उपलब्ध होत होती मात्र,ही झाडे तोडण्यात आल्याने नागरिकांच्या डोक्यावरील सावलीचा आधारच हिरावला गेला आहे एकीकडे पाणी

वाचविण्याचे आवाहन,तर दुसरीकडे सावली देणाऱ्या झाडांवर कुऱ्हाड! अशी परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत सध्या पाण्याची टंचाई जाणवत असताना पर्यावरणाचे संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे आहे.

झाडे केवळ सावली देत नाहीत,तर वाढत्या तापमानावर नियंत्रण ठेवण्यास आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासही मदत करतात अशा परिस्थितीत शासकीय कार्यालयाच्या परिसरातील झाडे नेमकी कोणत्या कारणामुळे तोडण्यात आली,याची माहिती समोर येणे आवश्यक आहे रिझवान उस्मान यांनी निवेदनात झाडांची संख्या,त्यांची सद्यस्थिती,झाडे तोडण्यासंदर्भातील आदेश,परवानगी व प्रशासकीय मंजुरी यांची तपासणी करण्याची मागणी केली आहे तसेच झाडे तोडण्याचे आदेश देणारे अधिकारी,संबंधित कर्मचारी,कंत्राटदार किंवा इतर जबाबदार व्यक्तींची चौकशी करून नियमांचे उल्लंघन झाले असल्यास दोषींवर कायदेशीर कारवाई करावी,अशी मागणीही करण्यात आली आहे यासोबतच तोडलेल्या झाडांचे लाकूड कुठे नेण्यात आले,त्याची विल्हेवाट कशी लावण्यात आली आणि त्यासंदर्भात कोणती नोंद उपलब्ध आहे,याचीही तपासणी करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे याप्रकरणी केलेल्या चौकशीचा अहवाल व संबंधित कागदपत्रांची माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी,अशी विनंतीही त्यांनी केली आहे शासकीय कार्यालयाच्या आवारातील झाडे तोडण्यामागे नेमके कारण काय? आवश्यक परवानगी घेण्यात आली होती का? या प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाने द्यावीत,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे तहसील कार्यालयाच्या प्रांगणातील सावलीचा आधार पुन्हा निर्माण करण्यासाठी वृक्षारोपणासह पर्यावरण संवर्धनाच्या उपाययोजना कराव्यात,अशीही नागरिकांची अपेक्षा आहे.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३३३ ■ शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाला टाटा कॅपिटलचे बळ - मुख्यमंत्री

शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धनातून परिवर्तन

साडेपाच लाखांहून अधिक नागरिकांना लाभ

मुंबई जनमाध्यम : महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी शासनासोबत उद्योग क्षेत्राचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. टाटा कॅपिटलच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतून गेल्या पाच वर्षांत राज्यातील साडेपाच लाखांहून अधिक नागरिकांना लाभ मिळाला आहे. कंपनीच्या देशभरातील एकूण सामाजिक उत्तरदायित्व खर्चापैकी सुमारे ३० टक्के खर्च महाराष्ट्रात करण्यात आला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

शिक्षण क्षेत्रात 'पंख शिष्यवृत्ती' उपक्रमांतर्गत ६ हजार ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. आर्थिक साक्षरता कार्यक्रमातून ८५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मुंबई व ठाण्यातील ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि एसटीईएम विषयांचे प्रशिक्षण दिले जात आहे. 'प्रोअस्पायर' उपक्रमातून २६ हजारांहून अधिक युवक, महिला, आदिवासी आणि दिव्यांग व्यक्तींना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले. 'आरोग्यतारा' अंतर्गत दोन लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्यात आली, तर कर्करोग प्रतिबंध आणि तपासणी उपक्रमांचा ३० हजारांहून अधिक नागरिकांना लाभ झाला.

'जलआधार' उपक्रमातून ६० हून अधिक गावांतील १ लाख ३० हजार नागरिकांसाठी जलसुरक्षेला बळ मिळाले असून, ६०० हून अधिक जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे. 'द ग्रीन स्विच' उपक्रमातून १९ दुर्गम वस्त्यांतील ५८० हून अधिक घरांना सौरऊर्जेचा लाभ मिळाला.दरम्यान, ठाण्यातील पारसिक टेकडीवर मियावाकी पद्धतीने ४० हून अधिक स्थानिक प्रजातींच्या ३० हजारांपेक्षा अधिक रोपांची लागवड करण्यात आली आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पर्यावरण संवर्धनातून शाश्वत महाराष्ट्राच्या निर्मितीला या उपक्रमांमुळे गती मिळणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

दुष्काळात शेतकरी पाण्यासाठी तडफडतोय, ठेकेदार बंधाऱ्यांचे गेट भंगारात विकतोय

१५० ते १७५ लोखंडी गेट गायब, शेतकऱ्यांनी आर्वीत वाहन पकडले

आर्वी एपीएमसी परिसरात वाहन अडवून साहित्य पकडले; पोलिसांकडून गेट जप्त

आष्टी शहीद जनमाध्यम : एकीकडे पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची पिके करपली आहेत. पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. तर दुसरीकडे शेतकऱ्यांसाठी शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या जलयुक्त शिवार योजनेतील बंधाऱ्यांचे लोखंडी गेटच काढून भंगारात विकण्याचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार साहूर परिसरात उघडकीस आला आहे. तब्बल १५० ते १७५ लोखंडी गेट गायब झाल्याचा आरोप असून, हा प्रकार शेतकऱ्यांनी वेळीच उघडकीस आणल्याने शासनाच्या मालमत्तेची भंगारात होणारी विल्हेवाट रोखण्यात आली. आर्वी एपीएमसी परिसरात शेतकऱ्यांनी वाहन अडविल्यानंतर पोलिसांनी साहित्य ताब्यात घेतले. या घटनेने मृदा व जलसंधारण विभागाच्या कारभारासह संबंधित ठेकेदाराच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मृदा व जलसंधारण उपविभाग, आर्वी कार्यालयांतर्गत जलयुक्त शिवार योजनेतून साहूर परिसरातील नदी-नाल्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधण्यात आले आहेत. पावसाचे पाणी अडवून त्याचा शेतीसाठी उपयोग व्हावा, भूजलपातळी वाढावी आणि दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, हा या योजनेचा मूळ उद्देश आहे. मात्र, याच बंधाऱ्यांना बसविण्यात आलेले अंदाजे १५० ते १७५ लोखंडी गेट ठेकेदार सचिन डुकरे यांनी २९ ऑक्टोबर रोजी काढून नेल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

गेट पुरात वाहून गेले, मग भंगारात कसे पोहोचले

संबंधित लोखंडी गेट पुराच्या पाण्यात वाहून गेल्याचे सांगण्यात आल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. मात्र, ही बाब संशयास्पद वाटल्याने शेतकऱ्यांनी लक्ष ठेवले असता, बंधाऱ्यांमधून काढलेले लोखंडी साहित्य आर्वी येथील मोहसीन नामक भंगार व्यावसायिकाकडे विक्रीसाठी नेले जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. एमएच ३२ क्यू १६७७ क्रमांकाच्या वाहनातून हे साहित्य वजन करण्यासाठी नेले जात असताना शेतकऱ्यांनी वाहनाचा पाठलाग करून आर्वी एपीएमसी परिसरात ते अडविले. त्यानंतर तातडीने पोलिसांना माहिती देण्यात आली. आर्वी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहनातील संबंधित लोखंडी साहित्य ताब्यात घेतले. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

तीन जिल्ह्यांतील कामांचा ठेका; चौकशीची व्याप्ती वाढवा

विशेष म्हणजे, संबंधित ठेकेदाराकडे तीन जिल्ह्यांतील बंधाऱ्यांचे गेट काढणे आणि बसविण्याचे काम शासनाकडून देण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे केवळ साहूर परिसरापुरतेच हे प्रकरण मर्यादित आहे की अन्य जिल्ह्यांतील बंधाऱ्यांमधूनही अशाच प्रकारे साहित्य काढण्यात आले आहे, याचा शोध घेणे आवश्यक आहे. संबंधित कामांचे आदेश, गेट काढण्याची परवानगी, प्रत्यक्ष कामाचा अहवाल आणि काढलेल्या साहित्याची नोंद यांची तपासणी झाल्यास या प्रकरणातील अनेक बाबी स्पष्ट होऊ शकतात.

जलसंधारणासाठी पैसा की भंगारासाठी साहित्य

शासन एका बाजूला जलसंधारणासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करीत आहे. दुष्काळी परिस्थितीत पाणीटंचाई दूर करण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. मात्र, दुसऱ्या बाजूला याच योजनांमधील बंधाऱ्यांचे लोखंडी गेट गायब होत असतील आणि ते भंगारात विक्रीसाठी जात असतील, तर या योजनांच्या अंमलबजावणीवर नियंत्रण कोणाचे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. साहूर परिसरातील शेतकऱ्यांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. शासनाच्या साहित्याचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाल्यास कठोर कारवाई करावी, संबंधित ठेकेदाराचा परवाना निलंबित करावा आणि तीनही जिल्ह्यांतील त्याच्या कामांची तपासणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

समाजाच्या एकजुटीचा जागर उद्या कारंज्यात

गवळी समाजाचा भव्य मेळावा

कारंजा (घाडगे) जनमाध्यम : समाजाची एकजूट, नव्या पिढीचे उज्ज्वल भविष्य आणि सर्वांगीण विकासाचा संकल्प घेऊन कारंजा तालुक्यात प्रथमच भव्य गवळी समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या रविवार, १ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता श्री संत भाकरे महाराज सभागृहात हा मेळावा पार पडणार आहे.

वर्धा जिल्हा महाराष्ट्र गवळी समाज संघटनेच्या अंतर्गत कारंजा तालुका गवळी समाज संघटनेने या मेळाव्याचे आयोजन केले आहे. समाजातील सर्व समाजबांधव,

कर्तृत्ववानांचा होणार सन्मान, समाजाच्या प्रगतीसाठी होणार मंथन

माता-भगिनी, युवक आणि विद्यार्थ्यांना एकाच व्यासपीठावर आणून सामाजिक एकतेचा संदेश देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. तसेच शैक्षणिक प्रगती, आर्थिक उन्नती, युवकांचे भविष्य, पारंपरिक व्यवसाय, गोपालकांच्या समस्या आणि समाजापुढील आव्हाने यावर विचारमंथन होणार आहे.

केवळ एकत्र येण्यापुरता हा मेळावा मर्यादित नसून समाजाच्या प्रश्नांना दिशा देणारे व्यासपीठ ठरणार आहे. प्रत्येक गावातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष देवेंद्र गजाननराव ढोबळे यांनी केले आहे.

नोकरीचे आमिष दाखवून लाखोंचा गंडा

ऑर्डनन्स फॅक्टरीत नोकरी लावण्याच्या नावाखाली १२ लाखांची फसवणूक; NATGRID च्या माहितीवरून नागपुरातून पहाटे अटक

दीड वर्षापासून फरार आरोपी अखेर जेरबंद

पुलगाव जनमाध्यम : सरकारी नोकरीचे स्वप्न दाखवायचे, विश्वास संपादन करायचा आणि लाखो रुपये उकळून पसार व्हायचे, अशा प्रकारे बेरोजगारांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला अखेर पुलगाव पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. ऑर्डनन्स फॅक्टरी अंबाझरी येथे नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून १२ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गेल्या दीड वर्षापासून फरार असलेल्या राजीव हिरास्वामी रेड्डी (रा. मानकापूर, नागपूर) याला २९ ऑक्टोबर रोजी पहाटे नागपुरातून अटक करण्यात आली.

कवठा झोपडी येथील अकील गाडगे यांच्या तक्रारीवरून मे २०२५ मध्ये पुलगाव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. ऑर्डनन्स फॅक्टरीत नोकरी लावून देण्याचे खोटे आश्वासन देत आरोपीने १२ लाख रुपये उकळल्याचा आरोप आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून राजीव रेड्डी पोलिसांना गुंगारा देत फरार होता.

फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पुलगाव पोलिसांचे गुन्हे शोध पथक सक्रिय होते. NATGRID वरून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा माग काढला. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या आदेशानुसार, उपविभागीय पोलीस अधिकारी वंदना करखेले आणि ठाणेदार सदाशिव ढाकणे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक शहाजी घोडके, अमोल आडे, सिद्धू सोमकुवर आणि मयुरी झोपाटे यांच्या पथकाने नागपुरात कारवाई करून त्याला जेरबंद केले.

विश्वासाच्या फंडाला फसवणुकीचा डंख

फंडाच्या नावाखाली २.०१ कोटींचा फ्रॉड

वर्धा जनमाध्यम : दरमहा पैसे जमा करा, वर्षभरात तीन टक्के व्याजासह रक्कम परत मिळवा, या विश्वासावर नागरिकांनी फंडात लाखो रुपये गुंतवले. मात्र, मुदत संपल्यानंतर पैसे परत करण्याऐवजी टाळाटाळ सुरू झाली आणि अखेर तब्बल २ कोटी १ लाख ९४ हजार रुपयांच्या कथित अपहाराचे प्रकरण उघडकीस आले. शहरातील दयालनगर परिसरात फंडाच्या नावाखाली झालेल्या या आर्थिक व्यवहारांप्रकरणी एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दयालनगर येथील राकेश शंकर चंदन (४०) यांच्या घराजवळच प्रेसचे दुकान आहे. याच परिसरात राहणारे घनश्याम बद्रीप्रसाद पांडे ऊर्फ फुगलू पांडे हे मागील दहा वर्षांपासून फंड चालवीत होते. सुरुवातीला व्यवहार सुरळीत असल्याने नागरिकांचा त्यांच्यावर विश्वास बसला. राकेश चंदन हे मागील पाच वर्षांपासून स्वतःसह नातेवाईकांच्या नावाने दरमहा ५७ हजार रुपये जमा करीत होते. १२ महिन्यांनंतर तीन टक्के व्याजासह रक्कम परत मिळत असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, सप्टेंबर २०२५ मध्ये मुदत पूर्ण होऊनही पैसे परत मिळाले नाहीत. वारंवार पैशांची मागणी करूनही पांडे यांच्याकडून टाळाटाळ करण्यात येऊ लागली. त्यामुळे या व्यवहारामागील संशय अधिक गडद झाला.

रायगडमधील दोघांचेच १.६० कोटी

या फंडात स्थानिक नागरिकांसह रायगड जिल्ह्यातील उसरर्ली खुर्द येथील राजाराम बीरा रुपनर यांनी तब्बल एक कोटी रुपये, तर त्यांचे मित्र श्याम पाटील यांनी ६० लाख रुपये जमा केले होते. याशिवाय प्रभाकर बेले, अशिता व ज्योती नरवरे, शंकर चंदन, प्रमिला नगराळे, नूतन ढाले, पूजा कोडवानी, वंदना कांबळे यांच्यासह अन्य नागरिकांचीही लाखो रुपयांची रक्कम फंडात जमा होती.

वृत्तपत्र विक्रेत्यांच्या चेहऱ्यावर फुलविला दिवाळीचा आनंद

वर्धा जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संघाचा सामाजिक बांधिलकीचा उपक्रम; साहित्याबरोबरच रोख रक्कमही भेट

वर्धा जनमाध्यम : वर्षभर ऊन, वारा, पाऊस आणि थंडीची तमा न बाळगता पहाटेच वर्तमानपत्र घरोघरी पोहोचविणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांच्या आयुष्यातही दिवाळीचा आनंद फुलावा, या भावनेतून वर्धा जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संघाने यंदाही सामाजिक बांधिलकी जपली. दरवर्षीप्रमाणे यंदाही संघाच्या सदस्यांना दिवाळीनिमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून त्यांच्या सणाचा आनंद द्विगुणित करण्यात आला.

दिवाळी हा प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद, उत्साह आणि आपुलकी घेऊन येणारा सण. मात्र, समाजापर्यंत रोजच्या घडामोडी पोहोचविणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कष्टांची जाणीव ठेवत त्यांच्या कुटुंबातही सणाचा गोडवा निर्माण व्हावा, या उद्देशाने संघाकडून हा उपक्रम सातत्याने

राबविला जात आहे.

यामध्ये साखर, रवा, चणाडाळ, खाद्यतेल, उटणे, साबण, सुगंधी तेल आणि पेपर वाटपासाठी लागणाऱ्या पिशव्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, संघाच्या उपक्रमासाठी जमा होणाऱ्या पॅम्प्लेटच्या उत्पन्नातूनही दिवाळीनिमित्त सदस्यांना रोख रक्कम दिली जाते. त्यामुळे साहित्याच्या भेटीसोबतच आर्थिक मदतीचा हातही सदस्यांना मिळतो.

केवळ संघटनात्मक कामकाजापुरते मर्यादित न राहता सदस्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणाऱ्या या उपक्रमाचे विक्रेत्यांनी स्वागत केले. संघाच्या कार्यकारिणीने जपलेल्या या आपुलकीच्या नात्याबद्दल सर्व सदस्यांनी पदाधिकाऱ्यांचे आभार मानत त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

ऑनलाइन लुटीचा पैसा वर्ध्यात फिरवला म्यूल खात्यांचे मोठे नेटवर्क उघड

पाच जणांवर गुन्हे दाखल, देशभरातील ऑनलाइन फसवणुकीची रक्कम वर्ध्यात जमा, चार महिलांच्या खात्यांचा वापर

वर्धा जनमाध्यम : देशभरातील नागरिकांना ऑनलाइन फसवणुकीच्या जाळ्यात ओढून लुटलेली कोट्यवधींची रक्कम वर्ध्यातील बँक खात्यांत जमा होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वर्धा सायबर पोलिसांनी संशयास्पद आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे शोधत म्यूल खात्यांचे नेटवर्क उघड केले असून, अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वर्धा शाखेतील चार खात्यांतून तब्बल १ कोटी ९८ लाख रुपयांची उलाढाल झाल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणी दयालनगर येथील माधव नानवानी याच्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र सायबर सेलने पाठविलेल्या संशयास्पद बँक खात्यांच्या यादीवरून वर्धा सायबर पोलिसांनी तपास सुरू केला. त्यात गणेशनगर येथील अनिता तिवारी, सारिका लवणकर, दयालनगर येथील सुनीता तिवारी आणि समतानगर येथील जारा खान यांच्या नावावर चार म्यूल खाती असल्याचे निष्पन्न झाले. या महिला किरायाच्या घरात राहत असल्याची माहितीही पुढे आली आहे.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, माधव नानवानी याने या महिलांच्या नावावर बँक खाती उघडून घेतली होती. या खात्यांशी संलग्न मोबाईल क्रमांकांचे नियंत्रणही

त्याच्याकडे होते. खात्यांमधील ऑनलाइन व्यवहार तोच करीत असल्याचा संशय आहे. महिलांना प्रलोभने दाखवून त्यांच्या बँक खात्यांचा वापर करण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

विविध राज्यांतील फसवणुकीचे पैसे वर्ध्यात

या खात्यांमध्ये महाराष्ट्रासह देशाच्या विविध राज्यांतील ऑनलाइन फसवणुकीची रक्कम जमा झाल्याचे तपासात पुढे आले आहे. त्यानंतर ही रक्कम अन्य बँक खात्यांमध्ये वळती केली जात होती. पार्टटाइम नोकरी, गुंतवणूक, शेअर बाजार, रेटिंग वर्क, वर्क फ्रॉम होम आणि डिजिटल अरेस्ट अशा आमिषांद्वारे नागरिकांना गंडा घालण्यात येत असल्याची माहिती आहे. या नेटवर्कसाठी देशाच्या विविध भागांत फिल्ड एजंट नियुक्त करण्यात आल्याचा संशय असून, मार्च २०२६ पासून हे व्यवहार सुरू असल्याचे तपासात समोर आले आहे.

एका खात्यात ८२ लाखांची उलाढाल

चार खात्यांमधील व्यवहारांचा तपशीलही धक्कादायक आहे. पहिल्या खात्यातून ७० लाख, दुसऱ्यातून ८२ लाख, तिसऱ्यातून २२ लाख आणि चौथ्या खात्यातून २४ लाख रुपयांची उलाढाल झाली आहे. माधव नानवानी याने स्वतःचेही याच बँकेत खाते उघडल्याची माहिती पोलिस तपासात पुढे आली आहे.

देशभरातील सायबर फसवणुकीचे आर्थिक धागेदोरे वर्ध्यापर्यंत पोहोचल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. या व्यवहारांमागील संपूर्ण नेटवर्क, इतर बँक खाती आणि संभाव्य साथीदारांचा शोध घेण्याचे आव्हान आता सायबर पोलिसांसमोर आहे.

हिंगणघाटात गांजा आणि देशी दारूचा साठा जप्त

८७ हजारांचा मुद्देमाल जप्त

वर्धा जनमाध्यम : जिल्ह्यात अंमली पदार्थ आणि अवैध दारू विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम सुरू केली असून, हिंगणघाट शहरातील गोमाजी वॉर्डात छापा टाकून गांजा आणि देशी दारूचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत १ किलो ११३ ग्रॅम गांजा, देशी दारूच्या २०० सीलबंद बाटल्या आणि दोन मोबाईल असा एकूण ८७ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध एनडीपीएस आणि दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी अंमली पदार्थांचे सेवन, साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार २९ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे हिंगणघाट येथील गोमाजी वॉर्डातील एका घरावर छापा टाकण्यात आला.

या घरात विनोद पांडुरंग गिमेकर (वय ५२) आणि सूरज भिमसिंग चौके (वय २९, रा.

प्रियंका कॉलनी, शेगाव नाका, अमरावती, सध्या गोमाजी वॉर्ड, हिंगणघाट) हे आढळून आले. पोलिसांनी घराची झडती घेतली असता गांजा आणि देशी दारूचा साठा मिळून आला. तसेच संशयितांच्या अंगझडतीत दोन मोबाईल जप्त करण्यात आले.

जप्त केलेला मुद्देमाल तिघांचा असल्याचे सांगण्यात आल्याने या अवैध व्यवसायात तिघांचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. त्यानुसार पंचनामा करून संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील हर्षल विनोद गिमेकर हा पसार असून, त्याचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर, पोलीस अंमलदार अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, सागर भोसले आणि रवि पुरोहित यांनी केली.

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या मिळकतीचे मालक व लिहून देणार :- रितेश अरुणराव धांदे, वय ४३ वर्षे, रा. मंचनपूर, अकोला हे सदर मिळकत लिहून घेणार :- नंदा अण्णाजी सुरजुसे, वय ६० वर्षे व समीर अण्णाजी सुरजुसे, वय ३० वर्षे, दोघेही रा. हमदापूर,यांना हस्तांतरित करण्याच्या विचारात आहेत.

मिळकतीचा तपशील :

मौजा – मुकिंदपूर, तालुका – सेलू, जिल्हा – वर्धा.

सर्व्हे क्रमांक – ७३/४

आकारणी – १.००००

मिळकतीचे मूल्यांकन : रुपये ७,९०,०००/- (अक्षरी रुपये सात लाख नव्वद हजार फक्त).

सदर मिळकतीवर कोणत्याही बँकेचे कर्ज, आर्थिक बोजा, गहाणखत, तारण, न्यायालयीन वाद, वारसाहक्क, वैयक्तिक कर्ज अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार असल्यास संबंधितांनी या जाहीर नोटिशीच्या प्रकाशनापासून सात दिवसांच्या आत आपल्या हरकती व आक्षेप आवश्यक त्या पुराव्याच्या कागदपत्रांसह सादर करावेत.

रितेश अरुणराव धांदे,
वय ४३ वर्षे,
रा. मंचनपूर, अकोला

जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार वर्षा विनायकराव डहाके व योगेश विनायकराव डहाके यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा आंजी (मोठी), मौजा नं. २८, ता. जि. वर्धा ग्राम पंचायत आंजी (मोठी), च्या हद्दितील शेत सर्वे कं. ८३ मधील प्लॉट कं. ७ ज्याची एकूण आराजी ३२९.५० चौ. मी. म्हणजेच ३५४५.४२ चौ. फुट इतकी असुन त्याची चतुःर्सिमा :-

पुर्वेसः ओपन स्पेस, पश्चिमेसः ४० फुट लेआउट रोड,

उत्तरेसः लेआउट रोड

दक्षिणेसः प्लॉट कं. ८

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. १५,५०,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

ॲड. सचिन एस. कुरझडकर
साई नगर वर्धा
मो. नं. ९८६००४१३६१

तुकाराम मुंढेंनी उघड केलं मोठं रॅकेट!

मुदत संपलेल्या मालाची व्हायची फक्त कागदावरच विल्हेवाट; FDA चे नवे आदेश जारी

मुंबई/प्रतिनिधी :

ई-कॉमर्स, क्विक-कॉमर्स आणि मोठ्या रिटेल कंपन्यांचा मुदत संपलेला तसेच खराब झालेला माल फक्त कागदावरच नष्ट दाखवून पुन्हा छुप्या मार्गाने ग्राहकांच्या ताटात पोहोचवला जात असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने या रॅकेटचा पर्दाफाश केला असून संपूर्ण महाराष्ट्रातील अन्न सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी १५ कठोर आदेश जारी केले आहेत. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या संपूर्ण गैरप्रकाराची माहिती देत कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

कागदावरच मालाची विल्हेवाट; रॅकेट कसे चालायचे?

ई-कॉमर्स कंपन्या आणि मोठ्या सुपरमार्केट्सच्या गोदामांमधून खराब किंवा एक्स्पायर झालेला माल नष्ट करण्यासाठी विशिष्ट यंत्रणांकडे सोपवला जातो. मात्र, प्रत्यक्षात हा माल नष्ट न करता केवळ तसे प्रमाणपत्र कागदावर तयार केले जायचे.यानंतर हा धोकादायक माल परवाना नसलेल्या गोदामांमध्ये आणि री-पॅकेजिंग युनिट्समध्ये पाठवला जायचा. तिथे उत्पादनावरील मॅन्युफॅक्चरिंग आणि एक्स्पायरी डेट बदलून, नवीन पॅकिंगद्वारे दलालांच्या मदतीने पुन्हा किरकोळ दुकानांमध्ये विक्रीसाठी आणला जायचा. अशा प्रकारे कायद्याचे उल्लंघन करून लोकांच्या आरोग्याशी उघड-उघड खेळ सुरू असल्याचे एफडीएच्या तपासात स्पष्ट झाले आहे.

तपासात आढळल्या मोठ्या त्रुटी

तुकाराम मुंढे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या संपूर्ण साखळीत मोठे गैरव्यवहार दिसून आले आहेत. माल पाठवणारा आणि स्वीकारणारा एकच व्यक्ती असणे, आंतरराज्य वाहतुकीच्या दिवशीच माल नष्ट झाल्याचे दाखवणे, वजनात आणि कार्टनच्या संख्येत तफावत असणे अशा गंभीर बाबी समोर आल्या आहेत.काही प्रकरणांमध्ये तर अस्तित्वातच नसलेल्या कंपन्यांच्या नावाने पावत्या फाडण्यात आल्या होत्या. गाडीची माहिती, वजन काटा पावती, ई-वे बिल किंवा माल नष्ट करतानाचे व्हिडिओ यांसारखा कोणताही स्वतंत्र पुरावा कंपन्यांकडे नव्हता. यामुळेच एफडीएने तात्काळ पावले उचलत कठोर नियमावली लागू केली आहे.

महाराष्ट्रासाठी नवीन नियमावली लागू; आता नियम काय?

अन्न सुरक्षेचा हा गंभीर धोका रोखण्यासाठी एफडीएने संपूर्ण महाराष्ट्रासाठी तातडीचा अनुपालन आदेश जारी केला आहे. नवीन नियमांनुसार:

सीसीटीव्ही आणि क्वारंटाईन झोन: प्रत्येक गोदामात खराब आणि एक्स्पायर मालासाठी सीसीटीव्हीच्या पाळतीत असणारा स्वतंत्र 'क्वारंटाईन झोन' तयार करावा लागेल. त्यावर 'मानवी वापरासाठी अयोग्य' असा स्पष्ट फलक लावणे बंधनकारक असेल.मालाची नासधूस अनिवार्य: गोदामातून माल बाहेर पाठवण्यापूर्वी त्याची पाकिटे पूर्णपणे फाडून किंवा नष्ट करूनच पाठवावी लागतील, जेणेकरून तो माल पुन्हा विकला जाणार नाही.अधिकृत केंद्रांवरच विल्हेवाट: हा माल कोणत्याही परिस्थितीत थेट विक्रीसाठी बाहेर जाऊ शकणार नाही. केवळ शासनाने मान्यता दिलेल्या अधिकृत केंद्रांवरच त्याची विल्हेवाट लावावी लागेल.

अन्न व्यावसायिकांना तुकाराम मुंढेंचा स्पष्ट संदेश-'राज्यात अन्न सुरक्षा कायदे अधिक पारदर्शक आणि कडक करण्यासाठी आम्ही १५ महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. नियम काय आहेत, व्यावसायिकांनी काय केले पाहिजे आणि नागरिकांचे हक्क काय आहेत, याची स्पष्टता यातून मिळेल. नियम न पाळणाऱ्या अन्न व्यावसायिकांवर आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाईल,' असा इशारा एफडीए प्रमुख तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

देशातील १५० फायनान्स कंपन्यांवर सायबर हल्ला

नवी दिल्ली : देशातील वित्तीय क्षेत्राला हादरवून सोडणारी एक धक्कादायक माहिती समोर आली असून गेल्या अवघ्या दीड ते दोन महिन्यांत देशातील सुमारे १५० लहान बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांवर मोठा सायबर हल्ला झाला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर चोरांनी या कंपन्यांच्या डिजिटल सिस्टीममध्ये घुसखोरी करत तब्बल ३०० कोटी रुपयांवर हात साफ केला आहे. या हायटेक दरोड्यासाठी चिनी हॅकिंग प्लॅटफॉर्म आणि प्रगत आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) टूलकिटचा वापर करण्यात आल्याचा प्राथमिक संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी आतापर्यंत विविध राज्यांत सुमारे १५० तक्रारी आणि गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तपास यंत्रणांच्या मते, हे सामान्य सायबर हल्ले नव्हते. हॅकर्सनी आधी या फायनान्स कंपन्यांच्या पेमेंट प्रक्रियेचा आणि सुरक्षेतील त्रुटींचा सखोल अभ्यास केला. त्यानंतर एआयच्या मदतीने सिस्टीम हॅक करून काही मिनिटांत कोट्यवधी रुपये इतर खात्यांवर वळवले. धक्कादायक बाब म्हणजे, अनेक कंपन्यांवर रिपीट अटॅक (पुन्हा पुन्हा हल्ला) करण्यात आले. दिल्लीतील एका फायनान्स कंपनीला पहिल्या हल्ल्यात ७.५ कोटी रुपयांचा फटका बसला, तर अवघ्या काही दिवसांतच त्याच कंपनीचे आणखी ७.२५ कोटी रुपये चोरण्यात आले आहेत.

हल्ल्याचे प्रमुख टार्गेट– प्रामुख्याने १,००० कोटी रुपये किंवा त्यापेक्षा कमी टर्नओव्हर असलेल्या छोट्या फायनान्स कंपन्या सायबर चोरांच्या निशाण्यावर आहेत. मोठ्या बँकांच्या तुलनेत या लहान कंपन्यांची डिजिटल सुरक्षा यंत्रणा कमकुवत असल्याचा फायदा हॅकर्सनी घेतला.

जिल्हाधिका-यांनी बोलावली फायनान्स कंपन्यांची बैठक

हिंगोली : कर्जबाजारीमुळे आणि फायनान्स कंपन्यांच्या तगाद्याला कंटाळून वागजळी (ता. हिंगोली) येथील काही महिलांनी आपली घरे विक्रीस काढल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून या प्रकरणाची गंभीर दखल हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतली आहे. या समस्येवर मार्ग काढण्यासाठी त्यांनी येत्या सोमवार दि. २ नोव्हेंबर रोजी संबंधित फायनान्स कंपन्यांच्या प्रतिनिधींची तातडीची बैठक बोलावली आहे वागजळी गावातील काही महिलांनी आपल्या कुटुंबाच्या गरजांसाठी किंवा व्यवसायासाठी विविध खासगी फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतले होते. मात्र, गेल्या काही काळापासून या कर्जाची वसुली करण्यासाठी कंपन्यांच्या प्रतिनिधींकडून महिलांना प्रचंड मानसिक त्रास दिला जात असल्याचे समोर आले. या जाचाला आणि सततच्या तगाद्याला कंटाळून अखेर हतबल झालेल्या महिलांनी आपली हक्काची घरेच विक्रीला काढल्याचे वृत्त समोर आले. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, फायनान्स कंपन्यांच्या वसुली पद्धतीवर तीव्र संताप व्यक्त होत आहे. गावातील महिलांवर ओढावलेल्या या बिकट परिस्थितीची माहिती मिळताच जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी तातडीने पावले उचलली आहेत.

'वागजळी येथील महिलांना कर्ज वसुलीसाठी त्रास दिला जात असल्याने त्यांनी घरे विक्रीस काढल्याची माहिती मला मिळाली आहे. हा अत्यंत संवेदनशील विषय असून, यातून सामोपचाराने आणि कायदेशीर मार्गाने कसा तोडगा काढता येईल, यासाठी सोमवारी संबंधित फायनान्स कंपन्यांच्या अधिका-यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली आहे अशी माहिती जिल्हाधिका-यांनी दिली.

महिलांना न्याय मिळण्याची अपेक्षा

जिल्हाधिका-यांनी या प्रकरणात थेट हस्तक्षेप केल्यामुळे पीडित महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. सोमवारी होणा-या या बैठकीत फायनान्स कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप बसणार का आणि महिलांची घरे विकली जाण्यापासून वाचणार का, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. तसेच, ग्रामीण भागात नियमबा कर्जवसुली करणा-या कंपन्यांवर जिल्हा प्रशासन काय कारवाई करणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

दुष्काळग्रस्त भागासाठी सरकारची चारा खरेदी

मुंबई : राज्य सरकारकडून दुष्काग्रस्त भागातील पशुधनासाठी चारा खरेदी करण्यात येणार आहे. या चारा खरेदीचा दर सरकारने निश्चित केला असून सुका चारा आणि मुरघास यांच्या खरेदीसाठी अनुक्रमे प्रतिकिलो कमाल १२ रुपये आणि ८ रुपये अशी आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली आहे. या दरांमध्ये वाहतूक खर्चाचा समावेश नसून तो स्वतंत्रपणे देण्यात येणार आहे. सन २०२६-२७ मधील दुष्काळाच्या कालावधीसाठी हे दर लागू राहणार आहेत.राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाने चारा खरेदीविषयी शासन निर्णय जारी केला आहे. या भागातील शेतक-यांच्या पशुधनासाठी शासनाने चारा खरेदी करताना गुणवत्तेचे निकषही निश्चित केले आहेत. सुक्या चा-यातील ओलाव्याचे प्रमाण कमाल १५ टक्के असावे. चारा चांगल्या दर्जाचा, आंबट किंवा कुबट वास नसलेला तसेच बुरशी, माती आणि किडींपासून मुक्त असणे आवश्यक आहे. सुक्या चा-यासाठी ज्वारी आणि बाजरीला प्राधान्य देण्यात आले आहे.

चा-यासंदर्भातील निकष निश्चित

मुरघास खरेदी करताना तो हवाबंद अवस्थेत असणे आवश्यक आहे. त्याला बुरशीचा प्रादुर्भाव नसावा. मुरघासातील ओलाव्याचे प्रमाण ६२ ते ७० टक्के, सामू (पीएच) ३.५ ते ४.४ आणि क्रूड प्रोटीनचे प्रमाण किमान नऊ टक्के असणे आवश्यक आहे. तसेच क्रूड फायबरचे प्रमाण कमाल ३५ टक्के किंवा एनडीएफचे प्रमाण ६० टक्के, अफ्लाटॉक्सिन बी कमाल २० पीपीबी असावे, आदी निकष जारी करण्यात आले आहेत.

तपासणीसाठी सहा प्रयोगशाळा

सुका चारा आणि मुरघासातील घटकांची गुणवत्ता तपासण्यासाठी शासनाने सहा प्रयोगशाळांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यामध्ये पुण्यातील गोखलेनगर येथील पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, औंध येथील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी राज्यस्तरीय रोग अन्वेषण संस्था, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयातील प्रयोगशाळा, गुजरातमधील आनंद येथील एनडीडीबीची काफ प्रयोगशाळा, बंगळुरू येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ अ?निमल न्यूट्रिशन अँड फिजिऑलॉजी आणि शासनमान्य खाद्य विश्लेषण प्रयोगशाळांचा समावेश आहे.

एलपीजी सिलिंडर आता सुलभ हप्त्यांवर मिळणार

नवी दिल्ली : घरातील स्वयंपाकाचा गॅस संपला असेल आणि तो भरण्यासाठी पैसे नसतील, तर कुटुंबाची मोठी अडचण होते. विशेषतः कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी, महिन्याच्या मध्यात आलेला असा अनपेक्षित खर्च हाताळणे कठीण असते. यावर उपाय म्हणून, भारत गॅस आता एलपीजी सिलिंडर भरण्यासाठी ६०० रुपयांपर्यंतची लहान कर्ज सुविधा उपलब्ध करून देत आहे, अनेक कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांमध्ये, दैनंदिन गरजा पूर्ण केल्यानंतर अचानक उद्भवणा-या खर्चासाठी पैसे उरत नाहीत. अशा परिस्थितीत, गॅस सिलिंडर भरण्यासाठी त्यांना प्रतिक्षा करावी लागते. ही कर्ज सुविधा अशा वेळी वेळेवर मदत करते, जेव्हा ग्राहकाकडे सिलिंडर भरण्यासाठी पूर्ण रक्कम नसते. यामुळे रिफिलचा खर्च पुढे ढकलला जातो आणि कुटुंबावर एकदम पूर्ण रक्कम भरण्याचा ताण येत नाही. भारत गॅसच्या माहितीनुसार, ग्राहक सिलिंडर रिफिल करण्यासाठी ६०० रुपयांपर्यंतचे कर्ज घेऊ शकतात. ही सुविधा आता खरेदी करा, नंतर पैसे द्या या तत्त्वावर काम करते. गरज पडल्यास ग्राहक कंपनीकडून कर्ज घेऊन सिलिंडर भरू शकतात आणि नंतर हप्त्यांमध्ये त्याची परतफेड करू शकतात. कर्जाची मंजूर रक्कम ग्राहकाची पात्रता आणि अटी व शर्तींवर अवलंबून असेल. ही सुविधा प्रत्येक ग्राहकाला आपोआप मिळेलच असे नाही; कर्जाची मंजुरी ही पात्रतेवर आणि लागू असलेल्या अटी व शर्तींवर अवलंबून असते. त्यामुळे, अर्ज करण्यापूर्वी तुम्हाला किती रकमेचे कर्ज मिळू शकते, हप्ते भरण्याचे वेळापत्रक काय असेल आणि पैसे भरण्याचे कोणते पर्याय उपलब्ध आहेत, हे स्पष्ट करून घ्या. जर तुमचे उत्पन्न मर्यादित असेल, तर हप्त्याची रक्कम ठरवताना तुमच्या घरातील आवश्यक खर्चांचा गांभीर्याने विचार करा.

'माझ्या वक्तव्याचा विपर्यास'-आ.गायकवाड

बुलढाणा : शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मी माझे स्वतःचे वैयक्तिक प्लॉट (भूखंड) विकले आहेत. त्यामुळे मी अन्नदात्याच्या विरोधात बोलेन, हा विचारही मनात येऊ शकत नाही, माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला आहे, अशा शब्दांत आमदार संजय गायकवाड यांनी स्पष्टीकरण दिले. तसेच आपल्या विधानावरून विरोधी पक्ष, मित्र पक्षच नव्हे स्वतःच्या (शिवसेना) पक्षात निर्माण झालेल्या राजकीय वादळावर त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. संभाव्य पक्षीय कारवाईबद्दल त्यांनी बोलण्याचे टाळले.

मी व्यसनाधीन व्यक्ती संदर्भात बोललो- शेतकरी आत्महत्यांवरून केलेल्या कथित वादग्रस्त विधानावरून कोंडी झाल्यानंतर आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्ष अंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत दिल्यानंतर आ. संजय गायकवाड यांनी आज शुक्रवारी काही वृत्त वाहिन्याच्या प्रतिनिधी समवेत बोलताना आपली भूमिका व बाजू मांडली. आ. गायकवाड म्हणाले, 'माझ्या वक्तव्याचा विपर्यास करून ते चुकीच्या पद्धतीने पसरवले गेले. मी शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल बोललोच नव्हतो, तर नशेच्या आहारी जाऊन आणि अन्य कारणामुळे स्वतःचे आयुष्य संपवणाऱ्या तरुणांच्या आत्महत्येबाबत मी उद्विग्नतेने बोललो होतो. माझ्या बोलण्याचा विपर्यास करण्यात आला तरीही माझ्या शब्दांमुळे महाराष्ट्रातील तमाम शेतकरी बांधवांचे आणि पक्षातील वरिष्ठ नेत्यांचे मन दुखावले असेल, तर मी अत्यंत विनम्रपणे दिलगिरी व्यक्त करतो,' असे आ. संजय गायकवाड म्हणाले .

कारवाईच्या प्रश्नावर- दरम्यान, पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी तुमच्या संभाव्य निलंबनाचा प्रस्ताव ठेवला आहे का आणि तुमच्यावर कठोर कारवाई होणार का?, असा सवाल पत्रकारांनी या संवाद दरम्यान विचारला. यावर काहीही बोलण्याचे टाळत आमदार संजय गायकवाड यांनी त्यावर केवळ 'नो कॉमेंट्स' अश्या मोजक्या शब्दात प्रतिक्रिया दिली . त्यांनी अधिक भाष्य करणे तर सोडा पण थोडक्यात उत्तर देण्याचेही टाळले.

देशातील ६० टक्के डेटा सेंटर एकट्या महाराष्ट्रात

नागपूर : महाराष्ट्रात ८५ ते १२५ च्या दरम्यान डेटा सेंटर आहेत. अदानी-अंबानींना यासाठी फुकटात जमिनी देण्यात आल्या आहेत. या डेटा सेंटरसाठी लाखो लिटर पाण्याची गरज असते. आमचा डेटा सेंटरला विरोध नाही, मात्र सर्वसामान्य लोकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी लागेल. हे मोठ्या लोकांचे चोचले आता बंद झाले पाहिजेत. देशातील ६० टक्के डेटा सेंटर एकट्या महाराष्ट्रात आहेत. तर सरकारने पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे आणि नवीन डेटा सेंटरवर बंदी आणावी, ही गोष्ट आम्ही सरकारच्या लक्षात आणून देणार आहोत असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्रात जंगलतोडीचे काम जोरात सुरू आहे. भीमाशंकर परिसरातील जंगलावर घाला घातल्यानंतर आता रायगडमधील जंगलांवरही संकट आले आहे. १५०० मेगावॅट क्षमतेच्या अदानी यांच्या प्रस्तावित वीज प्रकल्पासाठी सुमारे १५ हजार झाडे तोडली जाणार आहेत. स्थानिक ग्रामस्थ आणि विश्वस्तांना विश्वासात न घेता प्रकल्पासाठी जागा देण्यात आली आहे. सह्याद्री पर्वतरांग ही महाराष्ट्राची नैसर्गिक ढाल आहे. येथील जंगलामुळे पर्यावरणीय संतुलन टिकून आहे. वन्यजीवांचे अधिवास नष्ट करून नेमके काय साध्य करायचे आहे? उद्योगपतींच्या फायद्यासाठी महाराष्ट्राची नैसर्गिक संपत्ती नष्ट करू नका.

मोठ्या प्रमाणात टँकर सुरू

विजय वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये प्रचंड दुष्काळ पडला असून येत्या काळात पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. यापूर्वी कधीही या वेळेस इतक्या मोठ्या प्रमाणावर पाण्याचे टँकर सुरू झाले नव्हते, पण आता राज्यात मोठ्या प्रमाणावर टँकर सुरू करावे लागत आहेत.

बांधकामासाठी पाणी कुठून येणार?

महाराष्ट्रातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती असून पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर आहे. ऑक्टोबर महिन्यातच टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. अशा परिस्थितीत पिंपरी-चिंचवडमध्ये तब्बल २२ लाख चौरस फूट बांधकामाला परवानगी देण्यात आल्याची बाब गंभीर आहे. एवढ्या मोठ्या बांधकामासाठी पाणी कुठून आणणार, याचा विचार संबंधित आयुक्त आणि अधिका-यांनी केला आहे का? या परवानग्या शासनाच्या मान्यतेने देण्यात आल्या आहेत की अधिका-यांनी आर्थिक व्यवहार करून दिल्या आहेत? या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून परवानग्या रद्द कराव्यात. पाण्याची उपलब्धता नसताना बांधकामांना परवानगी देणे म्हणजे भविष्यातील पाणीटंचाईला आमंत्रण देणे आहे.

आ. गायकवाडांच्या हेटाळणीला सरकार सहमत असेल

विजय वडेट्टीवार म्हणाले की, शेतक-यांच्या आत्महत्या होत असताना त्यांची हेटाळणी करणे हा अपमान आहे. आमदार संजय गायकवाड यांनी अशी वक्तव्य केल्यावरही त्यांच्यावर अजूनही कारवाई झालेली नाही. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या भूमिकेशी सहमत आहेत का? वारंवार अशी विधान करणा-या गायकवाड यांना पक्षातून निलंबित केले पाहिजे. अशा बेजबाबदार वक्तव्यांवर कारवाई झाली नाही तर डिसेंबरच्या अधिवेशनात हा विषय उपस्थित करून कारवाईची मागणी करू.

भाजप-सेनेत 'ओपन वॉर' सुरूच

मुंबई/पुणे : महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीमधील अंतर्गत मतभेद आणि वाद थेट चव्हाट्यावर आले आहेत. पुण्यात भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन आणि शिवसेना नेते व माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्यात अत्यंत टोकाचे आणि वैयक्तिक पातळीवर वाक्युद्ध रंगले आहे. पदवीधर मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराचा गेम केल्याचा आरोप करत नवनाथ बन यांनी धंगेकरांवर माकडछाप अशी बोचरी टीका केली, तर धंगेकरांनी बन यांचा उल्लेख वशिला लावून आलेले पगारी पत्रकार असा करत पलटवार केला आहे. या वादामुळे भाजप-शिवसेना युतीमधील समन्वय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचे निकाल समोर आल्यानंतर महायुतीमधील धुसफूस चव्हाट्यावर आली. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी पत्रकार परिषद घेऊन शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांच्यावर महायुतीविरोधी काम केल्याचे गंभीर आरोप केले. धंगेकर यांनी पदवीधर मतदारसंघात भाजप उमेदवाराला मतदान न करण्याचे आवाहन केले होते आणि भाजपचा पराभव झाल्यावर शाब्बास पदवीधरांनो अशी सोशल मीडिया पोस्ट केली, असा दावा बन यांनी केला. यावरून बन यांनी धंगेकरांचा उल्लेख झारीतले शुक्राचार्य असा केला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली. या टीकेला रवींद्र धंगेकर यांनीही अत्यंत आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिले. त्यांनी बन यांचे सर्व आरोप बिनबुडाचे असल्याचे सांगत फेटाळून लावले. भाजपने नागपूर आणि पुण्यातील पराभवाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, महायुतीला सूज आली असून आता ऑपरेशनची गरज आहे असा टोला धंगेकरांनी लगावला.

१२ पक्ष फिरलेली माकडछाप व्यक्ती : बन

धंगेकरांनी आयुष्यभरात १२ पक्ष बदलले, पण त्यांना स्वत:चे राजकीय करिअर घडवता आले नाही. मित्र म्हणायचे आणि पाठीत खंजीर खुपसून भाजप उमेदवाराचा पराभव करायचा, हा धंगेकरांचा धंदा आहे.

वशिला लावून आलेले प्रवक्ते : धंगेकर

नवनाथ बन हे काही काळ पगारी पत्रकार होते, त्यांनी वशिला लावून भाजपचे मुख्य प्रवक्तेपद मिळवले आहे. पराभवाची जबाबदारी स्वीकारून पुण्यात आणि नागपुरात भाजपचा दारूण पराभव झाला आहे, त्याचे खापर दुस-यांवर फोडू नका असे धंगेकर म्हणाले.

युतीत दरी निर्माण होतेय : उदय सामंत

महायुतीमधील काही पदाधिका-यांकडून सातत्याने मित्रपक्षांविरोधात जाहीर वक्तव्ये केली जात आहेत, याबद्दल आम्ही आमची तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे युतीमध्ये दरी निर्माण होते. तिन्ही प्रमुख नेत्यांनी एकत्र बसून अशा लोकांचा बंदोबस्त केला पाहिजे आणि अंतर्गत समन्वय सुधारला पाहिजे.

तुझी लायकी किती? : निलेश राणे

तुझी लायकी किती आणि तू बोलतो किती? नवनाथ बन यांनी शिंदे साहेबांवर किंवा शिवसेनेवर बोलताना आपल्या लायकीत राहून बोलावे, असा थेट इशारा राणेंनी दिला. नवनाथ बन यांनी निलेश राणे माझे मित्र आहेत असे म्हटले होते. त्यावर पलटवार करताना राणे म्हणाले, तो काय माझा मित्रबित्र नाही, तो माझा ज्युनिअर आहे. मी २००९ मध्ये खासदार झालो, तेव्हा तो चड्डीत होता. मी कोणालाही मित्र बनवत नसतो.

सत्तेसाठी जमलेल्यांची हीच अवस्था होते : पेडणेकर

महायुतीमध्ये केवळ सत्तेसाठी आणि स्वार्थासाठी एकत्र आलेले लोक आहेत. त्यामुळे निवडणुकीत पराभव होताच हे एकमेकांचे कपडे टराटरा फाडायला निघाले आहेत. निलेश राणेंनी भाजपच्या मुख्य प्रवक्त्याबद्दल ज्या भाषेचा वापर केला, त्यावरून महायुतीमध्ये एकमेकांबद्दल किती आदर आहे हे स्पष्ट होते. शिंदे गटाला सत्तेची मस्ती आली असून ते भाजपच्याच नेत्यांना आता लायकी दाखवायला निघाले आहेत.

युक्रेनच्या २ ट्रेनवर रशियाचा ड्रोनहल्ला

निप्रो : युक्रेनच्या निप्रो शहरात रेल्वे स्टेशनवर उभ्या असलेल्या दोन ट्रेनवर रशियाने ड्रोनहल्ला केला. या हल्ल्यात १३ प्रवाशांचा मृत्यू झाला असून १० प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. रशियाने जेट इंजिनच्या ड्रोनने हे हल्ले केल्याचे उघड झाले आहे. युक्रेनचे राष्ट्रपती वोलोडीमीर झेलेन्स्की यांनी एक्सवर पोस्ट करत या हल्ल्याचा निषेध केला आहे. रशियाने केलेला हा भ्याड हल्ला आहे असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

हा हल्ला झाला त्यावेळी रेल्वे प्लॅटफॉर्मवर एक लोकल इलेक्ट्रिक ट्रेन आणि एक पॅसेंजर ट्रेन उभी होती. झेलेन्स्कीनी या हल्ल्याची कठोर शब्दांत निंदा केली आहे. तसेच रशियाविरोधात कठोर बंदी घालण्याची मागणी केली आहे. त्यांनी युरोपीय संघ, अमेरिका आणि जी-७ कडे विनंती केली आहे की, जोपर्यंत युद्ध सुरू आहे तोपर्यंत रशिया आणि त्यांच्या लष्करावर दबाव आणायला हवा, असे झेलेन्स्की यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

निकालाचा सांगावा..

भाजप ही एकतर कोणतीही निवडणूक जिंकते अथवा त्यापासून काहीतरी बोध घेत जिद्दीने पुढच्या निवडणुकीच्या तयारीला लागते. विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या पाच जागांच्या निकालानंतरही हेच होणार आहे. या निवडणुकीत महायुतीने दोन तर महाविकास आघाडीने तीन जागा जिंकल्या. या निकालाला राज्य सरकारविरुद्धचा सार्वत्रिक कौल म्हणणे घाईचे ठरेल; पण महायुतीच्या समन्वयाची, उमेदवारनिवडीची आणि मर्यादित मतदारवर्गाशी संवाद साधण्याच्या क्षमतेची ही नक्कीच परीक्षा आहे. निकालाचे चित्र स्पष्ट आहे. पुणे शिक्षक मतदारसंघातून भाजपचे कौस्तुभ गावडे, तर अमरावती शिक्षक मतदारसंघातून शिवसेनेचे किरण सरनाईक विजयी झाले. पदवीधरांच्या तिन्ही जागा विरोधकांनी जिंकल्या. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हर्षदा देशमुख-जाधव, नागपुरात काँग्रेसचे अभिजित वंजारी आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये शरद पवार पक्षाचे डॉ. प्रतापसिंह पाटील. त्यामुळे शिक्षक मतदारसंघांत महायुतीने जागा राखल्या; पदवीधरांच्या तिन्ही पट्टयांत मात्र मतदारांनी वेगळा संदेश दिला. जागावाटपाचा ३:१:१ फॉर्म्युला ठरला होता. भाजपकडे पुणे पदवीधर, पुणे शिक्षक आणि नागपूर पदवीधर, अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे छत्रपती संभाजीनगर पदवीधर; तर शिंदे यांच्या शिवसेनेकडे अमरावती शिक्षक, कागदावर भूमिका स्पष्ट होती; पण प्रचाराच्या मैदानात एकजूट तितकी स्पष्ट राहिली नाही. उमेदवार ठरवणे, स्थानिक इच्छुकांची समजूत काढणे आणि प्रत्येक घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांना एकाच दिशेने कामाला लावणे, या तिन्ही पातळ्यांवर कमतरता जाणवली. महायुतीचा फॉर्म्युला कागदावर ठरतो; त्याचे मतांत रूपांतर मात्र कार्यकर्त्यांच्या विश्वासातून होते. पुणे शिक्षक मतदारसंघ हा या विसंवादाचा सर्वाधिक उघड नमुना ठरला. भाजपचे अधिकृत उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्याविरोधात अपक्ष सचिन सानप यांना शिंदे यांच्या शिवसेनेने पाठिंबा दिला. गावडे जिंकले, मात्र, मित्रपक्षाने वेगळा उमेदवार पुरस्कृत केल्याने एकजुटीचा संदेश कमकुवत झाला, हे निर्विवाद. अमरावतीत चित्र उलटे होते. शिवसेनेचे सरनाईक जिंकले; पण भाजपमधील बंडखोरांसह शिवसेनेचे माजी आमदार श्रीकांत देशपांडेही रिंगणात होते. त्यामुळे महायुतीच्या अधिकृत उमेदवाराची मते फुटण्याची शक्यता निर्माण झाली होती. सरनाईक यांनी विजयकोट्यापेक्षा अधिक मते मिळवत जागा राखली; परंतु बंडखोरी रोखण्यात युतीला यश आले असे म्हणता येत नाही. पुण्यात शिवसेनेचा सानप यांना पाठिबा आणि अमरावतीत भाजप आणि शिवसेनेतील बंडखोरी या दोन्ही घटना परस्पर अविश्वासाची पार्श्वभूमी दाखवतात. मात्र, भाजपने बंडखोरांना सहा वर्षांसाठी पक्षातून काढून टाकत महायुतीचा धर्म पाळला, याची नोंद घ्यावी लागेल. छत्रपती संभाजीनगरमध्येही समन्वयाबाबत प्रश्न उपस्थित झाले. शिवसेनेच्या आमदार अब्दुल सत्तार यांनी शरद पवार पक्षाचे उमेदवार प्रतापसिंह पाटील यांना पाठिंबा दिला. शिवसेनेची अधिकृत भूमिका मात्र अखेरीस महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांच्या समर्थनाची होती. स्थानिक नेत्याची भूमिका आणि संपूर्ण पक्षाची भूमिका एकच नसल्याने महायुतीतील मतदारांपर्यंत कोणता संदेश पोहोचला, याची चिकित्सा पक्षांनी करायलाच हवी. पाटील यांनी चव्हाण यांचा पराभव केला. तीन वेळा आमदार राहिलेल्या चव्हाणांविरोधातील नाराजी, पाटील यांचा बदलाचा संदेश आणि स्थानिक संपर्क यांना या निकालात महत्त्व होते. नागपूरचा निकालही संघटनात्मक धड्याने भरलेला आहे. भाजपचे सुधाकर कोहळे पहिल्या टप्प्यांतील मोजणीत आघाडीवर होते; पण पसंतीक्रमाच्या मतमोजणीनंतर काँग्रेसचे अभिजित वंजारी विजयी झाले. अपक्ष नितेश कराळे यांना मिळालेल्या मतपत्रिकांवरील दुसऱ्या पसंतीच्या मतांनी निकाल फिरवण्यात भूमिका बजावली. स्थानिक नाराजी, कराळे यांचा स्वतंत्र मतदाराधार, वंजारी यांचा संपर्क आणि मतदानाला समर्थकांना बाहेर काढण्याची क्षमता, या सर्व घटकांचा विचार व्हायला हवा. पुणे पदवीधरमध्ये हर्षदा देशमुख-जाधव यांनी भाजपच्या स्मिता जाधव यांचा पराभव केला. शिवसेनेचे रवींद्र धंगेकर यांच्या समाजमाध्यमांवरील पोस्ट स्वयंस्पष्ट आहेत. दुसरीकडे, पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपच्या कौस्तुभ गावडे यांनी काँग्रेसचे विद्यमान आमदार जयंत आसगावकर यांच्यासह इतर प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले. या दोन निकालांतून एकाच विभागातही मतदारांचा प्रतिसाद मतदारसंघानुसार बदलतो, हे दिसते. पुण्यातील शिक्षकांचा विजय भाजपची स्थानिक बांधणी आणि उमेदवाराचा स्वीकार दाखवतो. महायुतीने अधिक काटेकोर समन्वय साधला असता, बंडखोरांना वेळेवर समजावले असते आणि अधिकृत उमेदवारांना मित्रपक्षांचे पूर्ण सहकार्य मिळाले असते, तर काही लढती नक्कीच अधिक अनुकूल झाल्या असत्या. विशेषतः पुणे शिक्षकांत सानप यांची मते आणि नागपुरात पसंतीक्रमाच्या मतांचे गणित महत्त्वाचे होते. या पाच जागा मर्यादित नोंदणीकृत पदवीधर आणि शिक्षक मतदारांनी निवडलेल्या विशेष मतदारसंघांच्या आहेत. म्हणून त्यांचा निकाल संपूर्ण राज्यातील जनमताचा थेट आरसा नाही, तसेच सरकारच्या स्थैर्यावर तातडीचा प्रश्नचिन्हही नाही. तरी या मतदारांचे प्रश्न शिक्षण, रोजगार, शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न आणि प्रतिनिधित्व राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. भाजपची संघटनात्मक ताकद, नेतृत्व आणि चुका दुरुस्त करण्याची क्षमता या निकालाने नाहीशी होत नाही; पण त्या ताकदीचा पुरावा पुढच्या निवडणुकीत अधिक शिस्तबद्ध कामातूनच द्यावा लागेल. महायुतीने बंडखोरांसाठी वेळबद्ध तोडगा, जागावाटपानंतर एकच प्रचाररेषा, स्थानिक नेत्यांची जबाबदारी आणि मतदारांच्या प्रश्नांवर सातत्यपूर्ण काम, हे बदल घडवले पाहिजेत. दोन विजयांनी आत्मसंतोष नको तसेच तीन पराभवांनी निराशाही नको. महायुतीसमोरचा खरा प्रश्न जागांचा नाही, एकत्र लढण्याच्या विश्वासाचा आहे तो मतपेटीत दिसला, तरच पुढचे निकाल बदलतील.

पाणी साठले, पण दुष्काळ हटला का?

उत्तरार्ध

जलसंधारणाची कामे झाल्यानंतरही काही गावांमध्ये मूलभूत पाणीपुरवठ्याची समस्या कायम राहिली, हे कॅगच्या अहवालातून स्पष्ट झालेले आपण पाहिले. जलयुक्त शिवारच्या कामांचा परिणाम भूजलावरही अपेक्षेप्रमाणे दिसून आला नाही. भूजलाच्या बाबतीतही ही विसंगती दिसते. महाराष्ट्र भूजल विकास व व्यवस्थापन कायदा २००९ अस्तित्वात असूनही त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक नियम जानेवारी २०२० पर्यंत अंतिम झाले नव्हते, असे 'कॅग'ने नमूद केले. तपासलेल्या १२० गावांमध्ये अभियानानंतर विहिरींच्या संख्येत सुमारे १० टक्के आणि बोअरवेलच्या संख्येत ९ टक्के वाढ झाली. म्हणजेच पाणी साठविण्याबरोबरच भूजल उपशावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असताना भूजल काढण्याची क्षमता वाढत गेली. जलयुक्त शिवारचा शाश्वत परिणाम साधण्यासाठी हा अत्यंत महत्त्वाचा धोरणात्मक प्रश्न आहे. योजनेच्या कामांच्या गुणवत्तेबाबतही कॅगने प्रश्न उपस्थित केले. सहा निवडक जिल्ह्यांमध्ये पूर्ण झालेल्या १.७४ लाख कामांपैकी केवळ ३७,००१ कामांचे म्हणजे सुमारे २१ टक्के कामांचे तृतीय-पक्ष मूल्यांकन झाले होते. काही ठिकाणी प्रत्यक्ष तपासणीत संरचनात्मक दोष, अयोग्य जागेची निवड आणि पाणी साठविण्याची अपुरी क्षमता आढळली. उदाहरणार्थ, पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात तपासलेल्या १३ सिमेंट नाला बंधाऱ्यांपैकी ७ म्हणजे ५४ टक्के बंधारे संरचनात्मकदृष्ट्या योग्य नसल्याचे किंवा पाणी साठविण्यास अयोग्य असल्याचे तृतीय-पक्ष मूल्यांकनात नमूद झाले. त्याचप्रमाणे तपासलेल्या १७४ शेततळ्यांपैकी ४८ म्हणजे २८ टक्के शेततळी संरचनात्मकदृष्ट्या योग्य नसल्याचे आढळले.

एकरेषीय निष्कर्ष नको

देखभालीचा प्रश्नदेखील तितकाच गंभीर आहे. तपासलेल्या १२० गावांपैकी एकाही ग्रामसभेने जलसंधारणाच्या सामायिक संरचनांच्या देखभालीसाठी अपेक्षित उपकर जमा केला नव्हता. त्यामुळे शासनाकडून मिळणारे प्रोत्साहन अनुदानही उपलब्ध झाले नाही. परिणामी, काही जलसंधारण संरचनांची कार्यक्षमता कालांतराने कमी होण्याचा धोका निर्माण झाला. संयुक्त तपासणीत ४४० सिमेंट नाला बंधाऱ्यांपैकी २०८ म्हणजे ४७ टक्के बंधाऱ्यांमध्ये झाडेझुडपे आणि गाळ साचलेला आढळला. ४८ पाझर तलावांच्या दुरुस्तीपैकी २२ म्हणजे ४६ टक्के कामांमध्ये झाडेझुडपे वाढलेली होती आणि काही ठिकाणी साठवलेले पाणी गळत असल्याचेही आढळले. म्हणूनच जलयुक्त शिवार योजनेबाबत 'योजना पूर्णपणे अपयशी ठरली' किंवा 'योजना पूर्णपणे यशस्वी झाली' असा एकरेषीय निष्कर्ष काढणे शास्त्रीयदृष्ट्या योग्य ठरणार नाही. कामांची संख्या, खर्च आणि निर्माण केलेली काही स्थानिक जलसाठा क्षमता ही योजनेची सकारात्मक बाजू आहे; परंतु खर्चाच्या तुलनेत भूजलपातळी, जलतटस्थता, पिकांची पाणी मागणी, संरचनांची गुणवत्ता आणि दुष्काळाची पुनरावृत्ती यामध्ये अपेक्षित परिणाम सर्वत्र साध्य झाला नाही, हे कॅगच्या तपासणीमधून दिसते. महाराष्ट्राच्या जलसंधारण विभागाच्या अधिकृत माहितीनुसार पहिल्या टप्प्यात २०,५४४ गावे १०० टक्के जलपरिपूर्ण झाल्याचा दावा, २७.०८ लाख टीएमसी जलसाठा निर्माण झाल्याचे आणि ३९.०४ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाल्याचे नमूद आहे. मात्र या सरकारी आकडेवारीतील 'सिंचन क्षमता' ही एक सिंचन दिल्यास निर्माण होणारी क्षमता आहे; ती वर्षभराची हमीची सिंचनव्यवस्था किंवा प्रत्यक्ष प्रत्येक शेतकऱ्याला मिळालेले पाणी याच्याशी समान मानता येत नाही. यातून महाराष्ट्र कोरडा का राहतो, याचे उत्तर अधिक व्यापक पद्धतीने समोर येते. महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण अनेक भागांत कमी असण्याबरोबरच पावसाचे वितरण अत्यंत अनिश्चित आहे. अशा परिस्थितीत जलसंधारणाची संरचना उभारणे आवश्यक असले तरी त्यासोबत भूजल उपशावर नियंत्रण, पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीकपद्धती, ठिबक व तुषार सिंचनाचा विस्तार, जलसाठ्यांची नियमित देखभाल, अचूक जललेखा, गावनिहाय पाण्याचे बजेट आणि स्वतंत्र तांत्रिक मूल्यांकन या सर्व बाबी एकत्रितपणे राबविणे गरजेचे आहे. अन्यथा पावसाळ्यात कोट्यवधी रुपयांची कामे झाली तरी उन्हाळ्यात विहिरी कोरड्या आणि टँकर सुरू अशी विरोधाभासी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

> **जलयुक्त शिवारवर मोठा खर्च झाला, कामांची संख्याही मोठी झाली; परंतु त्यातून निर्माण झालेला शाश्वत जलपरिणाम सर्वत्र त्याच प्रमाणात निर्माण झाला नाही, हीच या योजनेची सर्वांत महत्त्वाची चिकित्सक शिकवण आहे.**

किती पाणी साठले?

जलयुक्त शिवारच्या पहिल्या टप्प्याच्या अनुभवातून आजच्या जलयुक्त शिवार अभियान २.० साठीही महत्त्वाचा धडा मिळतो. शासनाच्या माहितीनुसार दुसऱ्या टप्प्यात केवळ जलसाठा निर्माण करण्यापेक्षा पाणलोट विकास, जलसाक्षरता, उपलब्ध भूजलाचा कार्यक्षम वापर आणि लोकसहभाग यावर भर देण्यात आला आहे. एप्रिल २०२६ पर्यंतच्या अधिकृत आकडेवारीत विविध जिल्ह्यांमध्ये हजारो कामे मंजूर व पूर्ण झाल्याचे दिसते. त्यामुळे दुसऱ्या टप्प्याचे मूल्यमापनही केवळ 'किती कामे झाली' आणि 'किती पैसा खर्च झाला' या निकषांवर न करता किती पाणी साठले, किती पाणी जमिनीत मुरले, भूजलपातळी किती वाढली, किती क्षेत्राला प्रत्यक्ष सिंचन मिळाले आणि दुष्काळाच्या काळात टँकरवरील अवलंबित्व किती कमी झाले, या परिणामाधारित निकषांवर केले पाहिजे. अखेरीस जलयुक्त शिवार ही संकल्पना चुकीची होती असे म्हणणे योग्य ठरणार नाही; परंतु जलयुक्त शिवार म्हणजे केवळ जलसंधारणाची कामे नव्हेत, हे या योजनेच्या अनुभवाने स्पष्ट केले आहे. सुमारे दहा हजार कोटी रुपयांचा खर्च करून लाखो कामे उभारल्यानंतरही काही ठिकाणी जलसाठा अपुरा राहिला, भूजलपातळी घटली, पाणीटंचाईसाठी टँकरची गरज वाढली आणि पाणी जास्त लागणाऱ्या पिकांचे क्षेत्र वाढले, तर योजनेच्या अंमलबजावणीच्या पद्धतीचे चिकित्सक मूल्यमापन करणे अपरिहार्य ठरते. कॅगनेही ९,६३३.७५ कोटी खर्चानंतर जलतटस्थता आणि भूजलपातळी वाढविण्यावर अभियानाचा परिणाम मर्यादित राहिल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने दुष्काळमुक्त करण्याचे मोजमाप बांधलेल्या बंधाऱ्यांची संख्या किंवा खर्च झालेल्या कोट्यवधी रुपयांत नसून, पुढील उन्हाळ्यात गावातील विहिरीत किती पाणी राहते आणि शेतकऱ्याच्या शेतात किती पाणी पोहोचते यामध्ये आहे. जलयुक्त शिवारवर मोठा खर्च झाला, कामांची संख्याही मोठी झाली; परंतु त्यातून निर्माण झालेला शाश्वत जलपरिणाम सर्वत्र त्याच प्रमाणात निर्माण झाला नाही, हीच या योजनेची सर्वात महत्त्वाची चिकित्सक शिकवण आहे. त्यामुळे पुढील जलधोरणात 'काम पूर्ण' या प्रशासकीय निकषाऐवजी 'पाणी उपलब्ध' हा परिणामाधारित निकष केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. मृद्-जलसंधारणाची कामे कितीही केली तरी त्यातून उपलब्ध पाणीसाठ्यानेच दुष्काळ हटणार आहे, अन्यथा नाही.

मयूर बागूल
९०९६२१०६६९
(लेखक सहज जलबोध अभियानाचे,राज्य समन्वयक आहेत.)

पंतप्रधान मोदी एकही खुली पत्रकार परिषद का घेत नाहीत?

पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या १०-१२ वर्षांत एकही खुली पत्रकार परिषद का घेत नाहीत? याचे उत्तर शोधायला कुठल्या मोठ्या राजकीय विश्लेषकाकडे जायची गरज नाही.त्यांच्याच मंत्रिमंडळातल्या दोन दिग्गज मंत्र्यांनी नुकतेच कॅमेऱ्यासमोर जे 'पराक्रम' केले आहेत, त्यावरूनच हा सगळा उलगडा होतो! टेलिप्रॉम्प्टर आणि ठरलेल्या स्क्रिप्टच्या बाहेरचा एक जरी प्रश्न आला, की यांची कशी भंबेरी उडते याचे हे दोन ताजे नमुने पाहा...

पहिला प्रकार घडला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या पत्रकार परिषदेत! राजनाथ सिंह यांनी एकदम आवेशात येऊन विरोधकांवर तोफ डागली 'विरोधी पक्ष आणि समाजवादी पार्टी हे हिंदूविरोधी आहेत, मुलायम सिंह यांनी अयोध्येत हिंदू कारसेवकांवर गोळ्या चालवल्या होत्या!'

वातावरण एकदम गंभीर होणार इतक्यात, समोर बसलेल्या एका पत्रकाराने अगदी शांतपणे प्रतिप्रश्न विचारला, 'मग साहेब, जर मुलायम सिंह इतके हिंदूविरोधी होते, तर तुमच्याच मोदी सरकारने २०२३ मध्ये त्यांना देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान 'पद्मविभूषण' देऊन का गौरविलं?' बस! हा एक प्रश्न ऐकताच राजनाथ सिंहांची बोलती बंद झाली. उत्तर देण्याऐवजी साहेबांनी तिथल्या तिथे पत्रकार परिषद गुंडाळली आणि थेट खुर्चीवरून उठून चालते झाले!बरं, राजनाथ सिंहांचे नशीब बलवत्तर म्हणून त्या पत्रकाराने यापुढचा अजून एक खोचक प्रश्न विचारला नाही, नाहीतर पळता भुई थोडी झाली असती!

काही दिवसांपूर्वीच केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याविरोधात जेव्हा विद्यार्थ्यांचे आंदोलन झाले आणि तिथे आंदोलकांवर अश्रुधूर व लाठीचार्ज करण्यात आला, तेव्हा भाजपचे लोक तावातावाने युक्तिवाद करत होते की, 'अश्रुधूर सोडणे किंवा गोळीबार करणे हे आदेश मंत्र्यांचे नसतात, तर जागेवर असलेल्या स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांचे (Bureaucrats) असतात!'

आता भाजपचा हाच नियम १९९० च्या अयोध्या गोळीबाराला लावून पाहूया! जेव्हा कारसेवकांवर गोळीबार झाला, तेव्हा मुख्यमंत्री मुलायम सिंह यांच्या हाताखाली उत्तर प्रदेशचे तत्कालीन प्रधान सचिव (Principal Secretary) कोण होते? तर 'नृपेंद्र मिश्रा'! म्हणजे भाजपच्याच भाषेत सांगायचे तर, ज्या प्रशासकीय व्यवस्थेच्या आणि अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने गोळीबाराचे आदेश राबवले गेले, त्याच नृपेंद्र मिश्रांना मोदीजींनी २०१४ मध्ये आधी स्वतःचे प्रधान सचिव बनवले आणि नंतर

निवृत्तीनंतर थेट अयोध्येच्या श्रीराम जन्मभूमी मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष करून टाकले!

काय हा दैवदुर्विलास पाहा... ज्यांनी गोळीबार केला म्हणता त्या मुलायम सिंहांना तुमचेच सरकार 'पद्मविभूषण' देते, आणि ज्या प्रशासकीय अधिकाऱ्याच्या काळात हे घडले त्या मिश्रांना 'राम मंदिर समिती'चे सर्वोच्च पद देते! आणि वरून कारसेवकांच्या रक्ताचे दाखले देऊन सामान्य हिंदूंना भडकवायला हेच लोक मोकळे!

मुळात पाकिस्तान, हिंदू-मुस्लिम आणि देशभक्तीची जुनीच कॅसेट वाजवून हे भाजपचे लोक जनतेला अजून किती दिवस 'चू' बनवणार आहेत, हेच कळायला मार्ग नाही. जनतेचा कुठलाही मूळ प्रश्न विचारला की यांची गाडी थेट पाकिस्तान आणि हिंदू-मुस्लिमवर नेऊन सोडायची एवढाच यांचा अजेंडा उरला आहे.

ज्या राम मंदिराच्या नावावर यांनी वर्षानुवर्षे राजकारण केले, त्या मंदिराचा संपूर्ण कारभार तर यांच्याच हातात होता ना?मंदिराच्या दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'स्वतःच्या लोकांचीच' तिथे नियुक्ती केलेली होती. पण तिथेही काय दिवे लावले? मंदिराच्या दानपेटीवर आणि निधीवर यांच्याच हाताखालच्या लोकांनी डल्ला मारला! आणि नेहमीच्याच पद्धतीने या चोरीतही फक्त छोटे मोहरे पकडले गेले, तर जे मोठे मासे होते त्यांना पद्धतशीरपणे 'क्लीन चिट' मिळाली आणि ते राजीनामा देऊन सहीसलामत बाजूला झाले. प्रभू श्रीरामाच्या मंदिराच्या दानपेटीतही ज्यांची नियत साफ राहत नाही, ते इतरांना हिंदुत्वाचे सर्टिफिकेट वाटत फिरतात हाच सर्वात मोठा विनोद आहे!

आता दुसरा भन्नाट नमुना पाहा केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांचा! गोयल साहेबांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेसला जाब विचारला की, 'माजी मुख्य निवडणूक आयुक्त एम. एस. गिल हे पदावरून रिटायर झाल्यानंतर काँग्रेसने त्यांना भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'पद्मविभूषण' का दिला?'

गोयल साहेबांना वाटले आपण पत्रकार परिषदेत फार मोठा राजकीय बॉम्ब टाकला. पण हा व्हिडिओ व्हायरल होताच सोशल मीडियावर लोकांनी गोयल साहेबांच्या अज्ञानाची लक्तरे वेशीवर टांगली! कारण एम. एस. गिल यांना 'पद्मविभूषण' पुरस्कार काँग्रेसने नाही, तर सन २००० मध्ये खुद्द भाजपच्याच सत्ताकाळात तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने दिला होता! एम. एस. गिल हे पुढे जाऊन काँग्रेसमध्ये सामील झाले म्हणजे त्यांना पुरस्कारही काँग्रेसनेच दिला असणार, असा 'व्हॉट्सप युनिव्हर्सिटी'चा गाढा अभ्यास करून पत्रकार परिषदेत आल्यावर अशीच फजिती होते! स्वतःच्याच पक्षाच्या पंतप्रधानांनी दिलेल्या पुरस्काराचा हिशोब हे महाशय काँग्रेसला मागत होते!

जिथे राजनाथ सिंह आणि पीयूष गोयल यांसारख्या मुरलेल्या कॅबिनेट मंत्र्यांची एका प्रतिप्रश्नावर अशी भंबेरी उडते आणि ऐतिहासिक सेल्फ-गोल होतो, तिथे खुद्द पंतप्रधानांनी खरीखुरी पत्रकार परिषद घेतली तर काय अनर्थ होईल याची कल्पनाच केलेली बरी! म्हणूनच साहेब खऱ्या पत्रकारांसमोर येण्यापेक्षा 'तुम्ही आंबा कापून खाता की चोखून?' आणि 'तुम्ही १८ तास काम करूनही थकत कसे नाही?' असले राष्ट्रीय महत्त्वाचे प्रश्न विचारणाऱ्या भाटांच्याच मुलाखती का देतात, हे एव्हाना सगळ्यांनाच कळले असेल!

पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या १०-१२ वर्षांत एकही खुली पत्रकार परिषद का घेत नाहीत? याचे उत्तर शोधायला कुठल्या मोठ्या राजकीय विश्लेषकाकडे जायची गरज नाही.

- जयवंत पवार

भाजपचे पदवीधर बालेकिल्ले का ढासळले?

जनसंघ आणि भाजपच्या राजकीय प्रवासात नागपूर आणि पुणे यांसारखे पदवीधर मतदारसंघ हे पक्षाचे सर्वात बळकट आणि हक्काचे किल्ले मानले जात होते. रामजीवन चौधरी, गंगाधरराव फडणवीस आणि नितीन गडकरी यांच्यापासून ते प्रकाश जावडेकर आणि चंद्रकांत पाटील यांच्यापर्यंत अनेक दिग्गज नेत्यांनी या मतदारसंघांवर दशकोंराज्य केले. मात्र, गेल्या काही निवडणुकांपासून या दोन्ही बालेकिल्ल्यांमध्ये भाजप सातत्याने अपयशी ठरत आहे. या ऐतिहासिक पडझडीमागे वैचारिक प्रवृत्तीपेक्षा पक्षाची संघटनात्मक पिछेहाट हेच सर्वात मोठे कारण ठरले आहे.

पदवीधर मतदारसंघाची निवडणूक ही सामान्य निवडणुकांपेक्षा पूर्णपणे वेगळी असते. येथे दर सहा वर्षांनी जुनी मतदार यादी रद्द होऊन संपूर्ण नवीन मतदार नोंदणी करावी लागते. एकेकाळी घरोघरी, महाविद्यालयांत आणि कार्यालयांत जाऊन पदवीधरांचे फॉर्म भरून घेणारी भाजपची यंत्रणा अलीकडच्या काळात सुस्तावली. पक्षाला आपल्या जुन्या नावावर आणि अतिआत्मविश्वासावर राहिला. दुसरीकडे, विरोधी पक्षांनी अत्यंत नियोजनबद्धरीतीने मतदार नोंदणीत बाजी मारली आणि आपली हक्काची व्होट बँक तयार केली.

या अपयशामागे स्थानिक पातळीवरील संघटनात्मक संपर्क पूर्णपणे तुटणे हेही तितकेच कारणीभूत आहे. पदवीधर मतदार हा अधिक सुशिक्षित, जागरूक आणि स्वतंत्र विचार करणारा असतो. जुनी पेन्शन योजना बेरोजगारी, कंत्राटी भरती, प्राध्यापक-शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न आणि महागाई यांसारख्या रोजच्या ज्वलंत प्रश्नांवर हा वर्ग संवेदनशील असतो. परंतु, निवडणुकीच्या तोंडावर केवळ प्रचारपत्रके वाटण्यापलीकडे स्थानिक कार्यकर्ते या वर्गापर्यंत पोहोचू शकले नाहीत.मतदानाच्या दिवशी आपला मतदार घराबाहेर काढून केंद्रापर्यंत आणण्यात भाजपची पारंपरिक 'बुथ लेव्हल मॅनेजमेंट' आणि 'पन्ना प्रमुख' यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरली.थोडक्यात सांगायचे तर, नागपूर आणि पुणे पदवीधर मतदारसंघांमधील हा पराभव कुठल्याही राजकीय लाटेमुळे झालेला नाही, तर तो संघटनात्मक अकार्यक्षमता, मतदार नोंदणीतील कुचराई आणि कार्यकर्त्यांचा सुशिक्षित मतदारांशी तुटलेला प्रत्यक्ष संवाद यामुळे ओढवला आहे. हा पराभव भाजपसाठी भविष्यात आत्मपरीक्षण करण्याची मोठी घंटा आहे.

अविनाश देशपांडे

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त 80 हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

दिग्रस मतदारसंघातील ४७२ शाळांमध्ये उपक्रम, १ लाख ६० हजार रजिस्टर, प्रथमोपचार पेट्या आणि घड्याळांचे वितरण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ३० : राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त दिग्रस विधानसभा मतदारसंघातील दिग्रस, दारव्हा आणि नेर तालुक्यांतील ४७२ शाळांमधील सुमारे ८० हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन रजिस्टर आणि पॉपिन्स चॉकलेट, तर शाळांना प्रथमोपचार पेट्या आणि कार्यालयासाठी भिंतीवरील घड्याळे देण्यात आली. गेल्या २३ वर्षांपासून हा उपक्रम अविरतपणे सुरू आहे. २६ ऑक्टोबर रोजी ग्रामीण आणि शहरी भागांतील शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे आणि शाळांच्या मूलभूत गरजांना हातभार लावणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. दिग्रस मतदारसंघातील तिन्ही तालुक्यांमध्ये मिळून ८० हजार विद्यार्थ्यांना एकूण एक लाख ६० हजार रजिस्टर वितरित करण्यात आले. विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून ८० हजार पॉपिन्स चॉकलेटचेही वाटप करण्यात आले. याशिवाय शाळांमध्ये किरकोळ दुखापतींवर तातडीने प्राथमिक उपचार करता यावेत, यासाठी प्रथमोपचार पेट्या आणि शालेय कामकाजाच्या वेळेचे नियोजन सुलभ व्हावे, यासाठी कार्यालयांमध्ये भिंतीवरील घड्याळे देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध होण्यास मदत झाली. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य मिळाल्याने पालकांवरील शैक्षणिक खर्चाचा काही प्रमाणात भार हलका होण्यास हातभार लागणार आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीनेही या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी दिग्रस, दारव्हा आणि नेर तालुक्यांतील शिवसेना, युवासेना, विद्यार्थी सेना, महिला आघाडी आणि युवतीसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिकांनी परिश्रम घेतले.

१७० शाळांतील ३३ हजार विद्यार्थ्यांना लाभ

दिग्रस शहर आणि तालुक्यातील १७० शाळांमधील ३३ हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन याप्रमाणे ६६ हजार रजिस्टरचे वाटप करण्यात आले. याशिवाय ३३ हजार विद्यार्थ्यांना पॉपिन्स चॉकलेट देण्यात आले. शाळांसाठी प्रथमोपचार पेट्या आणि कार्यालयीन वापरासाठी घड्याळांचेही वितरण करण्यात आले.

दारव्हा : २६ हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

दारव्हा शहर व तालुक्यातील १६० शाळांमधील २६ हजार विद्यार्थ्यांना ५२ हजार रजिस्टर आणि २६ हजार पॉपिन्स चॉकलेटचे वाटप करण्यात आले. पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या २३ वर्षांपासून शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम राबविला जात असल्याची माहिती आयोजकांनी दिली. शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, युवतीसेना आणि विद्यार्थी सेनेच्या कार्यकर्त्यांनी उपक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला.

नेर : २१ हजार विद्यार्थ्यांना मदतीचा हात

नेर शहर व तालुक्यातील १४२ शाळांमधील २१ हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन याप्रमाणे ४२ हजार रजिस्टर आणि २१ हजार पॉपिन्स चॉकलेटचे वाटप करण्यात आले. शाळांना प्रथमोपचार पेट्या व घड्याळे देण्यात आली. तिन्ही तालुक्यात साहित्य वितरणाच्या वेळी शिवसेना, युवासेना, महिला आघाडीचे पदाधिकारी, विभागप्रमुख आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

नळ कोरडे, प्रशासनाचे दुर्लक्ष! गोचर स्वामी वार्डवासीयांचा संताप

नगरसेविका करुणा कुबडे यांच्या नेतृत्वाखाली मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

उमरखेड, दि. ३० : शहरातील गोचर स्वामी वार्ड क्रमांक १० मध्ये अनियमित आणि असमान पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांचे हाल होत असून, नगरपालिकेच्या कारभाराविरोधात वार्डवासीयांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करण्याची वेळ आली असताना प्रशासन मात्र समस्येकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. भलगे यांच्या घरापासून ते वर्मा यांच्या घरापर्यंतच्या गल्लीतील अनेक नळांना अत्यंत कमी दाबाने पाणी येते, तर काही ठिकाणी पाणीपुरवठाच होत नाही. विशेष म्हणजे, शहरातील इतर वार्डांत नियमित पाणी मिळत असताना गोचर स्वामी वार्डावरच अन्याय का, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांकडे वारंवार तक्रार करूनही ठोस उपाययोजना झालेली नाही. अखेर नगरसेविका करुणा पुंडलिक कुबडे यांच्या नेतृत्वाखाली संतप्त नागरिकांनी नगर परिषदेत धडक देत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. वृद्ध, महिला आणि लहान मुलांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असून, दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. प्रशासनाने केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष उपाययोजना करून वार्डातील पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला. यावेळी पुंडलिक कुबडे, अ‍ॅड. श्याम भलगे, सुधीर महाजन, रमाकांत टाक, गजानन बेद्रे, नंदकिशोर पारीक यांच्यासह महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात

पत्रकार महिलेच्या तक्रारीला पुसद पोलिसांकडून केराची टोपली?

डीवायएसपींकडे स्वतंत्र चौकशीची मागणी,सीसीटीव्ही तपासण्याचे आवाहन

पुसद : पत्रकार तथा समाजसेविका रेश्मा लोखंडे (शिंदे) यांच्या तक्रारीची दखल घेण्यास पुसद शहर पोलिसांकडून टाळाटाळ झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. महाराजा ज्वेलर्सचे मालक ओंकार रेवणवार यांच्याविरुद्ध जातीवाचक व वैयक्तिक शिवीगाळ केल्याची तक्रार त्यांनी केली असून, पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. २७ ऑक्टोबर रोजी सोनार लाईन परिसरात दुचाकी पार्किंगवरून वाद झाला. यावेळी संबंधित ज्वेलर्स मालकाने अपमानास्पद शब्द वापरल्याचा आरोप रेश्मा लोखंडे यांनी केला आहे. शहर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्यानंतर ठाणेदार क्षीरसागर व कर्मचारी शेख वसीम यांनी सहकार्य केले नाही, तसेच जबानीतील मजकूर बदलल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार देऊन स्वतंत्र चौकशी, पोलीस ठाणे व घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज जतन करण्याची मागणी करण्यात आली आहे. महिला पत्रकाराच्या तक्रारीची निष्पक्ष चौकशी होणार की पोलिसांच्या भूमिकेवर पडदा टाकला जाणार? तक्रारदाराने उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे आता पोलीस प्रशासनाला द्यावी लागणार आहेत. न्याय न मिळाल्यास मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

तीन महिने उलटले, दुकान गाळ्याच्या अर्जाला उत्तरच नाही!

ग्रामसेवकावर दफ्तर दिरंगाईच्या कारवाईची मागणी.

महागाव : हिवरा (संगम) ग्रामपंचायतीच्या दुकान गाळ्यासाठी अर्ज करून तीन महिने उलटले, तरी अर्जदाराला साधे लेखी उत्तरही मिळाले नसल्याचा आरोप समोर आला आहे. या कथित प्रशासकीय दिरंगाईप्रकरणी ग्रामसेवकावर दफ्तर दिरंगाई कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी सुरेश दत्तराव शिंदे यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनातून केली आहे. शिंदे यांनी ३१ जुलै २०२६ रोजी दुकान गाळा भाडेतत्त्वावर मिळण्यासाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज केला होता. आवश्यक अटी पूर्ण करण्याची तयारी दर्शवूनही अर्जावर निर्णय झाला नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. वारंवार विचारणा करूनही प्रतिसाद मिळाला नसल्याने ग्रामसेवक प्रशांत ठाकरे यांनी कर्तव्यात कुचराई केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाशी संबंधित दुकान गाळ्यांच्या भाडेप्रकरणात पारदर्शकता आणि स्पष्ट धोरण असणे अपेक्षित असताना अर्जदाराला तीन महिने प्रतीक्षेत का ठेवण्यात आले, असा सवाल उपस्थित होत आहे. गाळा देता येत नसेल, तर त्याबाबत लेखी उत्तर देण्यास अडचण काय, असा प्रश्नही पुढे आला आहे. प्रकरणाची चौकशी करून विलंबाची कारणे निश्चित करावीत आणि दोषी आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.
ग्रामपंचायतीचे दुकान गाळे यापूर्वीच भाड्याने दिले आहेत. संबंधित गाळेधारकांकडे जुन्या भाड्याची रक्कम थकीत असून ती अद्याप जमा झालेली नाही. त्यामुळे सदर गाळा कोणालाही भाडेतत्त्वावर देता येत नाही, असे स्पष्टीकरण ग्रामसेवक प्रशांत ठाकरे यांनी दिले.

शिवसेनेच्या वतीने सिबला येथे भव्य मार्गदर्शन शिबिराचे आयोजन..

झरी : सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती मिळावी तसेच पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शिवसेना (शिंदे गट) यांच्या वतीने सिबला येथे भव्य मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.
रविवार, दिनांक १ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, वर्षाताई आणि प्रा. संजय मडावी यांच्या पुढाकारातून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे.
या शिबिरामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, निराधार योजना, श्रावणबाळ योजना, दिव्यांग योजना, विधवा योजना, घटस्फोटित महिलांसाठीच्या योजना तसेच इतर शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.
विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव, निराधार व्यक्ती आणि गरजू नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य केले जाणार आहे.
शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता त्यांचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचावा, हा या शिबिरामागील मुख्य उद्देश आहे.
तरी परिसरातील सर्व महिला, भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि गरजू लाभार्थ्यांनी या मार्गदर्शन शिबिराला मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

निवासी वस्त्यांत फटाक्यांचा साठा दुर्घटनेची वाट पाहताय का?

विनापरवाना विक्री आणि अग्निसुरक्षा नियमांचे उल्लंघन, तपासणीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

वणी, दि. ३० : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर वणी शहरातील निवासी वस्त्यांमध्ये सुरू असलेल्या फटाके विक्रीमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दाट लोकवस्ती आणि अरुंद रस्त्यांच्या परिसरात फटाक्यांची विक्री व साठवणूक होत असल्याने संभाव्य दुर्घटनेचा धोका नाकारता येत नाही. त्यामुळे दुर्घटना घडल्यानंतर जागे होण्यापेक्षा प्रशासनाने आताच तपासणी करून कारवाई करावी, अशी मागणी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शहरातील काही निवासी भागांत फटाके विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले असून, संबंधित दुकानदारांकडे सक्षम प्राधिकरणाचे वैध परवाने आहेत का, याची पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. परवान्याच्या अटी, साठवणुकीची जागा आणि शासनाच्या सुरक्षा नियमांचे पालन होत आहे की नाही, हे तपासणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. फटाके ज्वलनशील स्वरूपाचे असल्याने निष्काळजी साठवणूक नागरिकांच्या जीवितास आणि मालमत्तेस धोकादायक ठरू शकते. त्यामुळे दुकानदारांकडील अग्निशामक उपकरणे, विद्युत जोडणी, सुरक्षित साठवणूक आणि आपत्कालीन बाहेर पडण्याच्या मार्गांची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठी नगरपरिषद, पोलीस, अग्निशमन आणि महसूल विभागाने संयुक्त तपासणी मोहीम राबवावी. विनापरवाना विक्री किंवा नियमबाह्य साठा आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाची जबाबदारी केवळ परवाने देण्यापुरती मर्यादित नसून नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. एखादी दुर्घटना घडण्याची वाट प्रशासन पाहणार का? असा सवाल उपस्थित करीत तपासणी आणि कारवाईचा अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी घरचे सोयाबीन बियाणे वापरावे

घरगुती सोयाबीन बियाणे जतन व साठवणूक मोहीम

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ३० : एल निनोच्या प्रभावामुळे चालू वर्षात पर्जन्यमानात घट झाल्याने खरीप हंगामातील प्रमुख पिकांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. अमरावती विभागातील प्रमुख खरीप पीक असलेल्या सोयाबीनच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता लक्षात घेता, पुढील वर्षी बियाण्यांची उपलब्धता कमी पडण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर कृषी विभागामार्फत घरगुती सोयाबीन बियाणे जतन व साठवणुकीसाठी मोहीम राबविली जात आहे. या मोहिमे अंतर्गत पुढील वर्षी चांगल्या दर्जाचे व जास्त किमतीत सोयाबीन बियाणे उपलब्ध होण्यासाठी शेतकऱ्यांनी घरचे बियाणे वापरण्याचे आतापासूनच नियोजन करावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी, यवतमाळ यांनी केले आहे. ज्या शेतकऱ्यांकडे चांगल्या दर्जाचे सोयाबीन बियाणे उपलब्ध आहे, त्यांनी ते पुढील खरीप हंगामातील पेरणीसाठी राखून ठेवावे. समाधानकारक दर्जाचे सोयाबीन उत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांनी स्वतःच्या गरजेपुरते बियाणे जतन करावे. तसेच, परिसरातील गरजू शेतकऱ्यांनाही चांगल्या दर्जाचे बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करावे. यामुळे गावातच योग्य दर्जाचे बियाणे वाजवी दरात उपलब्ध होण्यास मदत होईल.

पुढील हंगामासाठी बियाणे राखून ठेवताना पिकाची योग्य पद्धतीने मळणी करावी. बियाण्याची उगवणक्षमता टिकवून ठेवण्यासाठी मळणी यंत्राचा आरपीएम ३५० ते ४०० पेक्षा कमी ठेवावा. वेगवेगळ्या वाणांचे बियाणे काढणी, मळणी आणि हाताळणीच्या वेळी एकमेकांत मिसळणार नाही, याची विशेष दक्षता घ्यावी. मळणी यंत्रामध्ये पूर्वीच्या पिकाचे अवशेष राहणार नाहीत, यासाठी यंत्र स्वच्छ करून घ्यावे. यामुळे वाणांची भेसळ टाळता येते. सोयाबीन बियाणे साठवणुकीच्या वेळी पोत्यांची अतिउंच थप्पी लावणे टाळावे. तसेच वाहतूक व हाताळणी करतांना बियाण्यांची आदळ आपट होणार नाही, याची दक्षता घ्यावी. बियाणे सुरक्षित राहील आणि त्याची उगवणक्षमता टिकून राहील, अशा पद्धतीने साठवणूक करावी. असे आवाहन तालुका कृषी अधिकारी, यवतमाळ यांनी केले आहे.

महागाव तालुक काँग्रेस कमेटीची कार्यकारीणी घोषीत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. ३० : तालुक्यातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची तालुका कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. या कार्यकारिणीची निवड, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ पक्षश्रेष्ठींच्या सहमतीने तालुका काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष सुनील राठोड यांच्या नेतृत्वात घोषित करण्यात आली आहे.

काल दि. २७ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता काँग्रेस पक्षाची महत्वपूर्ण बैठक तालुका काँग्रेस कमिटीच्या महागाव येथील कार्यालय, अध्यक्ष सुनील राठोड यांच्या सुचनेनुसार आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये महागाव तालुका काँग्रेस पक्षाच्या उपाध्यक्षपदाची महत्वपूर्ण जबाबदारी सुनील भरवाडे, प्रमोद जाधव, विलास मस्के, मनोज गावंडे पाटील उटी, शेख जमाल शेख बादशाह यांच्यावर सोपवण्यात आली आहे. तर तालुका सरचिटणीसपदी जयवंतराव जाधव यांची नियुक्ती करण्यात आली व सचिवपदी केदार पानपट्टे यांची निवड करण्यात आली असून, कोषाध्यक्ष पदी सुनील भवानकर कलगाव यांची वर्णी लागली आहे. व तसेच इतरही सरचिटणीस पदाजी निवड करण्यात आली. यामध्ये गजानन सुभाष तायडे, नागोराव वऱ्हाडे करंजी, शरद चव्हाण, संदीपराव कदम, विलासराव गावंडे महागाव, अर्जुन शामराव रणमले, मुकिंदा जाधव,लक्ष्मी रमेश पवार, मैबूबखा पठाण यांची तसेच सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांनी तालुक्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची पक्षाची विचारधारा, ध्येय धोरण तसेच पक्षाचे मजबुतीकरण करण्यात यावे यासाठी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील राठोड यांच्या नेतृत्वात ही कार्यकारी घोषीत केली आहे.

कासावार महाविद्यालयात प्रवेश प्रेरणा कार्यक्रम उत्साहात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि. ३० : फार्मसी शिक्षणातून केवळ व्यावसायिक संधीच नव्हे, तर आरोग्यसेवेतील सामाजिक जबाबदारीही पार पाडता येते, असा संदेश देत कासावार कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, झरी येथे डी. फार्मसी प्रथम वर्षाच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत तथा प्रवेश प्रेरणा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाची ओळख, फार्मसी क्षेत्रातील करिअरच्या संधी आणि व्यावसायिक वाटचालीची दिशा देणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

प्रमुख पाहुणे म्हणून तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन के. गेडाम, तर प्रमुख अतिथी म्हणून राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एन. देशमुख उपस्थित होते. डॉ.गेडाम यांनी आरोग्य व्यवस्थेतील फार्मासिस्टचे महत्त्व, औषधनिर्माणशास्त्रातील

योगदान, सामाजिक बांधिलकी आणि व्यावसायिक नैतिकतेवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानासोबत व्यावहारिक कौशल्य, शिस्त आणि समर्पण आत्मसात करावे, असे आवाहन केले. डॉ. देशमुख यांनी मेहनत, जिद्द आणि सकारात्मक दृष्टिकोनातून यशस्वी करिअर घडविण्याचा कानमंत्र दिला. यावेळी प्राध्यापकांनी अभ्यासक्रम, प्रात्यक्षिके, महाविद्यालयीन सुविधा आणि रोजगाराच्या संधींची माहिती दिली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची उत्साहपूर्ण सांगता झाली.

जंतमुक्त बालपणासाठी आरोग्य विभागाची मोहीम!

१ ते १९ वर्षांच्या बालकांना जंतनाशक गोळ्या.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

ढाणकी, दि. ३० : बालकांचे आरोग्य निरोगी राखण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने २७ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेतून १ ते १९ वर्षे वयोगटातील बालकांना जंतनाशक औषध दिले जाणार असून, सुटलेल्या बालकांसाठी ३ नोव्हेंबर रोजी मॉप-अप डे आयोजित करण्यात येणार आहे.

अंगणवाडीतील बालके, पहिली ते बारावीतील शासकीय, खासगी व आश्रमशाळेतील विद्यार्थी तसेच शाळाबाह्य मुलांचा मोहिमेत समावेश आहे. वयोगटानुसार २०० व ४०० मिलीग्रॅम औषध दिले जाणार आहे. एक वर्षाखालील बालकांना औषध देऊ नये, तसेच

आजारी बालकांना वैद्यकीय सल्ल्याशिवाय गोळी देऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. केवळ औषध वाटप करून मोहीम यशस्वी होणार नाही, तर प्रत्येक पात्र बालकाने गोळी घेतली आहे की नाही, याची खात्री करणेही आवश्यक आहे. त्यामुळे पालक, शिक्षक व अंगणवाडी सेविकांनी सक्रिय सहभाग नोंदवून बालकांना जंतमुक्त करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती मुनेश्वर यांनी केले आहे.

वडिलांच्या दूरदृष्टीला लेकीच्या कर्तृत्वाची पीएच.डी.ची मोहोर!

पाचही मुलींना उच्चशिक्षित करणाऱ्या वडिलांचा आदर्श

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पांढरकवडा, दि. ३० : मुलींच्या शिक्षणाला मर्यादा घालणाऱ्या संकुचित मानसिकतेला कृतीतून उत्तर देत मरियम बेगम अबुजर यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली. वडिलांची दूरदृष्टी, पतीचे सहकार्य आणि स्वतःच्या जिद्दीच्या बळावर त्यांनी मुस्लिम समाजातील मुलीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून त्यांनी “Hydrobiological Investigation on the Ecological Status of Saikheda Dam, Dist. Yavatmal” या विषयावर संशोधन पूर्ण केले. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक डॉ. सुजाता शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे यश मिळविले.

मरियम यांच्या यशामागे त्यांचे वडील मोहम्मद अबुजर यांची शिक्षणाप्रती असलेली दूरदृष्टी महत्त्वपूर्ण ठरली. जामा मस्जिद, पांढरकवडा येथे माजी इमाम म्हणून कार्य केलेल्या मोहम्मद अबुजर यांनी आपल्या पाचही मुलींना उच्चशिक्षित केले. मुलीही शिक्षणाच्या जोरावर यशाची शिखरे गाठू शकतात, हे त्यांनी सिद्ध केले. या प्रवासात पती शेख आबिद (थ्री-व्हीलर मेकॅनिक) आणि बंधू अबू ताला (इंजिनिअर) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ऑनलाइन डिफेन्स व्हायव्हाच्या वेळी प्राचार्य डॉ. अजय सोलंके अध्यक्षस्थानी होते. विद्यापीठाचे अधिकारी, संशोधन परीक्षक आणि विषय तज्ज्ञ उपस्थित होते. मरियम यांचे यश म्हणजे मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणारा आणि सामाजिक मानसिकतेला नवी दिशा देणारा आदर्श आहे.

कमी पाण्यातील शेतीसाठी पीक नियोजनाचा मंत्र!

फाळेगाव येथे किसान गोष्टी कार्यक्रम उत्साहात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

बाभुळगाव, दि. ३० : बदलत्या हवामानाचा सामना करताना शेतीचा उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता टिकविण्यासाठी संतुलित खतवापर, सेंद्रिय निविष्ठा आणि पाण्याचे काटेकोर व्यवस्थापन आवश्यक आहे. उपलब्ध पाण्याचा विचार करून कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड करावी, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दीपक कछवे यांनी केले. कृषी विभागाच्या आत्मा योजनेंतर्गत मंगळवारी (दि. २७ ऑक्टोबर) फाळेगाव येथे किसान गोष्टी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डॉ. कछवे यांनी `खेत बचाव अभियान` अंतर्गत

जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी रासायनिक खतांचा संतुलित वापर, सेंद्रिय खतांचा अवलंब आणि अनावश्यक खतांवरील खर्च टाळण्याचे महत्त्व पटवून दिले. कमी पाण्यात शेती करताना सूक्ष्म सिंचनाचा वापर, फळबागांचे संरक्षण तसेच रब्बी हंगामातील मोहरी, जवस आणि ज्वारी पिकांच्या नियोजनाबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीक पद्धतीत बदल करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. आत्माचे बीटीएम गजानन घाटे यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना, महिला शेतकरी नोंदणी, महाविस्तार ॲप, नैसर्गिक शेती आणि पीक प्रात्यक्षिक योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सागर धवणे होते. यावेळी प्रगतिशील शेतकरी विनोद गुल्हाणे, संजय खरपकर आणि प्रवीण धवणे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

साडेचार वर्षांच्या श्रवणदोष असलेल्या बालकावर 'कॉक्लियर इंप्लांट'

सुपर स्पेशालिटीत यशस्वी शस्त्रक्रिया

अमरावती/का.प्र.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे सातवी कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. साडेचार वर्षांच्या जन्मतः श्रवणदोष असलेल्या बालकावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली.

जिल्ह्यातील आष्टी येथील रहिवासी असलेल्या या बालकाच्या कुटुंबीयांना समाजमाध्यमांद्वारे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी बालकाला रुग्णालयात आणून रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी व ईएनटी सर्जन डॉ. मंगेश मेंढे यांची भेट घेतली. आवश्यक वैद्यकीय तपासण्या केल्यानंतर बालकावर कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हा नियोजन समिती आणि प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ही शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आली. या शस्त्रक्रियेनंतर त्या बालकाला नव्या ऐकू येणाच्या जगाची दारे खुली झाले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत सातवी कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने शासकीय आरोग्यसेवेतून आधुनिक आणि विशेष वैद्यकीय उपचार सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे.

सदर शस्त्रक्रिया विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील कान-नाक-घसा (ईएनटी) विभागाचे प्रमुख डॉ. जीवन वेदी आणि विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे ईएनटी सर्जन डॉ. मंगेश मेंढे यांनी ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. सदर शस्त्रक्रियेमधे भूलतज्ञ डॉ. चेतन रोंघे, डॉ.बाळकृष्ण बागवाले, डॉ अश्विनी मढावी, ऑडियोलॉजिस्ट लक्ष्मण मोरे, वैद्यकीय अधिकारी डॉ उज्वला मोहोड, समाजसेवा अधीक्षक शीतल बोंडे, ऋषिकेश धस, महात्मा फुले जन आरोग्य योजनेमधील डॉ पायल रोकडे, डॉ दिव्यांनी मुंदाने, रजत हूमने, फार्मासिस्ट योगेश वाडेकर, बायोमेडिकल इंजीनियर शुभम बैरागडे , अधिसेविका चंदा खोडके, मालती प्रधान, इंचार्ज सिस्टर अलका मोहोड, सुनिती हरणे, वैशाली नगराळे, दीपिका वाठोडकर, कल्याण नगराळे, राहुल वायझाडे, शुभम गवई, अभिषेक निचत, यश गवई, यश घुगल, पुष्पा तायडे, लक्ष्मी सरडे, शुभांगी टिंगणे , प्रतीक्षा भगत, मनीषा कामेकर, प्रतीक्षा राऊत, दीक्षा गवई, जोत्स्ना कांबळे, स्वाती घवळे, शीतल सानप, सुचित्रा खराते, जोत्स्ना खोब्रागडे, आदिती टके, स्नेहा राठोड, ममता इरटकर, तेजस्विनी पवार, आकाश मनोहरे, राणी इंगळे, संगम उमरे, ज्ञानेश टांगेवर, सागर, गणोरकर, राहुल कवनपुरे, शाकिब मोहम्मद, नंदलाल राठोड यांचे शस्त्रक्रियेत मोलाचे सहकार्य होते.

महाविद्यालयात स्व. रामचंद्रजी पोटे पाटील यांचा स्मृतिदिन

अमरावती - पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे आधारस्तंभ स्वर्गीय रामचंद्रजी पोटे पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भावपूर्ण अभिवादन करण्यात आले तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.स्वर्गीय रामचंद्रजी पोटे पाटील यांनी शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी दिलेले योगदान, त्यांची दूरदृष्टी आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी सदैव स्मरणात राहणारी आहे.त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या विचारांतून समाजप्रबोधन, ग्रामविकास, मानवतेचा संदेश दिला.

महानगरपालिकेची थकबाकीदार मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई

५ ते ६ वर्षांपासून मालमत्ता कर थकीत

अमरावती/का.प्र.

अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या निर्देशानुसार, पूर्व झोन क्रमांक ३ अंतर्गत दस्तूरनगर हद्दीतील मालमत्ता कर थकबाकीदारांवर महानगरपालिकेने कठोर कारवाई केली आहे. ५ ते ६ वर्षांपासून मालमत्ता कराचा भरणा न करणाऱ्या दोन मालमत्तांवर दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी सील लावण्याची कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान वार्ड क्रमांक ए-७ मधील धारक श्री. प्रकाश त्र्यंबकराव बल्हाळ यांच्या मालमत्ता क्रमांक २७०२ वर २ लाख ५७ हजार ५७६ रुपये, तर धारक श्री. किशोर बागडे यांच्या मालमत्ता क्रमांक ११३१ वर १ लाख ९ हजार ८९१ रुपये इतका मालमत्ता कर थकीत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या दोन्ही मालमत्तांवरील एकूण थकबाकी ३ लाख ६७ हजार ४६७ रुपये इतकी आहे.

महानगरपालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या या मोहिमेत झोन क्रमांक ३ चे सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, क्षेत्रीय अधिकारी प्रवीण ठाकरे तसेच ए-७ चे कर लिपिक राज डेंडूले, आकाश चौधरी, सिध?दांत गाडे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत संबंधित मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली.

निसर्गरम्य दत्तगडावर शिक्षण परिषद

मूल्यवर्धन उपक्रमांतर्गत शिक्षकांचा कृतीशील सहभाग; नावीन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण

नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर

नांदगाव खंडेश्वर केंद्राची शिक्षण परिषद शिरपूर येथील निसर्गरम्य दत्तगड परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या शिक्षण परिषदेचे अध्यक्ष जामिरोद्दीन सर केंद्रप्रमुख अनिल कोल्हे सर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी माजी केंद्रप्रमुख जफर अली ,मूल्यवर्धन उपक्रमाचे मार्गदर्शक विवेक मालगे सचिन अवघड हे उपस्थित होते.

या शिक्षण परिषदेत मूल्यवर्धन या विषयावर शिक्षकांना कृतीशील व प्रात्यक्षिकाधारित मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये विविध जीवनमूल्ये रुजविण्यासाठी अध्यापनात कोणत्या नावीन्यपूर्ण पद्धतींचा वापर करता येईल, याचे प्रात्यक्षिकांसह विवेचन करण्यात आले. यामध्ये शिक्षकांनी स्वतः बालकांच्या भूमिकेत सहभागी होत बडबडगीते, भूमिकाभिनय आणि विविध कृतींच्या माध्यमातून आनंददायी शिक्षणाचा अनुभव घेतला. या उपक्रमांमुळे मूल्यशिक्षण अधिक रंजक, प्रभावी आणि विद्यार्थीकेंद्रित पद्धतीने कसे देता येईल, याची जाणीव शिक्षकांना झाली.केंद्रप्रमुख अनिल कोल्हे यांनी केंद्रातील विविध शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक करून संबंधित शिक्षकांचा गुणगौरव केला. तसेच, अशा उपक्रमांना प्रोत्साहन देत त्यांचे उपक्रम केंद्रातील इतर शाळांनीही राबवावे असे आवाहन केले.. या वेळी शिक्षकांनी आपल्या शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे सादरीकरण केले. उपक्रमांच्या अनुभवांची देवाणघेवाण झाल्यामुळे उपस्थित शिक्षकांना नवीन कल्पना मिळाल्या. तसेच, हे उपक्रम आपल्या शाळांमध्येही राबविता येतील, असा विश्वास निर्माण झाला.या शिक्षण परिषदेचे आयोजन जिल्हा परिषद शाळा, शिरपूर बेडा व जिल्हा परिषद शाळा, शिलोडा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन वसंत मून प्रास्ताविक वंदना ढगे माधवी कहाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

अमरावतीच्या डॉ. आंचल राठी एम.डी. परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम!

गोल्ड मेडल मिळवून कुटुंबाचा गौरव वाढविला

अमरावती/का.प्र.

प्रतिभा, कठोर परिश्रम आणि दृढसंकल्पाच्या बळावर यशाची नवी शिखरे गाठत अमरावतीच्या डॉ. आंचल तेजस राठी यांनी वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या एम.डी. (मेडिसिन) परीक्षेत महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक मिळवत त्यांनी सुवर्णपदक पटकावले आहे. त्यांच्या या गौरवास्पद यशामुळे राठी व काबरा परिवारासह अमरावती आणि नांदेड येथे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

डॉ. आंचल यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथून आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची झलक यापूर्वीही पाहायला मिळाली होती. २०१७ मध्ये झालेल्या नीट युजी परीक्षेत फिजिक्स विषयात लाखो विद्यार्थ्यांमधून त्यांनी देशात प्रथम क्रमांक मिळविला होता. आता एम.डी. (मेडिसिन) परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम स्थान पटकावत त्यांनी आपल्या प्रतिभेचा आणि मेहनतीचा पुन्हा एकदा प्रत्यय दिला आहे.डॉ. आंचल तेजस राठी ह्या अमरावती येथील स्वागत मेडिकलचे संचालक दिनेश माणकलाल राठी आणि अलका राठी यांच्या सून आहेत. त्या डॉ. सौरभ राठी (एम.डी.एस.) आणि डॉ. अश्विनी राठी (बी.डी.एस.) यांच्या परिवाराचाही भाग आहेत. त्यांचे पती डॉ. तेजस राठी सध्या डी.एम. गॅस्ट्रोलॉजी या विषयातील उच्च वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील दोघांचीही शैक्षणिक वाटचाल संपूर्ण परिवारासाठी अभिमानाचा विषय ठरली आहे. डॉ. आंचल यांना वैद्यकीय सेवेचा समृद्ध कौटुंबिक वारसाही लाभला आहे. त्या नांदेड येथील सुप्रसिद्ध फिजिशियन स्वर्गीय डॉ. किशनलाल काबरा यांच्या नात आहेत. त्यांचे वडील डॉ. अतुल काबरा आणि आई डॉ. जयश्री काबरा हे नांदेडमधील प्रतिष्ठित वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व आहेत. याशिवाय, त्या नांदेड येथील प्रसिद्ध श्रीनाथ ज्वेलर्सचे संचालक अरुण काबरा यांच्या पुतणी आहेत.त्यांचे हे यश केवळ परिवारासाठी अभिमानाचा क्षण नसून, वैद्यकीय क्षेत्रात करिअर घडविण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणारे आहे. डॉ. आंचल यांच्या या देदीप्यमान यशाबद्दल राठी व काबरा परिवारातील सदस्य, नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे दोन्ही परिवारांमध्ये आनंद आणि अभिमानाचे वातावरण आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या मदतीसाठी अचलपूर तहसीलचा पुढाकार!

७० कुटुंबांना अंत्योदयचा लाभ;विद्यार्थ्यांचे शुल्क माफ, बियाणे व शेती साहित्याचे वाटप उपविभागीय अधिकाऱ्यांचे आवाहन

अचलपूर/वार्ताहर

शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नाही, हाताला जोडधंदा नाही आणि आर्थिक संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नसल्याने अनेक शेतकरी हवालदिल होतात. यातून काही शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. घरातील कर्ता पुरुष गमावल्यानंतर संपूर्ण कुटुंबाचा आधार हरवतो. ही उणीव कोणीही भरून काढू शकत नाही.मात्र, अशा संकटग्रस्त कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ देऊन त्यांना आधार देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. याच संवेदनशील भावनेतून अचलपूरचे तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी पुढाकार घेत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी विशेष शिबिर आयोजित केले. राज्यात प्रथमच अशा स्वरूपाचा उपक्रम राबविण्याच्या या प्रयत्नाचे कौतुक करताना, प्रशासनातील सर्व विभागांनी हा उपक्रम केवळ काम म्हणून नव्हे, तर आपली

जबाबदारी समजून पार पाडावा, असे भावनिक आवाहन उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी केले.

अचलपूर येथे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, या उद्देशाने आयोजित विशेष शिबिरात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर तहसीलदार सुदर्शन शहारे, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे जिल्हा समन्वयक नेत्रदीप चौधरी, गटविकास अधिकारी कल्पना जायभाये, तालुका कृषी अधिकारी अक्षय क्षिरसागर, सहा निबंधक परेश गुल्हाने,बालविकास प्रकल्प अधिकारी वैभवकुमार नेपाते,गटशिक्षणाधिकारी मयूर यादव, नायब तहसीलदार मनीष देशमुख, अनिल पोटे, निरीक्षण अधिकारी राहुल केदारे आदी मान्यवर उपस्थित होते.प्रास्ताविकात तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी शिबिरामागील भूमिका स्पष्ट केली. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाच्या विविध विभागांच्या योजनांचा लाभ तातडीने मिळावा आणि त्यांना प्रशासकीय प्रक्रियेसाठी वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यापुढेही संबंधित कुटुंबांना प्रशासकीय अडचणी आल्यास संपूर्ण प्रशासन तत्परतेने प्रकरणे निकाली काढून योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कटिबद्ध राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.संचालन रोशन महानकर यांनी केले. शिबिराच्या यशस्वितेसाठी मनोज रोंघे, सतीश कापडे, सत्यपाल आठवले, संदीप गडम, जयश्री डांगे, वासुदेव म्हरसकोल्हे, रोशन मोरे यांच्यासह संबंधित विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

चांदूर रेल्वे ते नांदगाव खंडेश्वर रस्ता प्रवाशांची डोकेदुखी

चांदूर रेल्वे/वार्ताहर

चांदूर रेल्वे ते नांदगाव खंडेश्वर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत येणाऱ्या डी.पी.रोडचे बांधकाम युद्धस्तरावर सुरू आहे. रोज ह्या रस्त्याने ये-जा करणाऱ्या प्रवाश्यानी ह्या रस्त्याच्या बांधकामामध्ये मनमानी कारभार होत असल्याचे आरोप करीत असल्यामुळे ह्या रोड ने रोज ये-जा करणाऱ्या प्रवाश्याना व माल वाहतूक दळणवळणास खूप जास्त त्रास सहन करावा लागत आहे .जाण्या येण्याकरिता व्यवस्थित रस्ता नसल्यामुळे मोठ्या अपघाताचेही शक्यता राहू शकते असेही मत अनेक नागरिकांचे आहे.रस्त्याच्या बांधकामामुळे प्रचंड प्रमाणात धुळीचे साम्राज्य वाढत असून प्रवाश्यांच्या डोळयात धूळ जाऊन छोटे मोठे अपघात सुध्दा होण्याची दाट शक्यता आहे. ह्याच रस्त्याला धानोरा,पळसखेड,भिलटेक, सोनोरा,एकपाळा,राजुरा असे अनेक गांवे जोडल्या गेली असल्यामुळे ग्रामीण भागातून चांदूर शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना,नागरिकांना तसेच कर्मचाऱ्यांना सुध्दा मोठया त्रासाला समोरे जावे लागत आहे.

■ 'नांदगाव रोडच्या बांधकामामुळे आम्हा रोज अपडाऊन करणाऱ्या कर्मचारी व प्रवास्यांना तसेच विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास होत आहे.तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने किंवा ह्या कामाचा कंत्राट ज्याही ठेकेदाराकडे असेल त्यांनी लगेच उपाययोजना करून जनतेचा त्रास कमी करावा.'

-नितीन कोकाटे

आज 'ग्लॅम ब्राइडल मेकअप, फोन रील फोटोग्राफी आणि एक्सलन्स अवॉर्ड्स सेमिनार'चे आयोजन

अमरावती/का.प्र.

शहरातील सौंदर्य आणि मेकअप उद्योगातील व्यावसायिक, मेकअप आर्टिस्ट आणि ब्युटीशियन यांना नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देण्याच्या उद्देशाने, ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी 'ग्लॅम ब्राइडल मेकअप, फोन रील फोटोग्राफी आणि एक्सलन्स अवॉर्ड्स सेमिनार'चे आयोजन करण्यात येत आहे. हा विशेष सेमिनार सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत द प्राइम पार्क, अमरावती येथे आयोजित केला जाईल.

या कार्यक्रमाचे आयोजन व्हीएस (VS) आणि ग्लॅम दिवा ब्युटी अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने केले जात आहे. या सेमिनारमध्ये प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट आणि सौंदर्य शिक्षणतज्ञ संगीता आहुजा आणि मोबाईल फोटोग्राफी तज्ञ नंदन मुजुमदार सहभागींना मार्गदर्शन करतील.संगीता आहुजा अमरावतीमध्ये सौंदर्य आणि मेकअप शिक्षण क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत. ग्लॅम दिवा ब्युटी अकादमीच्या माध्यमातून, त्या तरुण महिला आणि महत्त्वाकांक्षी व्यावसायिकांना व्यावसायिक मेकअप, हेअर स्टायलिंग, ब्रायडल मेकअप आणि सौंदर्य उद्योगाशी संबंधित आधुनिक तंत्रांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देतात. स्थानिक प्रतिभावंतांना योग्य मार्गदर्शन, कौशल्ये आणि आत्मनिर्भरतेच्या संधी उपलब्ध करून देणे, हे त्यांचे ध्येय आहे.

या सेमिनारमध्ये प्रगत ब्रायडल मेकअप तंत्र, दीर्घकाळ टिकणारे आणि न पसरणारे मेकअप बेस, वॉटरप्रूफ स्किन प्रेप, मोबाईल फोटोग्राफी, लायटिंग, मॉडेल पोझिशनिंग आणि इंस्टाग्राम रील्स व सोशल मीडियावर व्यावसायिक पोर्टफोलिओ तयार करणे या विषयांचा समावेश असेल. या कार्यक्रमाचे एक विशेष आकर्षण म्हणजे 'एक्सेलन्स अवॉर्ड्स सेरेमनी' असेल, जिथे सौंदर्य आणि मेकअप उद्योगातील सहभागींना त्यांच्या कार्यासाठी आणि कामगिरीसाठी सन्मानित केले जाईल. सहभागींना प्रमाणपत्रे, भेटवस्तू आणि उद्योग तज्ञांशी संवाद साधण्याची संधी देखील मिळेल. आयोजकांच्या मते, या उपक्रमाचा मुख्य उद्देश अमरावतीमधील मेकअप आर्टिस्ट आणि सौंदर्य व्यावसायिकांना पारंपरिक प्रशिक्षणाच्या पलीकडे जाऊन, आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग आणि सोशल मीडियाचा वापर करून आपला व्यवसाय पुढे नेण्यासाठी प्रेरित करणे हा आहे.

महानगरपालिकेचा दिवाळी २०२६ साठी पर्यावरणपूरक उपक्रम

लक्ष्मीमूर्ती संकलनाची जबाबदारी सहाय्यक आयुक्तांवर

अमरावती/का.प्र.

दिवाळी २०२६ च्या पार्श्वभूमीवर सर्वांगीण पर्यावरण संवर्धनासाठी अमरावती महानगरपालिकेने माता लक्ष्मीमूर्तींचे पर्यावरणपूरक पद्धतीने संकलन व विल्हेवाट लावण्याच्या कार्यपद्धतीला वाढता प्रतिसाद बघता, पाचही झोनचे सहाय्यक आयुक्त यांनी कुठेही आढळून येणाऱ्या मुर्त्या, फोटो संकलित करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त-२ कार्यालयाकडून सर्व सहाय्यक आयुक्तांना जबाबदारी निश्चित करून देण्यात आली आहे. याबाबत २८ ऑक्टोबर २०२६ रोजी अधिकृत आदेश जारी करण्यात आला.

महानगरपालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार, नागरिकांनी प्रतिष्ठापित केलेल्या लक्ष्मीमूर्ती सार्वजनिक जलस्रोतांमध्ये विसर्जित न करता, तसेच, कुठेही न ठेवता संबंधित झोन कार्यालयामार्फत संकलित करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक झोनच्या सहाय्यक आयुक्तांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील मूर्ती संकलनाची प्रमुख जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

झोननिहाय संकलन केंद्रांची व्यवस्था

प्रत्येक झोन कार्यालयात किंवा इतर योग्य ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र स्थापन करणे, संकलनासाठी आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करणे आणि कर्मचाऱ्यांना स्पष्ट जबाबदाऱ्या देणे, असे निर्देश आदेशात देण्यात आले आहेत. संकलित मूर्तींची सुरक्षित व्यवस्था करणे, तसेच स्वच्छता, सुरक्षा आणि नागरिकांच्या धार्मिक भावनांचा आदर राखून संकलन प्रक्रिया राबविण्याची सूचनाही करण्यात आली आहे.

मूर्ती संकलन प्रक्रियेवर नियमित देखरेख ठेवून दररोज संकलित झालेल्या मूर्तींचा संक्षिप्त अहवाल मुख्यालयात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आवश्यक सुविधा, साधनसामग्री आणि मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबरोबरच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उपक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करून घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

दिवाळीच्या सणादरम्यान सार्वजनिक जलस्रोतांचे प्रदूषण टाळणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि नागरिकांच्या धार्मिक भावनांचा सन्मान राखणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. महानगरपालिकेच्या या नियोजनामुळे नागरिकांना लक्ष्मीमूर्तींचे संकलन करण्यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध होणार असून, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून प्रयत्न केले जाणार आहेत.याकरिता, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, जागरूक नागरिकांनी संपर्क साधावा असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

मतपत्रिकेवरील पराभव हा ईव्हीएमच्या विश्वासार्हतेचा पुरावा नव्हे!

मतपत्रिकांवर झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसने किती जागा जिंकल्या, असा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित केलेला उपरोधिक प्रश्न हा केवळ विरोधकांच्या राजकीय कामगिरीवरील टोला नाही; ते भारतीय निवडणूक प्रक्रियेविषयी सुरू असलेल्या व्यापक वादाचे प्रतिबिंब आहे. ईव्हीएमऐवजी मतपत्रिकांचा आग्रह धरणाऱ्या विरोधकांच्या भूमिकेतील सुसंगती तपासणे जितके आवश्यक आहे, तितकेच मतदानपद्धतीची विश्वासार्हता केवळ पक्षांच्या विजय-पराजयावरून ठरविणेही अयोग्य आहे. कारण निवडणुकीतील पराभव हा राजकीय विश्लेषणाचा विषय असतो; परंतु मतदाराचा कौल अचूक नोंदविला जाणे हा लोकशाहीच्या वैधतेचा प्रश्न असतो. म्हणूनच मतपत्रिका विरुद्ध ईव्हीएम या चर्चेचा विचार इतिहास, तंत्रज्ञान, घटनात्मक तरतुदी, न्यायालयीन निर्णय आणि आंतरराष्ट्रीय अनुभव यांच्या आधारे करणे आवश्यक ठरते.

भारतीय निवडणूक व्यवस्थेचा इतिहास पाहिला, तर मतपत्रिकांपासून इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रांपर्यंतचा प्रवास हा तांत्रिक बदलापुरता मर्यादित नव्हता. १९५१-५२ मधील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून भारताने विशाल आणि वैविध्यपूर्ण लोकसंख्येला मतदानाचा अधिकार देण्याचे आव्हान स्वीकारले. त्या काळात मतपत्रिका, मतपेट्या, त्यांची वाहतूक, सुरक्षित साठवण आणि हाताने मतमोजणी ही निवडणूक व्यवस्थेची प्रमुख साधने होती. लोकशाहीचा विस्तार होत असताना या प्रक्रियेतील वेळ, मनुष्यबळ आणि व्यवस्थापनाचा खर्च वाढत गेला. मतपत्रिकेवर चुकीची खूण केल्यास मत अवैध ठरणे, मतमोजणीतील मानवी चुका, मतपेट्यांच्या सुरक्षिततेविषयी निर्माण होणारे प्रश्न आणि बूथ काबीज करण्यासारख्या गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्याची गरज यांमुळे पर्यायी मतदानपद्धतीचा विचार पुढे आला. अर्थात, या समस्या प्रत्येक निवडणुकीत उद्भवत होत्या, असा निष्कर्ष काढता येत नाही; मात्र पारंपरिक व्यवस्थेच्या मर्यादा नाकारताही येत नाहीत.

भारतात ईव्हीएमचा प्रायोगिक वापर १९ मे १९८२ रोजी केरळमधील परूर विधानसभा मतदारसंघातील ५० मतदान केंद्रांवर झाला. मात्र, त्या वेळी मतदानयंत्रांच्या वापरासाठी स्पष्ट वैधानिक तरतूद नसल्याने 'ए. सी. जोसे विरुद्ध सिवन पिल्लई' या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ५ मार्च १९८४ रोजी संबंधित मतदान यंत्राच्या वापरावरील आक्षेप मान्य केला. या निर्णयाने एक मूलभूत तत्त्व स्पष्ट केले : निवडणूक आयोगाला संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अंतर्गत व्यापक अधिकार असले, तरी विद्यमान कायदा आणि नियमांच्या विरोधात केवळ प्रशासकीय आदेशाने नवी मतदानपद्धती लागू करता येत नाही. त्यानंतर 'लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१' मध्ये कलम '६१-अ' समाविष्ट करण्यात आले. ही तरतूद १५ मार्च १९८९ पासून लागू झाली. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत देशभर ईव्हीएमचा वापर करण्यात आला. त्यामुळे भारतीय निवडणूक व्यवस्थेतील हा बदल कायदेशीर प्रक्रिया, तांत्रिक सुधारणा आणि प्रशासकीय अनुभव यांच्या आधारे घडला, हे लक्षात घेतले पाहिजे.

ईव्हीएमच्या वापराचे सर्वांत ठळक फायदे म्हणजे मतमोजणीचा वेग, अवैध मतांची शक्यता कमी होणे आणि मोठ्या निवडणुकांचे व्यवस्थापन तुलनेने सुलभ होणे. मतपत्रिकांमध्ये मतदाराने चुकीच्या पद्धतीने खूण केल्यास मत अवैध ठरू शकते; ईव्हीएममध्ये उमेदवाराच्या नावासमोरील बटण दाबून मतदान होत असल्याने ही समस्या मोठ्या प्रमाणात टाळता येते. मतदान प्रक्रिया नियंत्रित पद्धतीने चालत असल्याने बूथ काबीज करून अल्पावधीत मोठ्या प्रमाणात मते नोंदविण्याच्या पारंपरिक गैरप्रकारांवरही मर्यादा येऊ शकतात. मतमोजणीच्या वेळी प्रत्येक मतपत्रिका स्वतंत्रपणे तपासण्याची आवश्यकता कमी होते आणि निकाल लवकर जाहीर करता येतात. भारतासारख्या विशाल देशात या फायद्यांचे महत्त्व नाकारता येणार नाही. मात्र, वेगवान मतमोजणी म्हणजे आपोआप निष्पक्ष निवडणूक नव्हे; तांत्रिक कार्यक्षमता आणि लोकशाहीतील विश्वासार्हता या परस्परपूरक असल्या, तरी स्वतंत्र कसोट्या आहेत.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, सध्या वापरली जाणारी ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रे स्वतंत्रपणे कार्य करणारी असून ती इंटरनेटशी जोडलेली नसतात. व्हीव्हीपॅटमुळे मतदाराला आपण निवडलेल्या उमेदवाराचे नाव आणि चिन्ह असलेली छापील चिठ्ठी सुमारे सात सेकंद पाहता येते. त्यानंतर ही चिठ्ठी बंद पेटीत जमा होते. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत देशभरातील मतदान केंद्रांवर

व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात आला आणि सुमारे १७.४० लाख व्हीव्हीपॅट यंत्रे उपलब्ध होती. ही आकडेवारी निवडणूक प्रक्रियेचा प्रचंड विस्तार दाखवते. मात्र, यंत्रे इंटरनेटशी जोडलेली नाहीत किंवा त्यांच्यात तांत्रिक सुरक्षा उपाय आहेत, एवढ्यावरच सार्वजनिक विश्वासाची उभारणी होऊ शकत नाही. यंत्रांची सुरक्षित हाताळणी, मतदानापूर्वीच्या चाचण्या, सीलबंद साठवण, उमेदवारांच्या प्रतिनिधींची उपस्थिती आणि मतमोजणीनंतरची पडताळणी या सर्व टप्प्यांची परिणामकारकता महत्त्वाची आहे.

मतपत्रिकांच्या मर्यादांकडे पाहताना आणखी एक मुद्दा लक्षात घ्यावा लागतो. मतपत्रिकांची छपाई, वाहतूक, सुरक्षित साठवण, वर्गीकरण आणि मोजणी यांमध्ये मानवी हस्तक्षेप मोठ्या प्रमाणावर असतो. त्यामुळे चुका, मतांच्या वैधतेबाबत मतभेद आणि मतमोजणीतील विलंब होऊ शकतो. याउलट, ईव्हीएममुळे प्रक्रिया अधिक प्रमाणित होते; परंतु त्यात तांत्रिक बिघाड, प्रशासकीय त्रुटी किंवा सुरक्षिततेविषयी निर्माण होणाऱ्या शंकांसाठी स्वतंत्र पडताळणी आवश्यक असते. म्हणून मतपत्रिका म्हणजे पूर्ण सुरक्षितता आणि ईव्हीएम म्हणजे संपूर्ण धोका, अशी दोन्ही टोकांची मांडणी चुकीची आहे. कोणतीही पद्धत निर्दोष मानण्याऐवजी तिच्या मर्यादा ओळखून त्यावर नियंत्रण ठेवणारी व्यवस्था विकसित करणे हेच निवडणूक सुधारणांचे उद्दिष्ट असले पाहिजे.

या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय विशेष महत्त्वाचे आहेत. २०१३ मधील डॉ. सुब्रमण्यम स्वामी विरुद्ध भारत निवडणूक आयोग या प्रकरणात न्यायालयाने मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मतदाराचा विश्वास वाढविण्यासाठी व्हीव्हीपॅटसारख्या पडताळणी व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. पुढे २०१९ मध्ये व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांच्या पडताळणीचे प्रमाण वाढविण्यात आले. २६ एप्रिल २०२४ रोजी असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स विरुद्ध भारत निवडणूक आयोग या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमऐवजी संपूर्णपणे मतपत्रिकांकडे परतण्याची आणि सर्व व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांची शंभर टक्के मोजणी करण्याची मागणी मान्य केली नाही. त्याचवेळी न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने अतिरिक्त निर्देश दिले. या निर्णयाचा अर्थ ईव्हीएमविषयी प्रश्न विचारण्यास मनाई झाली, असा नाही; परंतु केवळ संशयाच्या आधारे विद्यमान पद्धत रद्द करण्याची मागणी न्यायालयाने स्वीकारली नाही, हे स्पष्ट आहे.

आंतरराष्ट्रीय अनुभवदेखील या चर्चेला व्यापक संदर्भ देतो. ब्राझिलने १९९६ मध्ये इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रांचा वापर सुरू केला आणि २००० पर्यंत ही व्यवस्था देशभर लागू केली. तेथील निवडणूक प्राधिकरणाने स्त्रोत-संहितेची तपासणी, सार्वजनिक सुरक्षा चाचण्या, डिजिटल स्वाक्षऱ्या आणि लेखापरीक्षणासाठी विविध उपाय विकसित केले आहेत. यावरून इलेक्ट्रॉनिक मतदानाचा वेग आणि व्यवस्थापनातील सुलभता दिसून येते; त्याचबरोबर तांत्रिक व्यवस्थेची स्वतंत्र तपासणी किती आवश्यक आहे, हेही स्पष्ट होते. जर्मनीचा अनुभव मात्र सार्वजनिक पडताळणीच्या कसोटीवर विशेष लक्ष वेधतो. २००९ मध्ये जर्मनीच्या संघीय घटनात्मक न्यायालयाने इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रांच्या संदर्भात असा सिद्धान्त मांडला की, निवडणुकीतील महत्त्वाचे टप्पे आणि निकाल निश्चित करण्याची प्रक्रिया सामान्य नागरिकांना विशेष तांत्रिक ज्ञानाशिवाय तपासता आली पाहिजे. याचा अर्थ प्रत्येक देशाने इलेक्ट्रॉनिक मतदान सोडून मतपत्रिकांकडे परतावे, असा नाही. उलट, कोणतीही तांत्रिक व्यवस्था स्वीकारताना तिचे कामकाज आणि निकाल स्वतंत्रपणे पडताळता येण्याची क्षमता हा लोकशाहीतील महत्त्वाचा निकष असला पाहिजे. एस्टोनियामध्ये इंटरनेटद्वारे मतदानाची वेगळी प्रणाली वापरली जाते; मतदारांना त्यांच्या इलेक्ट्रॉनिक मताची पडताळणी करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. मात्र, इंटरनेट मतदान आणि भारतातील मतदान केंद्रांवर वापरली जाणारी ईव्हीएम प्रणाली या भिन्न व्यवस्था असल्याने त्यांची सरळ तुलना करणे योग्य ठरणार नाही.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींच्या विधानाचा विचार केला, तर मतपत्रिकांवर झालेल्या निवडणुकांतील काँग्रेसच्या कामगिरीवर प्रश्न उपस्थित करणे हा राजकीय टीकेचा भाग असू शकतो. परंतु, एखाद्या पक्षाचा मतपत्रिकेवरील पराभव हा ईव्हीएमच्या तांत्रिक विश्वासार्हतेचा पुरावा ठरत नाही. त्याचप्रमाणे, ईव्हीएमविषयी शंका व्यक्त केली म्हणून विरोधकांची भूमिका आपोआप तथ्याधारित ठरत नाही. विरोधकांनी आपले आक्षेप पुराव्यांच्या आधारे मांडणे आणि सत्ताधाऱ्यांनी त्यांना उपरोधाऐवजी पारदर्शक प्रक्रियेतून उत्तर देणे, या दोन्ही गोष्टी लोकशाहीसाठी आवश्यक आहेत.

अर्थात, भारतीय लोकशाहीसमोरील प्रश्न केवळ मतपत्रिका की ईव्हीएम, असा नाही. कोणतीही मतदानपद्धती स्वीकारली, तरी मतदाराचा कौल अचूक नोंदवला गेला, त्याची योग्य मोजणी झाली आणि गरज पडल्यास त्याची स्वतंत्र पडताळणी करता आली, याची खात्री कशी निर्माण करायची, हा खरा प्रश्न आहे. ईव्हीएमचे फायदे आणि मतपत्रिकांच्या मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे; परंतु तंत्रज्ञानावरील विश्वास हा अंधस्वीकारातून नव्हे, तर पडताळणी आणि उत्तरदायित्वातून निर्माण होतो. लोकशाहीचा विजय एखाद्या पक्षाच्या राजकीय उपरोधात किंवा विरोधकांच्या आरोपांत नसतो; तो मतदाराच्या कौलाविषयी नागरिकांना वाटणाऱ्या विश्वासात असतो.

सत्यसाई पी. एम.

उद्योजक विजय शिंदे पर्यटनातून माणसं जोडणारा अवलिया!

आयुष्य म्हणजे एक सुंदर प्रवास आहे, आणि हा प्रवास ज्यांना निखळ आनंदाने, सामाजिक भान राखून आणि माणसांची मने जोडत जगता येतो, ते खऱ्या अर्थाने आयुष्य जगण्याचे मर्म जाणतात. आमचे अत्यंत लाडके मित्र, हरहुन्नरी उद्योजक आणि 'हौशी पर्यटक ग्रुप'चे प्रणेते विजय शिंदे आज आपल्या आयुष्याचे ६५ वर्ष पूर्ण करीत आहेत. त्यांच्या या अमृततुल्य आणि मंगलमय वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य लाभो, हीच प्रार्थना!

उद्योजक ते 'पर्यटक' मित्रः एक अथांग प्रवास

विजय शिंदे हे व्यवसायाने एक यशस्वी उद्योजक आहेत. व्यावसायिक क्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व आणि अनुभव मोठा आहे, परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची फिरण्याची आणि निसर्गाच्या सानिध्यात रमण्याची असलेली अफाट आवड.याच भटकेगिरीच्या आणि फिरण्याच्या आवडीतून त्यांनी 'हौशी पर्यटक ग्रुप'ची स्थापना केली. केवळ स्वतः फिरायचे नाही, तर आजूबाजूच्या लोकांना एकत्र घेऊन,एक मोठा परिवार तयार करून त्यांना वेगवेगळ्या सुंदर ठिकाणांची सफर घडवून आणणे, हा त्यांचा छंद अनेकांसाठी पर्वणी ठरला आहे. अंदमान हॉलिडेज च्या माध्यमातून त्यांनी शेकडो लोकांना प्रवासाचा आनंद मिळवून दिला आणि अनेकांची आयुष्ये समृद्ध केली.

सामाजिक जाणिवांचा ओलावा आणि सिद्धहस्त लेखक

फक्त फिरणे आणि फिरवणे एवढेच विजयभाऊंचे कार्य नाही,तर त्यांच्या मनात सामाजिक जाणिवेचा एक मोठा कोपरा आहे. समाजातील प्रत्येक घटकाविषयी त्यांना नितांत आदर आणि कळवळा आहे. त्यांच्या याच संवेदनशील मनाची ओळख त्यांच्या लेखनातून होते. फेसबुक आणि इतर माध्यमांवर ते सतत पर्यटन, निसर्ग आणि सामाजिक विषयांवर अत्यंत अभ्यासपूर्ण व प्रभावी लेखन करतात. त्यांच्या या दर्जेदार लेखनामुळे आणि ओघवत्या शैलीमुळे मी त्यांना गमतीने सोशल मीडियावरील 'सिद्धहस्त लेखक' म्हणतो.त्यांच्या लेखणीतून नेहमीच वैचारिक समृद्धी आणि सकारात्मकतेचा संदेश मिळतो,जो इतरांना प्रेरणा देतो.

सहकुटुंबीयांची भक्कम साथ

कोणत्याही यशस्वी पुरुषामागे कुटुंबाची

भक्कम साथ असते, आणि विजयभाऊंच्या या संपूर्ण प्रवासात सौ. संध्या वहिनींची तसेच सुपुत्र रोहित आणि रोहन यांची उत्तम साथ लाभली आहे.या सर्व धकाधकीतून मुलांना सेटले करणे ही कला सुद्धा त्यांनी साध्य केली. त्यांचा थोरला रोहित मुलगा पुण्यात संगणक इंजिनियर आहे तर धाकटा रोहन हा बंगलोरला CA आहे.तर त्यांची मोठी सून रसिका नामवंत आर्किटेक्ट आहे.कुटुंबाचा हा भक्कम आधार आणि प्रेमळ सहवासामुळेच विजयभाऊंना त्यांचे सामाजिक, व्यावसायिक आणि पर्यटन क्षेत्रातील उपक्रम अत्यंत लीलया आणि आनंदाने पार पाडता आले.

प्रेमाचा आणि आपुलकीचा माणूस

स्वभावाने अतिशय प्रेमळ, हसतमुख आणि सदैव मदतीसाठी तत्पर असणारे विजय शिंदे हे मित्र परिवाराचा कणा आहेत. त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांच्याबद्दल आपुलकी वाटते.मी हे सर्व त्यांच्या आणि माझ्या असलेल्या गेल्या अनेक वर्षाच्या मैत्रीतून लिहत आहे कारण त्यांच्या आयुष्यात घडलेल्या सुखादुःखाच्या प्रसंगाचा मी अनेकदा साक्षी राहलो आहे.!! आज ते त्यांच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण करून एका नव्या पर्वात पाऊल देत आहेत. आम्हा सर्व मित्रांच्या वतीने त्यांना उत्तम आरोग्य, शतायुषी आयुष्य आणि अखंड आनंद लाभो, याच मनःपूर्वक सदिच्छा!

प्रदीप दंदे
मो.९४२३६२२६२८

वाढदिवसानिमित्त..

माणुसकीची श्रीमंती जपणारा माणूस!

आयुष्याची श्रीमंती केवळ कमावलेल्या पैशांत मोजता येत नाही. ती मोजावी लागते जोडलेल्या माणसांत, जपलेल्या नात्यांत, इतरांना दिलेल्या आनंदात आणि आठवणींनी समृद्ध झालेल्या जगण्यात. काही माणसे स्वतःच्या आयुष्याचा प्रवास करताना इतरांच्याही वाटा सुंदर करतात. त्यांच्या सहवासातून जग पाहण्याची नवी दृष्टी मिळते आणि जगण्याविषयीची उमेद वाढते. पर्यटनाची आवड आणि माणसे जोडण्याची सहज वृत्ती यांचा सुरेख मिलाफ असलेले विजय शिंदे हे असेच एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व. त्यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा आणि स्वभावातील आपुलकीचा घेतलेला हा वेध.

वयाची पासष्टी म्हणजे अनुभवांनी समृद्ध झालेला टप्पा. सुख-दुःखाचे अनेक ऋतू पाहिल्यानंतर जगण्याकडे अधिक समजुतीने पाहण्याची दृष्टी या वयात लाभते. मात्र अनुभवांच्या जोडीला उत्साहही कायम ठेवता येणे, ही विशेष बाब आहे. विजय शिंदे यांच्याकडे हा उत्साह दिसतो. नवे जाणून घेण्याची इच्छा, प्रवासाची ओढ, कामाविषयीची निष्ठा आणि मित्रपरिवाराशी जपलेले जिव्हाळ्याचे संबंध त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वेगळेपण देतात.

पर्यटनाला दिला मैत्रीचा धागा

पर्यटन म्हणजे फक्त एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे नव्हे. नव्या प्रदेशाची ओळख करून घेणे, तेथील संस्कृती समजून घेणे, निसर्ग अनुभवणे आणि वेगवेगळ्या माणसांच्या जीवनातून काहीतरी शिकणे, असा त्याचा व्यापक अर्थ आहे. विजय शिंदे यांच्या पर्यटनविषयक कार्यात हीच दृष्टी दिसते. प्रवास आनंददायी होण्यासाठी माहिती, नियोजन आणि योग्य मार्गदर्शन किती आवश्यक असते, याची त्यांना जाण आहे.

त्यांनी काही मित्रांसह सुरू केलेला व्हॉट्सॲपवरील 'दोस्ती पर्यटक' समूह हा या आवडीचा अर्थपूर्ण विस्तार आहे. समान आवड असलेल्या माणसांना एकत्र आणून प्रवासातील अनुभवांची देवाणघेवाण घडविणारे हे व्यासपीठ ठरले आहे. कोणाला एखाद्या ठिकाणी फिरायला जायचे असल्यास तेथील नियम, खाण्यापिण्याची ठिकाणे आणि प्रवासासाठी उपयुक्त बाबी यांची माहिती ते आस्थेने देतात. त्यामुळे प्रवासाचे स्वप्न पाहणाऱ्यांना प्रत्यक्ष नियोजनाची दिशा मिळते.

ज्ञान किंवा अनुभव स्वतःपुरते ठेवले तर त्यांचा उपयोग मर्यादित राहतो. ते इतरांसोबत वाटले की अनेकांच्या आनंदात भर पडते. शिंदे यांच्या या वृत्तीमुळे पर्यटनाची आवड असलेल्या मित्रांना माहितीबरोबरच विश्वासाचा आधारही मिळतो. त्यांच्या या उपक्रमातून विविध ठिकाणांची ओळख होत असतानाच मैत्रीचे नवे धागेही विणले जातात.

प्रवासातून जपलेली माणुसकी

प्रवासात पाहिलेली ठिकाणे लक्षात राहतात; पण सोबतची माणसे तो प्रवास अविस्मरणीय करतात. विजय शिंदे यांच्या बाबतीत माणसे जोडण्याची ही कला विशेष उल्लेखनीय आहे. मित्रांशी असलेला स्नेह, मार्गदर्शन करण्यातील तत्परता आणि संवादातील आपुलकी यामुळे त्यांच्या सहवासाला वेगळी ऊब लाभते.एखाद्याची अडचण समजून घेणे, विचारलेल्या प्रश्नाला मनापासून उत्तर देणे आणि आपल्या अनुभवाचा दुसऱ्याला उपयोग करून देणे, या साध्या वाटणाऱ्या गोष्टींतूनच विश्वास निर्माण होतो. शिंदे यांनी पर्यटनाच्या आवडीला अशा विश्वासाची जोड दिली आहे. त्यामुळे त्यांचे कार्य प्रवासाच्या माहितीपलीकडे जाऊन माणसामाणसांतील जवळीक वाढविणारे ठरते.

तरुणाईसाठी उत्साहाचे उदाहरण

आज संपर्काची साधने वाढली आहेत; मात्र प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी वेळ काढणे कमी होत चालले आहे. मोबाईलच्या पडद्यावर जग पाहताना सभोवतालच्या निसर्गाकडे, माणसांकडे आणि संवादाच्या संधींकडे दुर्लक्ष होते. अशा वेळी विजय शिंदे यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व तरुणांना जग प्रत्यक्ष अनुभवण्याची प्रेरणा देते.

डिजिटल माध्यमांचा माहिती आणि मैत्री वाढविण्यासाठी उपयोग कसा करता येतो, हे त्यांच्या समूहातील सहभागातून दिसते. नवे शिकण्याची तयारी आणि अनुभव इतरांपर्यंत पोहोचविण्याची इच्छा असेल तर तंत्रज्ञानही नाती अधिक दृढ करण्याचे साधन बनते. वयाच्या पासष्टाव्या वर्षीही कायम असलेली त्यांची जिज्ञासा तरुणाईसाठी अनुकरणीय आहे.

अनुभवांची शिदोरी,आनंदाची वाटचाल

आयुष्यात प्रत्येकाला अनुकूल परिस्थिती मिळतेच असे नाही. अडचणी, जबाबदाऱ्या आणि बदलते प्रसंग यांना सामोरे जात पुढे जावे लागते. अशा प्रवासात सकारात्मक दृष्टी आणि माणसांची साथ मोठे बळ देतात. शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वातून अनुभवांचे ओझे न करता त्यांची शिदोरी सोबत घेऊन कसे जगावे, याची शिकवण मिळते.त्यांचा ६५ वा वाढदिवस हा मित्रपरिवारासाठी स्नेह व्यक्त करण्याचा आणि त्यांनी जपलेल्या नात्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रसंग आहे. प्रवासाची आवड, कामातील सातत्य, सामाजिक जाण आणि माणसांविषयीची आत्मीयता यांतून त्यांनी आपल्या वाटचालीला अर्थ दिला आहे.

विजय शिंदे यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि सुखसमृद्धी लाभो. नव्या प्रदेशांना भेट देण्याची त्यांची उमेद अशीच कायम राहो. त्यांच्या अनुभवांतून अनेकांचे प्रवास सुखकर होवोत आणि त्यांनी जपलेला मैत्रीचा परिवार अधिकाधिक बहरत राहो. विजय शिंदे यांना ६५ व्या वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!त्यांच्या आयुष्याच्या पुढील वाटचालीत नवी क्षितिजे, आनंदाचे क्षण आणि जिवाभावाच्या माणसांची साथ लाभत राहो, हीच सदिच्छा!

निखिल सोनक,
अमरावती

पाणी बचतीची सवय अनिवार्य !

राज्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता आगामी काळात जगायचे असेल, तर आज पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. बऱ्याचदा अनेकजण पाण्याची बचत करताना दिसत नाहीत, मग मीच का पाणी वाचवावे, असे विचार मनात येतात: मात्र शेजारची व्यक्ती पैशाची उधळपट्टी करते म्हणून त्याचे पाहून आपण ती करत नाही, कारण पैशाचे महत्व, पैसे वाचवण्याचे महत्व, पैसे कमावण्यासाठी लागणारी मेहेनत याबाबतची आपल्या प्रत्येकाला आहे. आज शहरात पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. त्यामुळे पाण्याच्या बचतीचे महत्वही आपण लक्षात घ्यायला हवे. आपल्या लहान सहान कृतीतून पाण्याची बचत आपल्याला करता येते. पाणी वाचवणे म्हणजे अस्वछ राहणे असे मुळीच नव्हे,आपल्या दैनंदिन स्वच्छतेसाठी उदा. आंघोळ, तोंड धुणे, हात धुणे आणि अन्य स्वच्छतेसाठी किती पाणी आपण व्यय करतो हें प्रत्येकाला ज्ञात असते. आपण शॉवरचा वापर करत असू तर बादलीचा वापर करून कित्येक लिटर पाणी आपण वाचवू शकतो, हात धुताना हाताला हँडवॉश अथवा साबण लावेपर्यंत आपण नळ चालूच ठेवत असू तर तो बंद करायला हवा. कपडे आणि भांडी धुतांनाही हाच नियम पाळूया. भांड्यांना साबण लावताना नळ बंद ठेवूया. पिण्यासाठी आवश्यक तेव्हढेच पाणी घेऊया, जेणेकरून पाणी पिऊन झाल्यानंतर पेल्यात उरलेले पाणी अन्यत्र टाकावे लागणार नाही. कपडे धुण्यासाठी आणि भांडी घासण्यासाठी शक्य असल्यास काही दिवस यंत्राचा वापर न करता हाताने धुण्याचा प्रयत्न करूया. घरातील एखादा नळ बिघाड झाल्याने त्यातून पाणी गळत असेल, तर तो तत्परतेने दुरुस्त करून घेऊया. झाडांना आवश्यक तेव्हढेच पाणी देऊया. एखाद्या ठिकाणी पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असेल तर त्वरित पाणी खात्याला कळवून त्या ठिकाणी दुरुस्ती करून घेऊया. पाणी वाचवण्याचे महत्व आपल्या घरातील लहानग्यांनाही सांगुया. पाणी बचतीचे प्रयत्न प्रत्येक चाळीतून आणि सोसायटीतून व्हायला हवेत. सर्वांनी एकत्रितपणे पाणी बचतीचा कृती आराखडा ठरवायला हवा. पाण्याला जीवन असे म्हटले जाते.

जगन घाणेकर
मो.९६६४५५९७८०

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

उन्हाळ्यात अकोल्यावर पाणीटंचाईचे सावट; पाणी जपून वापरा!

प्रत्येक थेंबाची बचत करण्याचे महापौर शारदा खेडकर यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी उन्हाळ्यात शहरात भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता अकोलेकरांनी आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन महापौर शारदा रणजित खेडकर यांनी केले आहे. उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करून प्रत्येक थेंबाची बचत करणे आवश्यक असून, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनासोबत नागरिकांचे सहकार्यही महत्त्वाचे ठरणार आहे.

उन्हाळ्यात पाणीटंचाईची परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी नळ सुरू ठेवून पाणी वाया घालवू नये, पाण्याच्या टाक्या भरताना त्या ओसंडून वाहणार नाहीत याची काळजी घ्यावी. वाहन, अंगण आणि रस्ते धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा. घरातील नळ, पाइपलाइन तसेच पाण्याच्या टाक्यांमधील गळती तातडीने दुरुस्त करावी. शक्य तेथे वापरलेल्या पाण्याचा

पुनर्वापर करावा, असेही महापौरांनी स्पष्ट केले.

ज्या नागरिकांच्या घरात बोअरवेलची सुविधा नाही, त्यांनी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन घरात पुरेशा पाणीसाठ्याची व्यवस्था करावी. बांधकाम व्यावसायिकांनी बांधकामासाठी गुणवत्तापूर्ण एसटीपी प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर करावा, असे निर्देशही देण्यात आले आहेत. आवश्यक त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने पाण्याचे टँकर उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही महापौरांनी दिली.

पाणीटंचाईच्या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी सत्ताधारी आणि प्रशासन समन्वयाने काम करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पिण्याच्या पाण्याचा वापर स्वयंपाक आणि दैनंदिन अत्यावश्यक गरजांसाठी प्राधान्याने करावा. पाणी उपलब्ध आहे म्हणून त्याचा अमर्याद वापर करण्याची मानसिकता बदलण्याची गरज आहे. आज केलेली पाण्याची बचत उद्याच्या संकटाची तीव्रता कमी करू शकते. त्यामुळे अकोलेकरांनी पाणी बचतीचा संकल्प करून महानगरपालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापौर शारदा खेडकर यांनी केले आहे.

मारवाडी ट्रेडर्सवर अन्न सुरक्षा विभागाची कारवाई, लाखोंचा साठा जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत आणि पॅकिंगवरील दाव्यांबाबत अन्न सुरक्षा विभागाने कठोर भूमिका घेत अकोल्यातील मारवाडी ट्रेडर्सवर कारवाई केली आहे. अकोला बिझनेस सेंटर येथील या आस्थापनेची ३० ऑक्टोबर रोजी तपासणी करण्यात आली. यावेळी 'राजवाडी प्युअर नॅचरल जॅगरी' या गुळाचा नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला. तसेच भेसळीचा संशय आणि पॅकिंगवर 'प्युअर नॅचरल' असा दावा केल्याने संबंधित आस्थापनेतील तब्बल १२ हजार १५० किलो गूळ जप्त करण्यात आला. या साठ्याची किंमत १३ लाख ५० हजार रुपये असल्याची माहिती अन्न सुरक्षा विभागाने दिली.

तपासणीदरम्यान गुळाच्या गुणवत्तेबाबत संशय व्यक्त करण्यात आला. तसेच अन्नपदार्थाच्या पॅकिंगवर 'प्युअर नॅचरल' असा उल्लेख करण्यात आल्याने अन्न सुरक्षा व मानके (जाहिरात व दावे) विनियम, २०१८ मधील तरतुदींचे

'प्युअर नॅचरल' दाव्यावर संशय; १२ हजार १५० किलो गूळ ताब्यात, नमुना तपासणीसाठी रवाना

प्रथमदर्शनी उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित गुळाचा शिल्लक साठा जप्त करण्यात आला. ही कारवाई अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे आणि सहआयुक्त (अन्न), अमरावती विभागाचे एस. डी. केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक आयुक्त (अन्न) देवानंद वीर यांच्या समवेत अन्न सुरक्षा अधिकारी किशोर बोरचाटे यांनी ही कारवाई केली. आता जप्त केलेल्या गुळाच्या नमुन्याच्या विश्लेषणातून नेमके काय निष्पन्न होते आणि संबंधित आस्थापनेवर पुढे कोणती कायदेशीर कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे.

२० वर्षे महावितरणची सेवा, आता स्थानिक वाहनचालकांवरच 'हद्दपारी'ची वेळ!

१,११३ इलेक्ट्रिक वाहनांच्या निविदेला स्थगिती देण्याची मागणी; ६३६ कोटींच्या कंत्राटात स्थानिकांना डावलल्याचा संघटनेचा आरोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

महावितरणच्या वीजपुरवठा व्यवस्थेला तब्बल २० वर्षे वाहने पुरवून ऊन, वारा, पाऊस आणि नैसर्गिक आपत्तींच्या काळातही सेवा देणाऱ्या स्थानिक वाहनचालक-मालकांवर आता बेरोजगारीचे संकट ओढवण्याची चिन्हे आहेत. वर्षानुवर्षे महावितरणची धुरा सांभाळणाऱ्या स्थानिकांना बाजूला सारून बाहेरील बड्या कंत्राटदारांसाठी कोट्यवधींच्या कंत्राटाचा मार्ग मोकळा केला जात असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंत्राटी वाहन चालक-मालक संघटनेने केला आहे. १,११३ इलेक्ट्रिक वाहनांच्या प्रस्तावित निविदा प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती देऊन स्थानिकांना न्याय द्यावा, अशी मागणी संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनातून केली आहे.

सन २००७ पासून राज्यभरातील हजारो स्थानिक वाहनचालक-मालक हाावितरणच्या सेवेत कार्यरत आहेत. वादळ असो, मुसळधार पाऊस असो अथवा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठीची आणीबाणीची परिस्थिती, प्रत्येक वेळी या चालकांनी आपली जबाबदारी पार पाडली. ग्रामीण आणि शेतकरी कुटुंबांतील अनेक तरुणांनी बँका व पतसंस्थांकडून कर्ज काढून वाहने खरेदी केली. हाच व्यवसाय त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा आधार बनला. मात्र,

दोन दशकांच्या सेवेची दखल घेण्याऐवजी नव्या निविदा प्रक्रियेत स्थानिकांना स्पर्धेबाहेर ठेवले जात असल्याने त्यांच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

६३६ कोटींच्या निविदेत स्थानिकांना प्रवेशच कठीण!

महावितरणच्या निविदा क्रमांक CEC/CCO/T-01/2026-27 अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रासाठी सुमारे ६३६.४६ कोटी रुपयांची एकत्रित निविदा काढण्यात आल्याचे संघटनेने नमूद केले आहे. कोट्यवधी रुपयांच्या उलाढालीशी संबंधित अटींमुळे अनेक वर्षे प्रत्यक्ष सेवा देणारे स्थानिक वाहनमालक स्पर्धेतून बाद होत असल्याचा आक्षेप आहे. संपूर्ण राज्याचे कंत्राट एकाच ठिकाणी केंद्रीत करण्याऐवजी जिल्हानिहाय किंवा परिमंडळनिहाय निविदा काढली असती, तर स्थानिक व्यावसायिकांनाही संधी मिळाली असती, असे संघटनेचे म्हणणे आहे.

दुष्काळाने शेती कोरडी, आता रोजगाराचेही चाक थांबणार?

दुष्काळ, नापिकी आणि शेतीतून घटलेले उत्पन्न यामुळे शेतकरी कुटुंबांची आर्थिक घडी आधीच विस्कटली आहे. वाहनांचे मासिक कर्जहप्ते, दुरुस्ती, सुटे भाग आणि मुलांच्या शिक्षणाचा खर्च या व्यवसायातूनच भागविला जातो. अशा वेळी वाहनसेवेचे कंत्राट हातातून गेल्यास या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळण्याची भीती आहे. स्थानिक वाहन व्यवसायावर गॅरेज चालक, सुटे भाग विक्रेते आणि अन्य कामगारांचाही रोजगार अवलंबून असल्याने या निर्णयाचे परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचू शकतात, असे संघटनेने स्पष्ट केले आहे.

२९ हजारांचे काम थेट ५५ हजारांवर

संघटनेने निवेदनात मांडलेला आर्थिक मुद्दाही लक्षवेधी आहे. स्थानिक वाहनचालक-मालक पूर्वी अवघ्या २९ हजार ९०० रुपयांत वाहन देखभाल आणि सेवा देत असताना नव्या निविदेत दरमहा तब्बल ५५ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचा दावा करण्यात आला आहे. म्हणजेच कमी खर्चात सेवा देण्यास तयार असलेल्या स्थानिकांना डावलून अधिक खर्चाची व्यवस्था का स्वीकारली जात आहे, असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. यामुळे महावितरणवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

चार प्रमुख मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

निविदा प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती द्यावी, निविदेचे जिल्हानिहाय किंवा परिमंडळनिहाय विकेंद्रीकरण करावे, मागील २० वर्षांपासून सेवा देणाऱ्या स्थानिक वाहनचालक-मालकांना प्राधान्य देण्याची तरतूद करावी आणि ऊर्जा मंत्री, प्रधान सचिव (ऊर्जा) व महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत संघटनेच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक आयोजित करावी, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. योगेश गोमासे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंत्राटी वाहन चालक-मालक संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना हे निवेदन सादर केले. यावेळी प्रवीण ठाकूर यांच्यासह संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. दोन दशकांच्या सेवेचा मोबदला म्हणून रोजगाराची शाश्वती मिळण्याऐवजी नव्या निविदेमुळे उपजीविकेचे साधनच हिरावले जाणार का, हा प्रश्न आता स्थानिक वाहनचालक-मालक उपस्थित करीत आहेत.

'करिअर कम्पास २०२६' सेमिनार उत्साहात संपन्न

अकोला : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सेवेत कार्यरत असणाऱ्या गुरुकुल कॉमर्स अकॅडमीच्या वतीने इयत्ता ११ वी कॉमर्सचे विद्यार्थी व पालकांसाठी 'करिअर कम्पास २०२६' हे करिअर मार्गदर्शन व पालकत्व विषयक सेमिनार उत्साहात संपन्न झाले. विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेतील विविध करिअर संधींची माहिती मिळावी, पालकांना पाल्याच्या क्षमतांची योग्य ओळख व्हावी.

पाण्याचा अपव्यय भोवला; बांधकामधारकाला पाच हजारांचा दंड



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात संभाव्य पाणीटंचाईचे संकट लक्षात घेता पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. जठारपेठ परिसरात बांधकामादरम्यान पाण्याचा अपव्यय करणाऱ्या एका बांधकामधारकाला मनपाच्या पूर्व झोन पथकाने पाच हजार रुपयांचा दंड ठोठावला. श्री. इंगळे असे संबंधित बांधकामधारकाचे नाव आहे. मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार शहरात झोननिहाय पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. त्याअंतर्गत ३० ऑक्टोबर रोजी पूर्व झोनच्या पथकाने प्रभाग क्रमांक ३ मधील जठारपेठ परिसरात तपासणी केली. यावेळी बांधकामधारक पाण्याचा अपव्यय करताना आढळल्याने त्यांच्यावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली.

सहायक आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईत वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक शैलेश पवार, स्वच्छता निरीक्षक राजेश पथरोट, प्रवीण मनोहर, गोविंद करिहार, विशाल पारोचे आणि सुनील कंडेरा सहभागी होते.

दरम्यान, पिण्याचे पाणी आणि भूगर्भातील पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करण्याचे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे. शहरात पाण्याची पाइपलाइन फुटलेली आढळल्यास, सार्वजनिक अथवा खासगी बांधकामात मनपाच्या पाण्याचा किंवा बोअरवेल-विहिरीच्या पाण्याचा गैरवापर होत असल्यास नागरिकांनी प्रशासनाला माहिती द्यावी.

चौकशीची जाहिर नोटीस
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- ९४/२०२६ कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नाव - श्री. गजानन महाराज मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट चांदुर ता. जि. अकोला.

अर्जदार :- श्री. अजय भगवंतराव माहोरे

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगममिळकत (वर्णन):- रोख रक्कम रु.१००१/- अध्यक्ष यांचे कडे जमा आहे. **आ) स्थावर मिळकत (वर्णन):-** निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत (२८/११/२०२६) या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी परि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी दिली.

शिक्का

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

क्र.प्रस्तु.-२/कावि- /२२८४/२०२६ | दिनांक ३०.१०.२०२६

जाहीरनामा

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार जन्म-मृत्यु नोंदणी करीता अर्जदार प्रिती रुपेश देशमुख, हिंगणा रोड बलोदे लेआऊट, अकोला यांचा सासु नामे कुसुमबाई श्रीराम देशमुख यांचा मृत्यु अकोला येथे दिनांक १७.०९.२०२४ रोजी झाला असून यांच्या मृत्युची नोंद निंबधक जन्म-मृत्यु नोंदणी विभाग, अकोला महानगरपालीका अकोला यांच्या नजर चुकीने करण्यात आली नाही. करिता अर्जदार यांनी मृत्युची नोंद घेण्याकरीता आदेश होणेबाबत निंबधक जन्म-मृत्यु नोंदणी विभाग, अकोला महानगरपालीका अकोला येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

त्यानुसार, प्रिती रुपेश देशमुख, हिंगणा रोड बलोदे लेआऊट, अकोला यांचा सासु नामे कुसुमबाई श्रीराम देशमुख यांचा मृत्युची नोंद घेण्याकरिता कोणाला काही आक्षेप / हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप हरकत अर्ज हया कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासुन सुट्टीचे दिवस वगळून पंधरा दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्थळ :- अकोला
दिनांक :-

शिक्का

कुणाल झाल्टे
तहसिलदार अकोला

जाहीर नोटीस
वि. दिवाणी न्यायालय (व. स्तर) दर्यापूर जि. अमरावती येथील ए. एम. जोशी, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ४३३/२०२६ | प्रोसेस नं. २६९५/२०२६
ने.ता. ०१/१२/२०२६ | दिनांक : २७/१०/२०२६

अर्जदार : १. विजय श्रीराम वैराळे, वय अं.-६३ वर्ष, धंदा - मजुरी
२.सुबोध विजयराव वैराळे, वय अं. -३२ वर्ष, धंदा - मजुरी
दोन्ही रा. सिव्हिल लाईन दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, सुनिता विजय वैराळे ह्या दिनांक २५/०८/२०२५ रोजी मरण पावल्या आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. २७/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहा. अधिक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय व. स्तर दर्यापूर

जाहीर नोटीस
वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १७९६/२०२६ | प्रोसेस नं. १३४५३/२०२६
चौ.ता. ०३/१२/२०२६ | दिनांक : २१/१०/२०२६

अर्जदार : १. श्रीमती अंजू उमेश तायडे २. जय उमेश तायडे ३. यश उमेश तायडे ४. श्रीमती. मथुरा देवमन तायडे सर्व रा. इंदिरा नगर, पंचशील चौक जवळ, अकोट फैल, अकोला. ५. सौ. पुजा मनोज गवई पुजा उमेश तायडे रा. मु. पो. दिग्रस ता. बाळापूर, जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : उमेश देवमन तायडे
पत्ता :- रा. इंदिरा नगर, पंचशील चौक जवळ, अकोट फैल, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत उमेश देवमन तायडे यांचे दि. ३०/१० / २०१८ रोजी राहते घरी इंदिरा नगर, अकोट फैला, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस
वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १७२७/२०२६ | प्रोसेस नं. १३८८३/२०२६
चौ.ता. २७/११/२०२६ | दिनांक : २९/१०/२०२६

अर्जदार : १. करन श्रीकृष्ण कोनप्ते रा. निमवाडी, नानक नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. मनिषा मंगेश राऊत रा. भौरसिंग, पोस्ट नारखेड, ता. नांदुरा, जि. बुलढाणा. ३. अतुल श्रीकृष्ण कोनप्ते रा. नानक नगर, निमवाडी, अकोला. ता. जि. अकोला. ४. रोहन श्रीकृष्ण कोनप्ते रा. गॅलक्सी डुप्लेक्स, एमराल्ड स्कूल, गिता नगर, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : १. श्रीकृष्ण विश्वनाथ कोनप्ते २. सुशिला श्रीकृष्ण कोनप्ते
पत्ता :- रा. नानक नगर, निमवाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीकृष्ण विश्वनाथ कोनप्ते यांचे दि. ०५/०६/२०१८ रोजी व मयत सुशिला श्रीकृष्ण कोनप्ते यांचे दि. २७/०७/२०२६ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर, अकोला, यांचे न्यायालय क्र ०५ अकोला

किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक १४१५ / २०२६ | चौकशी तारीख : १४-१२-२०२६

जाहीरनामा

अर्जदार : खानम शवाना इफफत

... विरूध्द..

गैरअर्जदार : रजिस्ट्रार जन्म-मृत्यू म.न.पा अकोला

वि.न्यायालयाच्या आदेशानुसार या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते आहे की अर्जदार नामे खानम शवाना इफफत पिता रहमनुल्ला खान यांचा जन्म दिनांक १५/०५/१९६८ रोजी अकोला येथे जन्म झाला, असून त्यांचा जन्माची नोंद रजिस्ट्रार जन्म-मृत्यू मनपा अकोला येथे नसल्या कारणाने त्यांच्या जन्माची नोंद होण्याकरिता त्यांनी Application Under Section 13(3) of The Birth And Death Registration Act 1969 For Taking the Entry of Death/Birth अश्या स्वरूपाचा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यावर पारीत झालेल्या आदेशानुसार या जाहिर नोटिसद्वारे त्यांचे जन्माची नोंद होणेसंदर्भात कुणालाही काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी पुढील चौकशी ता १४-१२-२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी स्वतः किंवा वकीलामार्फत आक्षेप नोंदवावा जर चौकशी तारीख १४-१२-२०२६ पर्यन्त कोणाचेही काही आक्षेप आले नाही तर कुणाचेही काही आक्षेप नाही असे समजुन पुढील आदेश पारीत केल्या जातील असे सर्वांना या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे.

आज दिनांक २९ माहे आक्टोबर २०२६ रोजी माझया सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय तथा न्यायदंडाधिकारी
प्र. श्रेणी कोर्ट क्र. ०५ अकोला

जाहीर नोटीस
वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८३४/२०२६ | प्रोसेस नं. १३८८६/२०२६
चौ.ता. ११/१२/२०२६ | दिनांक : २९/१०/२०२६

अर्जदार : १. गणेश प्रभाकर देशपांडे रा. लक्ष्मी प्रभा, ई–१५, विदर्भ हाउसिंग बोर्ड कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. कृष्णा प्रभाकर देशपांडे रा. २५/३, सातपुते भवन, रूम नं. ११, सकाळ ऑफिसच्या समोर, दळवी हॉस्पिटल जवळ, नरवीर तानाजी वाडी, शिवाजी नगर, पुणे. सध्या रा. लक्ष्मी प्रभा, ई- १५, विदर्भ हाउसिंग बोर्ड कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. विष्णु प्रभाकर देशपांडे रा. सीता गीता अपार्टमेंट, ब्लॉक नं. १६, पहिला माळा, सुधिर कॉलनी, राम मंदिर जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : प्रभाकर अनंत देशपांडे
पत्ता :- रा. सीता गीता अपार्टमेंट, ब्लॉक नं. १६, पहिला माळा, सुधिर कॉलनी, राम मंदिर जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रभाकर अनंत देशपांडे यांचे दि. २३/०८/१९७५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

चौकशीची जाहिर नोटीस
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- ९१/२०२६ कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नाव - जय हनुमान चॅरीटेबल ट्रस्ट, गाडगे वाडी, पातुर ता. पातुर जि.अकोला

अर्जदार :- श्री नितीन मोहन फुलारी, रा. गाडगेवाडी, बाळापुर रोड, पातुर

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की,सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत. १) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन :- रुपये ११०००/- अध्यक्षांकडे जमा
आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १५/१०/२०२६ रोजी दिली.

शिक्का

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला

मुर्तिजापूर रोड, अकोला - ४४४००१
वेब पत्ता : mjp.maharashtra.gov.in
ई-मेल : eemjpda@rediffmail.com

जा.क्र./निविदा/२६१०/ २०२६ | दिनांक : ३०/१०/२०२६

निविदा सुचना

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला या कार्यालयाकडुन खालील निविदा सुचना मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	निविदा सुचना क्रमांक	कामाचे नांव	कामाची अंदाजीत किंमत (रुपये)
१	क्रमांक ३० सन २०२६-२७	शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला येथे २.०० द.ल.लि. क्षमतेचे मल शुध्दीकरण केन्द्राची देखभाल व दुरुस्ती करणे.	रु.८,३९,०२०/-

या उपरोक्त सर्व कामांची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडुन दि. ३१.१०.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निविदेचा विक्री कालावधी दि. २९/१०/२६ ते ०४/११/२६ असा असुन निविदा भरुन सादर करण्याचा दि. ०५/११/२६ दु. ३.०० वाजेपर्यंतचा आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. २९.१०.२०२६ पासुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला येथील निविदा शाखेत पाहण्यास निशुल्क उपलब्ध आहेत.

कार्यकारी अभियंता
म.जी.प्रा. विभाग, अकोला

Change In Name

I Have Change My Name From
IMRANKHA DAUDKHA -TO-
IMRAN KHAN DAWOOD KHAN
My Residential Address is Sailani Baba Darbar, Opp. Homegard Office, Mangalwara, Akola, Maharashtra, 444001

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३१७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

बुरुजांना सुरुंग

‘ब्रँड’,‘गड’ आणि ‘बालेकिल्ले’ भुईसपाट ; भाजपच्या बड्या नेत्यांचे कान टोचणारा पराभव

सेलु/ अभय बेदमोहता

ज्या शहरांनी भाजपला सत्तेच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचवले, त्याच शहरांनी आता पक्षाला अत्यंत कटू आणि बोचरा इशारा दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मतदारसंघ असलेले ’वाराणसी’, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा अजिंक्य गड मानलं जाणारं ‘गोरखपूर’, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं शहर व संघाचं मुख्यालय असणारं ‘नागपूर’, आणि भाजपचा अभेद्य बालेकिल्ला समजलं जाणारं ‘पुणे’. या सर्वच ठिकाणी भाजपला मिळालेला धक्का हा केवळ एका निवडणुकीचा पराभव नाही, तर पक्षाच्या वरिष्ठांच्या डोळ्यात अंजन घालणारा जनतेचा कौल आहे.

या निकालांनी एक गोष्ट स्पष्ट शब्दांत सिद्ध केली आहे, केवळ मोठ्या नेत्यांच्या चेहऱ्यावर किंवा भव्य भाषणांवर निवडणुका जिंकण्याचा काळ आता संपला आहे. जर केवळ नेत्यांच्या नावानेच मतपेटी भरत असती, तर वाराणसीपासून नागपूरपर्यंत भाजपवर ही वेळ आली नसती,

पक्षाची खरी ताकद ही व्यासपीठावर बसणाऱ्या नेत्यांमध्ये नसून, उन्हातानात पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन फिरणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांमध्ये आणि निष्ठेने मतदान करणाऱ्या सामान्य मतदारांमध्ये असते, याचा विसर पडल्याची ही किंमत आहे.

नेत्यांची ‘गृहीत’ धरण्याची सवय अंगलट आली आहे, कार्यकर्त्यांना केवळ निवडणुकांपुरतं वापरून फेकून देणे आणि मतदारांना हे तर आपलेच आहेत असे गृहीत धरून चालणे भाजपच्या अंगाशी आले असल्याचे दिसून येत आहे.

सत्तेच्या हवेत वावरणाऱ्या नेत्यांनी खालील गोष्टींचे भान ठेवले नाही, तर २०२९ ची वाट किती बिकट असू शकते, याचा हा केवळ एक ‘ट्रेलर’ आहे. तळागाळातील ज्या कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर पक्ष उभा राहिला, त्यांनाच बाजूला फेकून बाहेरून आलेल्यांना रेड कार्पेट देणे पक्षाला महागात पडले आहे.

जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष व केवळ राजकीय भाषणे आणि घोषणांपेक्षा लोकांना प्रत्यक्ष कामाची आणि महागाई-बेरोजगारी सारख्या रोजच्या प्रश्नांवर उत्तरांची गरज आहे.

निवडणुकीनंतर मतदारांशी संपर्क तोडणे आणि सत्तेची मस्ती दाखवणे जनतेला अजिबात सहन होत नाही. देशात वाढलेली भ्रष्टाचाराची किड़ पुर्वी पेक्षा जास्त पोखरत आहे.असे नागरिकांचे स्पष्ट मत आहे.याकडे लक्ष देणे जास्त गरजेचे आहे.

अजूनही वेळ गेलेली नाही. पण यात सुधारणार करणार तरी कोण? सत्ता ही सेवेसाठी असते, हुकुमत गाजवण्यासाठी नाही, हा धडा या निकालांनी दिला आहे. नेते कितीही मोठे असले तरी तळागाळातील कार्यकर्ता दुखावला आणि सामान्य मतदार दुरावला, तर मोठमोठे गड आणि बालेकिल्ले ढासळायला वेळ लागत नाही. भाजपच्या धुरिणींनी अजूनही वेळेवर पावले उचलून कार्यकर्त्यांची कदर केली नाही आणि जनतेशी थेट संवाद साधला नाही, तर २०२९ च्या महासंग्रामात भाजपसाठी दिल्लीचा रस्ता अत्यंत बिकट आणि खडतर असणार, यात तीळमात्र शंका उरलेली नाही,

सेवाग्राम ते नागपूर पायदळ मोर्चाचे रणशिंग; वर्धेत आज कामगारांचे शक्तिप्रदर्शन

१५ डिसेंबरला नागपूर विधानसभेवर मुक्कामी मोर्चा

वर्धा/जनमाध्यम

अंगणवाडी सेविका, आशा वर्कर,गटप्रवर्तक,शालेय पोषण आहार कर्मचारी यांच्यासह विविध योजनांमध्ये कार्यरत कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आता संघटित लढ्याची तयारी सुरू झाली आहे. आयटकच्या १०६ व्या स्थापना दिनानिमित्त शनिवारी,३१ ऑक्टोबर रोजी वर्ध्यात जिल्हास्तरीय निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यातून १५ डिसेंबर रोजी नागपूर विधानसभेवर काढण्यात येणाऱ्या मुक्कामी मोर्चाची दिशा निश्चित केली जाणार आहे.

आयटक वर्धा जिल्ह्याच्या वतीने दुपारी १२ वाजता बच्छराज सभागृह, शास्त्री चौक, रेल्वे स्टेशनजवळ हा मेळावा होणार आहे. देशातील पहिली कामगार संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयटकच्या स्थापनेला १०६ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्याच्या प्रारंभी ज्येष्ठ कॉम्रेड यांच्या हस्ते संघटनेचे ध्वजारोहण करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस,आशा वर्कर,गटप्रवर्तक,अंशकालीन स्त्री परिचर, शालेय पोषण आहार कर्मचारी, कंत्राटी नर्सेस,एमएसईबी वर्कर्स फेडरेशनचे कामगार तसेच अन्य योजनांमध्ये कार्यरत कर्मचारी या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. आयटकचे राष्ट्रीय कमिटी सदस्य कॉम्रेड दिलीप उटाणे यांच्यासह विविध कामगार नेते उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

सेवाग्राम ते नागपूर पायदळ मोर्चाचा निर्धार

योजना कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १५ डिसेंबरला नागपूर विधानसभेवर मुक्कामी मोर्चा काढण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या तयारीसह सेवाग्राम ते नागपूर असा पायदळ मोर्चा काढण्याचाही निर्धार करण्यात आला आहे. या दोन्ही आंदोलनांचे नियोजन, कामगारांची एकजूट आणि पुढील आंदोलनाची रणनीती यावर निर्धार मेळाव्यात चर्चा होणार आहे. योजना कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि मागण्यांच्या पूर्ततेसाठी व्यापक आंदोलन उभारण्याच्या दृष्टीने हा मेळावा महत्त्वपूर्ण मानला जात आहे. त्यामुळे वर्धा जिल्ह्यातील सर्व योजना कामगारांसह राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयटकचे जिल्हाध्यक्ष कॉम्रेड मनोहर पचारे आणि जिल्हा सचिव कॉम्रेड वंदना कोळणकर यांनी केले आहे.

सायबर फसवणुकीसाठी पाच जणांची बँक खाती वापरली

वर्धा-सायबर फसवणुकीच्या रकमांची देवाणघेवाण करण्यासाठी बँक खात्यांचा वापर केल्याप्रकरणी वर्ध्यातील पाच जणांविरुद्ध सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अनिता तिवारी, सारिका लवणकर, सुनीता तिवारी, जारा खान आणि माधव नानवाणी अशी संबंधितांची नावे आहेत. अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेतील खात्यांचा वापर फसवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी व काढण्यासाठी झाल्याचे तपासात समोर आले. खातेदारांनी पासबुक, एटीएम कार्ड आणि सिमकार्ड उपलब्ध करून दिल्याचा आरोप आहे. पार्टटाइम जॉब, गुंतवणूक आणि डिजिटल अरेस्टच्या आमिषातून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या संघटित सायबर टोळीशी या खात्यांचा संबंध असल्याचा संशय आहे. सायबर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

जात प्रमाणपत्र पडताळणी आता ऑनलाईन

मार्गदर्शनासाठी व्हॉट्स अॅप किंवा मदतकक्षाच्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येणार

वर्धा/जनमाध्यम

जात प्रमाणपत्र पडताळणीची कार्यप्रणाली नव्याने विकसित करण्यात आली आहे. ही प्रणाली पुर्णत: ऑनलाईन असल्यामुळे अर्जाबाबत माहिती घेण्यासाठी समिती कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. अर्जाबाबत काही माहिती, मार्गदर्शन हवे असल्यास विद्यार्थी व पालकांनी बार्टी मुख्यालय पुणे येथील मदतकक्षाच्या ०२०-२६३३३३३९ या दुरध्वनी क्रमांकावर अथवा ९४०४९९९४५२ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर किंवा helpdesk@barti.in या ईमेल आयडी संपर्क साधता येणार आहे. विद्यार्थ्यांनी नवीन जात प्रमाणपत्र प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अर्जदारांना जात प्रमाणपत्र

पडताळणीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. अर्जासोबत आंवश्यक कागदपत्रेही ऑनलाईन जोडावी लागतील. अर्जामध्ये काही त्रूटी आढळल्यास त्यांची पुर्ततादेखील ऑनलाईन पध्दतीने करता येणार आहे. त्यामुळे कागदपत्रांच्या हार्ड कॉपी सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी करुन घेणार अर्जदार, विद्यार्थी, शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेकामी अर्ज करणारे संबंधित प्राचार्य, लिपीक, निवडणूक प्रयोजनार्थ उमेदवार व सेवा आणि इतर प्रयोजनार्थ जातपडताळणी करणारे यांना आता जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी ऑनलाईन व पेपरलेस कार्यवाही करावी लागणार आहे.या प्रणालीव्दारे अर्जदारांना आपल्या अर्जाची सद्यःस्थिती आणि प्रगती ऑनलाईन पाहता येणार आहे. यामुळे अर्जदारांना अर्ज कोणत्या टप्यावर आहे हे पाहण्यासाठी कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही. त्याचप्रमाणे अर्जदारांना स्वतःच्या अर्जाचे ऑनलाईन ट्रॅकिंगदेखील करता येणार आहे. अर्जदारांनी सादर केलेल्या कागदपत्रामधील पुराव्याबाबत समितीला शंका असल्यास किंवा सुनावणी आवश्यक वाटल्यास संबंधितांना प्रत्यक्ष समिती कार्यालयात उपस्थित राहावे लागणार नाही. अशा प्रकरणांमध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातुन सुनावणी घेण्यात येणार आहे. या नव्या ऑनलाईन आणि पेपरलेस प्रणालीमुळे सुनावणीसाठी हजर राहण्याची आवश्यकता नाही. जात पडताळणीच्या कागदपत्राबाबत सुनावणी आवश्यक असलेल्या प्रकरणांमध्ये जात पडताळणी समितीकडून अर्जदाराला तीन तारखा दिल्या जाणार आहेत. त्यापैकी सोयीची तारीख निवडून अर्जदाराला ऑनलाइन सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. प्रकरणाबाबत सदयास्थिती व माहिती हि विद्यार्थ्याच्या ई-मेल व व्हॉट्स ॲपवर उपलब्ध होणार आहे, असे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सदस्य तथा उपायुक्त यांनी कळविले आहे.

जिल्ह्यात महिला व बाल विकास विभागांतर्गत स्वच्छता अभियान

वर्धा/जनमाध्यम

वर्धा जिल्ह्यातील महिला व बाल विकास विभागांतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी कार्यरत ५ बालगृहांमध्ये ०२ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महिला व बाल विकास अधिकारी तृप्ती चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

अभियानादरम्यान बालगृहांमध्ये विविध रचनात्मक आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये परिसराचे धुरीकरण, पिण्याच्या पाण्याच्या टाकीची व स्वच्छतागृहांची स्वच्छता, हॅन्डवॉश व सॅनिटायझरची उपलब्धता, वाहत्या पाण्याची सुनिश्चिता, सेफ्टी कॅन आणि संस्थांची नियमित स्वच्छता, तसेच कपड्यांची धुलाई करण्यात आली. बालकांची वैयक्तिक स्वच्छता राखण्यासोबतच आरोग्य तपासणी शिबिरही राबविण्यात आले.

पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत संस्थेमध्ये वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली व जैविक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून कचऱ्याचे प्रभावी संकलन, वर्गीकरण आणि विल्हेवाट लावण्यात आली. टाकाऊ साहित्यापासून कलात्मक शिल्पे व उपयुक्त वस्तू तयार करणे, हस्तकला उपक्रम राबवणे आणि भिंतींवर पेंटिंगद्वारे स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. श्रमदान, कार्यालयीन जागेचे सुशोभीकरण तसेच उत्कृष्ट सेवा देणाऱ्या सफाई मित्रांचा सन्मानही या काळात करण्यात आला. सदर अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समिती आणि चाईल्ड हेल्पलाईन या बाल संरक्षण यंत्रणांचे विशेष सहकार्य लाभले. असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

संस्कारांची शिदोरी अन् नात्यांची वीण जपण्याचा संदेश

संयुक्त कुटुंब हीच समाजाची भक्कम पायाभरणी-डॉ.महेश मुंधडा

वर्धा/जनमाध्यम

बदलत्या जीवनशैलीत विभक्त कुटुंबांचे प्रमाण वाढत असताना संयुक्त कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व जपण्याची गरज आहे. संयुक्त कुटुंब ही समाजाची पायाभरणी असून संस्कार, शिस्त, ज्येष्ठांचा आदर आणि परस्पर सहकार्याची शिकवण कुटुंबातूनच मिळते, असे प्रतिपादन अकोला येथील डॉ. महेश मुंधडा यांनी केले.

माहेश्वरी मंडळ, वर्धा यांच्या वतीने आयोजित शरद पौर्णिमा उत्सवात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी ‘आपणो उत्सव २०२६’ अंतर्गत विविध

स्पर्धांमधील विजेत्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

आधुनिकतेच्या प्रवाहातही कौटुंबिक परंपरा, संस्कृती आणि संस्कारांची जपणूक झाली पाहिजे. युवा पिढीने आपल्या प्रतिभेचा उपयोग समाजहित आणि राष्ट्रनिर्मितीसाठी करावा, असे आवाहनही डॉ. मुंधडा यांनी केले.कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर भूतडा, महिला मंडळाच्या अध्यक्षा सुनीता राठी, नवयुवक मंडळाचे अध्यक्ष ऋषभ जाजू आणि नवयुवती मंडळाच्या अध्यक्षा साक्षी चितलांगे उपस्थित होते.यावेळी डॉ. मुंधडा यांचा जगदीश चांडक यांच्या हस्ते वर्ध्याच्या ऐतिहासिक ओळखीचे प्रतीक असलेले चरख्याचे स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन दामिनी टावरी यांनी, तर अतिथी परिचय उमेश टावरी यांनी केला. हरीश गांधी यांनी आभार मानले.

न्यायालयात न्यायाधीशांच्या दिशेने चप्पल भिरकावली

आर्वी - रिमांड सुनावणी सुरू असताना आरोपीने न्यायाधीशांच्या दिशेने चप्पल भिरकावल्याची खळबळजनक घटना आर्वी न्यायालयात घडली. कदीर अली रज्जाक अली (४४, रा. काकडधरा, ता. आष्टी) असे आरोपीचे नाव आहे. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी न्यायालय क्रमांक दोनमध्ये ही घटना घडली. सुनावणीदरम्यान आरोपीने खिशातून कागद काढण्याच्या बहाण्याने खाली वाकून पायातील चप्पल काढली आणि न्यायाधीशांच्या दिशेने फेकली. पहिली चप्पल सरकारी अभियोक्त्याच्या पाठीला लागली. त्यानंतर दुसरी चप्पलही न्यायाधीशांच्या दिशेने भिरकावली. पोलिसांनी त्याला आवरण्याचा प्रयत्न केला. न्यायालयीन अधीक्षकांच्या तक्रारीवरून आर्वी पोलिसांनी सरकारी कामात अडथळा व लोकसेवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

विषारी औषध प्राशन; तरुणाचा मृत्यू

सेलू-विषारी औषध प्राशन केल्याने प्रकृती खालावलेल्या संदीप गणराज मसराम (४०, रा. खेरडा, ता. सेलू) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.२७ ऑक्टोबर रोजी त्यांना सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना २८ ऑक्टोबर रोजी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. रुग्णालय प्रशासनानेदिलेल्या माहितीवरून सावंगी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. मृत्यूचे कारण विषारी औषध प्राशन असल्याचे वैद्यकीय अहवालात नमूद आहे. या घटनेमागील नेमके कारण स्पष्ट झालेले नाही.

घराच्या स्लॅबचा भाग डोक्यावर पडून वृद्धेचा मृत्यू

वर्धा-घराच्या खिडकीवरील स्लॅबचा भाग अंगावर पडल्याने गंभीर जखमी झालेल्या कलावती शेषरावजी वाघमारे (७०, रा. वार्ड क्रमांक २, आमला) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास त्या नातेवाइकांच्या घरी बसल्या असताना बंदराने उडी मारल्याने खिडकीवरील स्लॅबचा भाग कोसळला.

त्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना सेवाग्राम व त्यानंतर सावंगी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. २९ ऑक्टोबर रोजी उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. नातेवाइकांनी कोणताही संशय व्यक्त केला नसल्याने सावंगी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

हिंगणघाट - वणा नदीपात्रातून विनापरवाना काळ्या रेतीचे उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरसह ट्रॉलीवर हिंगणघाट पोलिसांनी कारवाई केली. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी कवडघाट रेतीघाट परिसरात ही कारवाई करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून संशयित ट्रॅक्टर अडविला. चालक गोविंदा घोटेकार याच्याकडे चौकशी केली असता मालक नरेश उपाध्ये याच्या संगनमताने रेतीची विनापरवाना वाहतूक सुरू असल्याचे समोर आले. ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रास काळी रेती आढळली. पोलिसांनी महिंद्रा ५७५ डीआय ट्रॅक्टर, विनाक्रमांकाची ट्रॉली आणि रेती असा एकूण ६ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

हिवरा येथे लोखंडी फावड्याने हल्ला

समुद्रपूर - पत्नी व सुनेला शिवीगाळ करण्यास विरोध केल्याच्या कारणातून झालेल्या वादात एका व्यक्तीला लोखंडी फावड्याने मारहाण करण्यात आली. विठ्ठल गणपत पवार (३५, रा. हिवरा, ता. समुद्रपूर) असे जखमीचे नाव आहे. २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी हिवरा येथे ही घटना घडली. आरोपी डोभा बहादुरे याने पवार यांच्या पत्नी व सुनेला शिवीगाळ केली. यावरून पवार यांनी जाब विचारला असता आरोपीने धमकी दिली. काही वेळाने गावातील कांबळे यांच्या घराजवळ आरोपीने हातातील फावड्याने पवार यांच्या डोक्यावर वार केला.

दारूच्या व्यसनातून तरुणाची आत्महत्या

सेलू-दारूच्या नशेत पत्नी व मुलांना शिवीगाळ केल्यानंतर खोलीत गेलेल्या तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना केळझर येथे घडली. विनोद रमेशराव घुमोने (३५, रा. वार्ड क्रमांक १, केळझर, ता. सेलू) असे मृताचे नाव आहे. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ते दारू पिऊन घरी आले होते. पाहिले असता विनोद गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसले. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले. सेलू पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला.

शेताच्या रस्त्यावरून भावाने केली मारहाण

सेलू-शेतात जाण्या-येण्याच्या रस्त्यावरून झालेल्या वादात सख्ख्या भावाने लोखंडी पाईपने मारहाण केल्याची घटना उपाळा येथे घडली. पुरुषोत्तम मारोती कडू (५१) यांनी याप्रकरणी सेलू पोलिसांत तक्रार दिली. २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास ते स्वतःच्या शेतात ट्रॅक्टरने हरभऱ्याची पेरणी करीत होते. यावेळी भाऊ प्रमोद कडू आणि भावजय सुनीता यांनी शेतातून जाण्यास विरोध केला. यावरून झालेल्या वादात प्रमोदने लोखंडी पाईपने पुरुषोत्तम यांच्या डाव्या पायाच्या पोटरीवर वार केला. आकाश कुमरे यांनी मध्यस्थी करून वाद मिटविला. सेलू पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

समृद्धी महामार्गावर मध्यरात्री हाणामारी

सिंदी रेल्वे-मित्राच्या वाढदिवसावरून परतताना समृद्धी महामार्गावरील सेलडोह शिवारात झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. २९ ऑक्टोबरच्या मध्यरात्री गोल राउंडजवळ हा प्रकार घडला. सागर बाबरे याच्या तक्रारीनुसार, तो मित्रांसह चारचाकीने परतत असताना वाहन थांबले. यावेळी सचिन कथलकर व प्रणय डंभारे यांच्यासोबत रोशन घोडे यांचा वाद सुरू होता. भांडण सोडविण्यासाठी उतरलेल्या सागरला सचिनने शिवीगाळ केली, तर लाकडी काठीने डोक्याच्या मागील बाजूस मारहाण केल्याचा आरोप आहे.

रेल्वे रुळांच्या विळख्यात ग्रामदैवत

८०० वर्षांची ऐतिहासिक मूर्ती वाचविण्यासाठी ग्रामस्थांचा पुढाकार

मूर्ती आहे त्याच ठिकाणी जतन करण्याची मागणी

सेलू /जनमाध्यम

सेलू तालुक्यातील दहेगाव गोसावी येथील रेल्वे रुळांच्या मधोमध असलेली प्राचीन देवीची मूर्ती सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. सुमारे ८०० ते १००० वर्षांचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या मूर्तीशी ग्रामस्थांची धार्मिक श्रद्धा जोडलेली आहे. मात्र, परिसरात तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गाचे काम सुरू झाल्याने या प्राचीन मूर्तीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विकासाच्या कामात गावाचा ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा हरवू नये, यासाठी ग्रामस्थांनी मूर्तीच्या संरक्षणाची मागणी पुढे आणली आहे.

ही मूर्ती श्री चामुंडा, मातृका देवी अथवा महिषासुरमर्दिनीचे प्राचीन स्वरूप असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. काळ्या बेसाल्ट पाषाणावर कोरलेली ही मूर्ती १०व्या ते १२व्या शतकातील यादवकालीन हेमाडपंथी शिल्पकलेचा नमुना असल्याचे सांगितले जाते.मूर्तीवरील करंड मुकुट,चार भुजांमधील आयुधे, दागिने आणि पाठीमागील प्रभामंडळ तिचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करतात. विशेष म्हणजे, रेल्वे मार्गाच्या मधोमध असूनही आजपर्यंत ग्रामस्थांनी या देवीची पूजा-अर्चा सुरू ठेवली आहे.कुंकू आणि गुलाल अर्पण करून देवीप्रती श्रद्धा व्यक्त केली जाते.ब्रिटिशकालीन रेल्वे मार्ग उभारताना देखील गावकऱ्यांच्या श्रद्धेचा विचार करून मूर्ती त्याच ठिकाणी ठेवण्यात आल्याचे सांगितले जाते.

विस्तारीकरणामुळे मूर्तीच्या सुरक्षिततेचा प्रश्न

सध्या रेल्वेच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाचे काम सुरू असल्याने मूर्तीला संभाव्य धोका निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर डॉ. सुधीर लिंगे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास हा विषय आणून दिला आहे. पुरातत्त्व विभागाने मूर्तीचे ऐतिहासिक महत्त्व तपासून तिच्या संरक्षणासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.

मूर्ती हलवू नका, आधी संरक्षणाचा विचार करा

ग्रामपंचायतीने ठराव घेऊन जिल्हाधिकारी, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग आणि मध्य रेल्वेच्या नागपूर विभागीय व्यवस्थापकांकडे निवेदन सादर करावे,अशी भूमिका मांडण्यात येत आहे. मूर्तीभोवती संरक्षक कठडा किंवा कंपाउंड उभारणे,रेल्वे मार्गाच्या आखणीत आवश्यक बदल करणे, असे पर्याय सुचविण्यात आले आहेत.

दहेगावची ही मूर्ती केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून गावाच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ओळखीचा भाग आहे. रेल्वेचा विकासही व्हावा आणि शेकडो वर्षांचा वारसाही सुरक्षित राहावा, यासाठी रेल्वे प्रशासन, पुरातत्त्व विभाग आणि ग्रामस्थांनी समन्वयातून मार्ग काढण्याची गरज आहे. अन्यथा विकासाच्या विस्तारात इतिहासाची ही अमूल्य साक्ष हरवण्याची भीती ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३३३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जाहीर नोटीस
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती

क्रमांक/न.भू-१/अपील अर्ज क्र.३०८७/२०२६ अमरावती, दिनांक २६/१०/२०२६

प्रति,
भाऊराव राजाराम मगरे,
रा.जामठी गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती — अपिलार्थी

विरुध्द

१) उपअधिक्षक भुमी अभिलेख, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
२) नारायण जगन्नाथ कुंभारे, रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
३) सुमन वासुदेवराव थकीते, रा.जामठी गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती
४) लक्ष्मीबाई जगन्नाथ कुंभारे,रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
५) कमला नत्थुजी दुधकवरे, रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
६) बेबी नामदेव बोरीवार, रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
७) रेखा नत्थुजी बोरीवार, रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
८) रत्नमाला ईश्वर वाघोडे, रा.जामठी गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती
९) इंदिरा विजय राऊत, रा.जामठी गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती
१०) माधो जंगल्या वाडबुध्दे,रा.जामठी गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती
११) सुरेश परशराम ढोरे,रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
१२) विष्णु परशराम ढोरे,रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
१३) सुरेश मनाजी खवसे, रा.जामठी गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती
१४) महेंद्र सिताराम कनिरे, रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
१५) उमेश सिताराम कनिरे, रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
१६) लक्ष्मण हरिभाऊ कनिरे, रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
१७) शंकर हरिभाऊ कनिरे, रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती
१८) सिताराम हरिभाऊ कनिरे, रा.मोवाड, ता.वरुड, जि.अमरावती — उत्तरार्थी

विषय :- मौजा जामठी गणेशपुर, ता.वरुड जि, अमरावती येथील गट नं.४४७, ४४८, ४४९, ४५० जुना सव्हे नंबर १४३ चे बाबत अपिल अर्ज
संदर्भ :- अपिलार्थी यांचा अपिल अर्ज दिनांक २४/०३/२०२६

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे जामठी गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती येथील गट नं.४४७, ४४८, ४४९, ४५० जुना सर्वे नंबर १४३ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसलेमुळे उत्तरार्थी यांना याव्दारे कळविण्यात येते की, दिनांक २५/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २६/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का

सही/-
(महेशकुमार शिंदे)
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख
अमरावती

जाहीर नोटीस
विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५२५/२०२६ ने.ता.०७.१२.२०२६

अर्जदार :
१. शोभा साहेबराव भुस्कडे, वय ७५ धंदा - घरकाम
२. प्रविण साहेबराव भुस्कडे, वय ४९ धंदा - शेती व वकिली
३. स्मिता सुधीर कळसकर, वय ४७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार नं.१ व २ रा.हिरुरपुर्णा (सर्फाबाद) ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.३ रा.देशमुखपुरा अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत साहेबराव व्यंकटराव भुस्कडे** यांचा मृत्यू दिनांक **०७.०९.२०२६** रोजी डॉ.पंजाबराव मेडिकल कॉलेज रुग्णालय, अमरावती, ता.जि.अमरावती येथे झालेला असून ते कायमचे हिरुरपुर्णा सर्फाबाद ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५२५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२९.१०.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

वि.ए.बी.कट्टे साहेब न्यायदंडाधिकारी, प्र.श्रेणी, अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०१)

मि.की.अर्ज क्र.११४२/२०२६ ने.ता. . .२०२६

जाहीर नोटीस

अर्जदार : १. ममता विजय कळमकर, वय ५९ वर्षे, रा.सम्यक-१०९, बालाजी प्लॉट ह.व्या.प्र.मंडळ रोड, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी अधिकारी, म.प.पा.अमरावती ता.जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम (१३)(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार ममता विजय कळमकर यांनी ममता विजय कळमकर यांच्या जन्माची नोंद दिनांक १२.०५.१९६७ रोजी झाली आहे. अशी नोंद करणेचाहुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेलाआहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.१ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक १९.११.२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०१ पुढील योग्य तो हुकूम करतील याची नोद घ्यावी.

शिक्का

आदेशानुसार,
क.लिपीक
सह दिवाणी न्यायालय,(क.स्तर)
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२९३/२०२६
उज्वला अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.०३.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Smt.Ujjawala Rajesh Bhuyar, Aged 50 Yrs. Occu.: Housewife
2. Madhav Rajesh Bhuyar, Aged 27 Yrs. Occu.: Business
3. Ku.Vaishanavi Rajesh Bhuyar, Aged 20 Yrs. Occu.: Education
All R/o Satyadeo Park Colony, Near Holly Wood Colony, VMV, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Rajesh Shiligramji Bhuyar हे दिनांक 10.09.2026 रोजी **मुर्तिजापूर** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Ujjawala Rajesh Bhuyar + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Ujjawala Rajesh Bhuyar + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

जाहीर नोटीस
दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५ नियम २० अंतर्गत
मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

सहदेव सवई
वि
रामा शामरावजी सवई

नि.दि.दा.क्रं.३/२०१९ नेमलेली तारीख- २०/११/२०२६

प्रतिवादी नामे -
१. दिगांबर गंगाराम ढोके, रा.एकता नगर, सीएचएस गणेश नगर जवळ, चारकोप कोदेवली मुंबई वेस्ट, ता.जि. मुंबई
२. संतोष दिगांबर ढोके, रा.एकता नगर, सीएचएस गणेश नगर जवळ, चारकोप कोदेवली मुंबई वेस्ट, ता.जि. मुंबई
३. लता श्रीकृष्ण तायडे, रा.म्हाडा कॉलनी, साकीनाका पोलीस स्टेशन जवळ, साकीनाका मुंबई, ता.जि.मुंबई
४. पिंकी विलास लोंढे, रा.फलॅट नं.२४, रुम नं. २८, गाडा नं. ३ एन.सी.सी.मालवानी कॉलनी, मालाड वेस्ट, मुंबई, ता.जि.मुंबई

न्यायालयाच्या समाधानासाठी हे सिध्द झाले आहे की, वर उल्लेख केलेल्या प्रतिवादी नामे यांना नियमित नोटीस पाठविली असता त्या तामिल होत नाहीत म्हणुन आदेश ५ नियम २० सिपीसी अंतर्गत ही घोषणा त्याच्या विरुध्द जारी करण्यात येत आहे आणि त्यांना २१/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वैयक्तीकरित्या किंवा त्यांच्या वकिलामार्फत दिवाणी न्यायालय नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती येथे हजर राहावे.

लक्षात ठेवा की, जर तो/ती आधी उल्लेख केलेल्या दिवशी हजर राहिली नाहीत तर, वरील प्रकरणाची सुनावणी त्यांच्या अनुपस्थित कायद्यानुसार केली जाईल आणि निर्णय त्यांच्या गैरहजेरीमध्ये दिला जाईल.

संबंधिताची स्वाक्षरी आणि शिक्क्यानिशी शेरा नोंदवावा.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा.दिवाणी न्यायालय नांदगाव खंडेश्वर

जाहीर नोटीस
विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.५२४/२०२६ **ने.ता.०३.१२.२०२६**

अर्जदार :
१. **वेद प्रदीपराव टेकाडे,** वय २६ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
२. **सुनिता प्रदीपराव टेकाडे,** वय ५९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
३. **वैष्णवी प्रदीपराव टेकाडे,** वय ३२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
सर्व रा. धर्माळपुरा, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि. अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक प्रदीप पांडुरंग टेकाडे** यांचा **मृत्यू दि.०२/०७/२०१०** रोजी **डॉ. सावदेकर हॉस्पिटल,अमरावती, ता.जि.अमरावती** येथे झालेला आहे. तसेच मृतक पांडुरंग खुशालराव टेकाडे यांचा मृत्यू दि. ०९/०१/२००७ रोजी चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५२४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२६.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

जाहीर नोटीस
विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५२९/२०२६ ने.ता.०७.१२.२०२६

अर्जदार :
१. शिलाताई हरिदास राऊत, वय ६९ धंदा - घरकाम
२. आशिष हरिदास राऊत, वय ४५ धंदा - व्यापार
३. अश्विनी निलेश अतकरे, वय ४२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
४. अंकुश हरिदास राऊत, वय ४० वर्षे, व्यवसाय - नोकरी
अर्जदार नं.१ व २ रा.रा.शिवाजी नगर प्रल्हादपूर चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.३ रा.५०२, बिल्डीग नं.१ माल्वनी भक्तिधाम, सीएचएस म्हाडा एकता नगरचे बाजुला सीएसआर कॉम्प्लेक्स, कांदिवली मुंबई वेस्ट
अर्जदार नं.४ रा.२४०१, अष्टविनायम, एफ-५८, न्यू म्हाडा टॉवर, शिवाजी राजे कॉम्प्लेक्स एकता नगर समोर, मुंबई उपनगर मुंबई

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत हरिदास तुळशिरामजी राऊत** यांचा मृत्यू दिनांक **०८.१०.२०२६** रोजी प्रल्हादपूर शिरजगांव बंड, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५२९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२९.१०.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

जाहीर नोटीस
विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५२२/२०२६ ने.ता.०३.१२.२०२६

अर्जदार : १. गजानन ओंकारराव पोहोकार
वय ६४ धंदा - शेती
रा.जालनापूर, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत ओंकारराव रुपराव पोहोकार** यांचा मृत्यू दिनांक **२९.१०.२०२०** रोजी तसेच **मृतक नानुबाई ओंकारराव पोहोकार** हिचा मृत्यू दिनांक **०४.०१.२०२१** रोजी जालनापूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५२२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२६.१०.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

प्रो.क्र.७५५/२०२६

वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस
विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्रमांक २८२/२०२६ ने.ता.०१.१०.२०२६

अर्जदार :
1. Raghunath Rupraoji Kalaskar, Age 67 Yrs. Occu.: Agril.
2. Rambhau Ruprao Kalaskar, Age 62 Yrs. Occu.: Agril.
3. Santosh Ruprao Kalaskar, Age 53 Yrs. Occu.: Agriculturist
4. Nalini Devidasrao Dhengakar, Age 72 Yrs. Ocu.: Housewife
Appli.No.1 to 4 R/o Mu.Sawarkheda, Po.Haturna, Tq.Bhatkuli, Dist.Amravati
5. Rajkanya Vijayrao Rawaskar, Age 68 Yrs. Occu.: Housewife R/o Rajput Pura, Tq.Daryapur, Dist. Amravati.
6. Malutai Suresh Yavatkar, Age 68 Yrs. Occu.: Housewife R/o Chhatrasal Nagar, VMV Amravati.
7. Meera Shankar Kharapkar, Age 50 Yrs. Occu: Housewife R/o Mu.Takarkheda Purna, Po.Asegaon Purna, Tq.Chandur Bazar, Dist.Amravati

-- विरध्द --

गैरअर्जदारः निरंक

ज्यापेक्षा Ruprao Sitaram Kalaskar हे दि.**०४.११.२०२२** रोजी मयत झाले. अर्जदार Rabhunath Rupraoji Kalaskar, Age 67 Yrs. Occu.: Agriculturist, R/o Sawarkheda, Po.Haturna, Tq.Bhatkuli, Dist. Amravati. व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**१९.०८.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत Ruprao Sitaram Kalaskar यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत Ruprao Sitaram Kalaskar यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २१.०८.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

जाहीर नोटीस
दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५ नियम २० अंतर्गत
मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

नानासाहेब मोहोकार
वि
मनोहर मोहोकार

नि.दि.दा.क्रं. २९/२०२० नेमलेली तारीख- २०/११/२०२६

प्रतिवादी नामे - १. मोरेश्वर गुणवंत मोहकार रा.महाविर नगर गोपाल नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

न्यायालयाच्या समाधानासाठी हे सिध्द झाले आहे की, वर उल्लेख केलेल्या प्रतिवादी नामे यांना नियमित नोटीस पाठविली असता त्या तामिल होत नाहीत म्हणुन आदेश ५ नियम २० सिपीसी अंतर्गत ही घोषणा त्याच्या विरुध्द जारी करण्यात येत आहे आणि त्यांना २०/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वैयक्तीकरित्या किंवा त्यांच्या वकिलामार्फत दिवाणी न्यायालय नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती येथे हजर राहावे.

लक्षात ठेवा की, जर तो/ती आधी उल्लेख केलेल्या दिवशी हजर राहिली नाहीत तर, वरील प्रकरणाची सुनावणी त्यांच्या अनुपस्थित कायद्यानुसार केली जाईल आणि निर्णय त्यांच्या गैरहजेरीमध्ये दिला जाईल.

संबंधिताची स्वाक्षरी आणि शिक्क्यानिशी शेरा नोंदवावा.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा.दिवाणी न्यायालय नांदगाव खंडेश्वर

जाहीर नोटीस
विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.५२८/२०२६ **ने.ता.०३.१२.२०२६**

अर्जदार :
१. **संजय अन्ना उटाळे,** वय ५६ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. **सतिश अन्ना उटाळे,** वय ५४ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. **संदीप अन्नाजी उटाळे,** वय ४४ वर्षे, व्यवसाय - मजुरी
४. **अजय अन्नाजी उटाळे,** वय ३८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
सर्व अर्जदार रा.चांदूर बाजार,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक अन्ना गंगाराम उटाळे** यांचा **मृत्यू दि.१९/०७/२००९** रोजी तसेच **मृतक पंचफुला अन्ना उटाळे हिचा मृत्यू दि.१७/०५/२०१२** रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५२८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२६.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर,३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२५९/२०२६
निर्मला अधिक तीन -वि- निरंक
पुढील ता.३०.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Nirmala Panjabrao Lanjewar, Aged 66 Yrs. Occu.: Household
2. Nilesh Panjabrao Lanjewar, Aged 44 Yrs. Occu.: Service
3. Shailesh Panjabrao Lanjewar, Aged 40 Yrs. Occu.: Pvt.Job
Appli.No.1 to 3 R/o Mangaldham Colony, Dastur Nagar, Rukhmini Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati
4. Suwarna Haridas Akhare, Aged 42 Yrs. Occu.: Household
R/o Plot NO.15, Khadgaon Road, Wadi, Nagpur

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Panjabrao Rajaramji Lanjewar हे दिनांक 24.02.2007 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Nirmala Panjabrao Lanjewar + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Nirmala Panjabrao Lanjewar + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

जाहीर नोटीस
विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५२०/२०२६ ने.ता.०३.१२.२०२६

अर्जदार :
१. अरविंद बळवंतराव लोंदे, वय ६२ धंदा - मजुरी
रा.वार्ड नं.६ आझाद चौक, खेल चौधर, करजगांव, ता.चांदूरबाजार, जि.अम.
२. संदीप बळवंतराव लोंदे, वय ५५ धंदा - मजुरी
रा.आझाद चौक, खेल चौधर, करजगांव, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
३. राजेश बळवंतराव लोंदे, वय ५४ वर्षे, व्यवसाय - मजुरी
४. रजनी शेषराव शेरेकर, वय ५९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार नं.३ व ४ रा.वार्ड नं.४, आझाद चौक, खेल चौधर, करजगांव, ता.चांदूरबाजार, जि.अम.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत बळवंतराव सखाराम लोंदे** यांचा मृत्यू दिनांक **११.१२.२०००** रोजी तसेच **मृतक देवकाबाई बळवंतराव लोंदे** हिचा मृत्यू दिनांक **२५.११.२०१२** रोजी खेल चौधर, करजगांव, ता.चांदूरबाजार, जि.अम. येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५२०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२६.१०.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७८४/२०२६
Rinku Ravindra Dhole+1 -Vs- Kevlyabai Ramkrishna Dhoke
पुढील ता.१३.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Rinku Ravindra Dhoke, Aged 32 Yrs. Occu.: Household
2. Nitesh Bharatlalji Gupta, Aged 07 Yrs. Occu.: Education
Applli.No.2 being minor through legal guardian mother i.e. Appli.No.1 Both R/o Shegaon Rahatgaon Road, Near Hanuman Mandir, Priyanka Colony, V.M.V. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Kevlyabai Ramkrishna Dhoke, Age 60 Yrs. Occu.: Household
R/o Shegaon Rahatgaon Road, Near Hanuman Mandir, Priyanka Colony, V.M.V. Amravati

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ravindra Ramkrishna Dhoke हे दिनांक 26.06.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Rinku Ravindra Dhole+1 -Vs- Kevlyabai Ramkrishna Dhoke यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rinku Ravindra Dhole+1 -Vs- Kevlyabai Ramkrishna Dhoke वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.०९.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

जाहीर नोटीस
विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५३१/२०२६ ने.ता.२६.११.२०२६

अर्जदार :
१. नरेंद्र लखनलाल अग्रवाल, वय ६७ धंदा - व्यापार
२. सुरेंद्र लखनलाल अग्रवाल, वय ६३ धंदा - व्यापार
३. शारदा गोकुलचंद अग्रवाल, वय ६२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
४. छाया राजेंद्रकुमार अग्रवाल, वय ६० वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार नं.१ रा.वैष्णवी टॉकीजजवळ, शिक्षक कॉलनी, चांदूरबाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.२ रा.जुना बैलसाथ, गुळसाथ,चांदूरबाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.३ रा.नवीन बस स्टॉप साईनगर, बसमत नगर, ता.बसमत नगर, जि.हिंगोली
अर्जदार नं.४ रा.जुनी पोस्ट ऑफिस लाईन, वरणगांव, ता.भुसावळ, जि.जळगांव

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत लखनलाल बबनलाल अग्रवाल** हे रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. त्यांचा मृत्यू दिनांक **१०.०५.१९७६** रोजी चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक गिताबाई लखनलाल अग्रवाल** ही रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. हिचा मृत्यू दिनांक **०५.०४.२०१८** रोजी चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. त्यामुळे मयत लखनलाल बबनलाल अग्रवाल व गिताबाई लखनलाल अग्रवाल यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५३१/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२९.१०.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर,३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७५६/२०२६
कमलाबाई अधिक तीन -वि- निरंक
पुढील ता.२५.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Kamalabai Ashok Jaiswal, Age 63 Yrs. Occu.: Household
2. Dhananjay Ashok Jaiswal, Age 26 Yrs. Occu.: Education
3. Tejaswini Ashok Jaiswal, Age 22 Yrs. Occu.: Education
Appli.No.1 to 3 R/o Saraswati Nagar, Near VMV, Amravati.
4. Vaishanvi Ashok Jaiswal @ Sau.Vaishanvi Amolkumar Jaiswal
Age 30 Yrs. Occu.: Household
R/o Mishra Line, Sardarbazar Paratwada, Tq.Achalpur, Dist.Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ashok Daduprasad Jaiswal हे दिनांक 09.04.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Kamalabai Ashok Jaiswal + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kamalabai Ashok Jaiswal + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी. क्र.१८७/२०२६ ने.ता.१८.११.२०२६

जाहीरनामा

अर्जदार : १. मिलिंद महादेव बनसोड
वय ५० वर्षे, धंदा - शेती
रा.येवती, नांदगांव खंडे., जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मिलिंद महादेव बनसोड** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **महादेव नथ्थू बनसोड** यांचा मृत्यू दिनांक **२१.१०.२०१६** रोजी मौजा येरड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक **२७ माहे ऑगस्ट २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय,
चांदूर रेल्वे

जाहीर नोटीस
विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५२७/२०२६ ने.ता.०७.१२.२०२६

अर्जदार :
१. नामदेव गोबाजी शनवारे, वय ५९ धंदा - शेती
२. चंदर गोबाजी शनवारे, वय ५५ धंदा - शेती
३. बाबु गोबाजी शनवारे, वय ५५ वर्षे, व्यवसाय - शेती
४. सोन्या गोबाजी शनवारे, वय ५१ वर्षे, व्यवसाय - शेती
५. कलाबाई राजू पाटील, वय ४८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार नं.१ ते ४ रा.घाटलाडकी पुनर्वसन ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.५ रा.मोथा, ता.चिखलदरा, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत गोबाजी रामाजी शनवारे** यांचा मृत्यू दिनांक **०४.०१.२०२६** रोजी घाटलाडकी पुनर्वसन ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५२७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२९.१०.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

जाहीर नोटीस
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती

क्र.न.भू.-१/अपील अर्ज क्र.३१३७/२०२६ अमरावती दिनांक २६.१०.२०२६

प्रति,
सौ.किरण शेखर विरुळकर
रा.कांता नगर, कॅम्प अमरावती, ता.जि.अमरावती — अपिलार्थी

-- विरुध्द --

१. उपअधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती, ता.जि.अमरावती
२. श्री.विनोद सुभाष गुलालकरी,
रा.रहाटगांव, अमरावती, ता.जि. अमरावती — उत्तरार्थी

विषय - मौजा रहाटगांव, ता.जि.अमरावती येथील शिट नं.२७५, प्लॉट नं.११५३० चे बाबत अपिल अर्ज
संदर्भ - अपिलार्थी यांचा अपिल अर्ज दिनांक २९.०४.२०२६

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे रहाटगांव, ता.जि.अमरावती येथील शिट नं.२७५, प्लॉट नं.११५३० चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरार्थी हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक ०४.११.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २६.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का

(महेशकुमार शिंदे)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख,
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ५६
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

संक्षिप्त

तनुजा बडगेची वैद्यकीय शिक्षणासाठी रशियाकडे भरारी!

शिराळा-नजिकच्या देवरी तालुका अमरावती येथील तनुजा मंदाताई शेखर बडगे ही वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ११ नोव्हेंबर रोजी रशियाला रवाना होणार आहे.चेक्रेस्क येथील उत्तर कॉकेशियन स्टेट अकेडमीमध्ये ती एम.बी.बी.एस चे शिक्षण घेणार असून तिच्या या वाटचालीमुळे कुटुंबिय आणि अमरावती येथील कौटुंबिक मित्रपरिवारात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण आहे. तनुजाने एम.बी.बी.एस चे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून एक कुशल आणि सेवाभावी डॉक्टर बनावे तसेच गरजु रुग्णांना मदत करुन समाजाच्या आरोग्यसेवेत योगदान द्यावे अशी अपेक्षा तिच्या आई वडिलांनी व्यक्त केली आहे. तिच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही उच्च शिक्षणासाठी प्रेरणा मिळेल. असा विश्वास व्यक्त होत आहे.तनुजाच्या रशियातील वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवासासाठी अमरावती येथील कौटुंबिक मित्रपरिवाराने तिला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.तिने शिक्षण पूर्ण करून भविष्यात उत्तम डॉक्टर बनावे आणि आपल्या कुटुंबासह अमरावतीचे नाव उज्ज्वल करावे. अशा सदिच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

कौंडण्यपूर येथे ज्ञानेश्वरी पारायणाची भक्तिमय सांगता

कुऱ्हा-श्री रुक्मिणी माता तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथील मंदिरात श्री संत आदिशक्ती मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगर, जिल्हा जळगाव (खानदेश) यांच्या वतीने ज्ञानेश्वरी पारायण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या धार्मिक कार्यक्रमात श्री ह.भ.प. रविंद्र महाराज हरणे, श्री संदीप महाराज मोतेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी ज्ञानेश्वरी पारायण सेवा केली. या चार दिवसीय कार्यक्रमामुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. पारायणाच्या माध्यमातून भाविकांना आध्यात्मिक चिंतनाची आणि संत साहित्याचा श्रवण करण्याची संधी मिळाली.कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी कीर्तन व काल्याचा कार्यक्रम पार पडला. यानंतर मंदिराच्या वतीने उपस्थित महाराजांचा तसेच भाविकांचा संस्थानचे अध्यक्ष अमाळकर आणि व्यवस्थापक गावंडे यांनी शाल व श्रीफळ देऊन स्वागत व सन्मान केला.महाप्रसादानंतर या चार दिवसीय धार्मिक कार्यक्रमाची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. या उपक्रमामुळे वारकरी संप्रदायातील भक्तिभाव, संत परंपरा आणि आध्यात्मिक विचारांचा प्रसार झाला.

साफल्य विद्यालयात वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा स्मृतिदिन

लेहेगाव-साफल्य विद्यालय,सावरखेड पिंगळाई येथे वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५८ वा स्मृतिदिन हा मानवता दिन म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र भी. सुळे, श्रीराम गुंजीटे, दर्शना कातलाम,प्रयोगशाळा परिचर राजेश मालपे, शिपाइ बि.ओ.ठाकूर यांनी वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हारअर्पण केले. वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा स्वातंत्र्य लढ्यातील उत्स्फूर्त सहभाग, जपान या देशांमध्ये सर्वधर्म परिषदेमध्ये भारताचे केलेले प्रतिनिधित्व, ग्रामगीता या पवित्र ग्रंथांमधून ग्रामोन्नतीचा केलेला प्रचार व प्रसार इत्यादी बाबत माहिती विद्यालयातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिली. तसेच विद्यार्थ्यांमधून अमित वानखडे,भविष्य फरकाडे,सिमरन फातेमा,आनंदी गवळी,प्रणिता आठवले,अक्षरा खंडारे,तन्मय खोब्रागडे,कार्तिक गवळी,रजत खडसे,रितेश भुंबर इत्यादींनी भाषणे दिली. या कार्यक्रमाचे संचालन आरुषी मीना तर आभार प्रदर्शन उन्नती काळबांडे यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रवंदनेने करण्यात आला.

अमोल उमप यांचे निधन

गुरुकुंज मोझरी-राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्राथमिक व माध्यमिक आदिवासी आश्रमशाळा, भोकरबर्डी येथील कर्मचारी तथा मोझरी येथील रहिवासी माजी पत्रकार अमोल उमप यांचे दिर्घ आजाराने अमरावती निवास येथे निधन झाले. ते ५३ वर्षाचे होते. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवातील कार्यक्रमांना लेखणीच्या माध्यमातून राष्ट्रसंतांचे विचार जनमानसापर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी पत्रकारीतेच्या माध्यमातून मोठे योगदान दिले होते. त्यांच्या पश्चात आई, दोन मुले व पत्नी आहे. त्यांच्या या निधनामुळे कुटुंबिय व समाजाची मोठी हानी झाली आहे.

विद्यार्थ्यांनी खेळभावना जपावी-डॉ.मिलींद बारहाते

आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेचे थाटात उद्घाटन, १३६ महाविद्यालयांमधील १२१४ खेळाडूंचा सहभाग

अमरावती/का.प्र.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग व आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेरा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेचे विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात तीन दिवस भव्य आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन २९ ऑक्टोबर रोजी कुलगुरू डॉ मिलींद बारहाते यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करुन झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सुभाष गावंडे, आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराचे प्राचार्य डॉ. राजेंद्र देशमुख, डॉ. विकास टोणे, डॉ. हेमंत देशमुख, ॲड. उदय देशमुख आदी उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले,विद्यार्थ्यांनी खेळाला महत्व देत खेळ भावना जपली पाहिजे.विद्यार्थ्यांनी कोणत्याही अंमली पदार्थाच्या आहारी जावू नये, तरच जीवन सफल होईल, असे सांगितले. प्रमुख अतिथी डॉ. सुभाष गावंडे यांनी खेळाकरिता सहनशीलता, ताकत आणि चपळता यांची आवश्यकता असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात.

पार्थ सावरकर, हर्ष मोहन, मुन्सिफ अली, वैभव गवई, स्वराज भोपळे, शामिक्षा आमझारे या खेळाडूंनी मशाल घेवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करण्यात आली. उद्घाटन झाल्याची घोषणा डॉ. हेमंत देशमुख यांनी केली.सर्व खेळाडूंनी 'खेळ, हे खेळ भावनेतून खेळू व खेळामध्ये अमली पदार्थांचा उपयोग करणार नाही',अशी यावेळी शपथ घेतली.

प्रास्ताविक पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी केले. संचालनै निखिल डोंगरे व ओम सिंग राजपूत यांनी, तर आभार ॲड. उदय देशमुख यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला विद्यापीठाशी संलग्नित पाचही जिल्हातील महाविद्यालयांचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक उपस्थित होते. या मैदानी स्पर्धेत विद्यापीठाशी संलग्नित १३६ महाविद्यालयातील १२१४ स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला आहे.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. प्रशांत शिंगवेकर, विभागातील शिक्षक डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे,डॉ. विजय निमकर,सविता बावनथडे, डॉ. सौरभ त्रिपाठी,डॉ. निलेश इंगोले तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

एमआयडीसी परिसरात शेतीपूरक उद्योगासाठी महिलांना एकदिवसीय प्रशिक्षण

तिवसा/वार्ताहर

प्रत्येक गावात शेतीपूरक उद्योग उभे व्हावेत व या माध्यमातून शेतकरी महिला आर्थिक सक्षम व्हाव्यात,यासाठी एका विशिष्ट योजनेची माहिती व एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर तिवसा येथील एमआयडीसी परिसरात झाले. मातोश्री महिला उद्योग समूह च्या माध्यमातून व आशा अतुल रामपुरे यांच्या विशेष पुढाकारातून हे शिबीर घेण्यात आले.या शिबिराला प्रमुख मार्गदर्शक म्हणून सीए दीपक झव,महिला बचत गट मार्गदशक म्हणून चवरे,लंगोटे आदी उपस्थित होते.

प्रत्येक महिलांना स्वतः च्या पायावर उभे करण्यासाठी, महिलांना आर्थिक सक्षम

बनविण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन आहे. यात महिलांना नाविन्यपूर्ण उद्योगाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी हा प्रोजेक्ट असल्याचे झंवर सरांनी सांगितले.ज्यामध्ये महिलांना उद्योगासाठी सबसिडी मिळून,त्यांना व्यवसायाच्या माध्यमातून रोजगार मिळवून देण्यासाठी हे सामाजिक कार्यकर्ते अतुल रामपुरे यांनी हे पाऊल उचलले आहे.यात ओला भाजीपाला वाळवून,त्यातील पाणी कमी करून तो निर्जलीकरण करून त्यानंतर तो डीहायड्रेशन करणे व उपयोगी अशी पावडर तयार करणारा हा शेती आधारित उद्योग आहे.या घरगुती लघुउद्योगाचे प्रशिक्षण व माहिती आज उपस्थित शेतकरी व बचतगटाच्या महिलांना देण्यात आली.या कार्यक्रमाचे आयोजन व आभार आत्मानंद जिनिंग चे अतुल रामपुरे यांनी केले.शिबिराला मोठ्या संख्येने बचतगटाच्या महिला उपस्थित होत्या.

> कोणत्याही वस्तूवर प्रक्रिया केली की त्याची किंमत वाढते.हा घरगुती प्रोजेक्ट जर प्रत्येक महिलेने गावातल्या गावात,आपल्या कामासोबत सुरू ठेवल्यास महिला तर समृद्ध होईलच,सोबतच बचतगट सुद्धा आर्थिक समृद्ध झाल्याशिवाय राहणार नाही.
>
> **अतुल रामपुरे,**
> सामाजिक कार्यकर्ते

२० वर्षीय मुलाचे मरणोत्तर नेत्रदान

अमरावती-रामपुरी कॅम्प, अमरावती येशील रहिवासी स्व.जतीन विजयकुमार वरंदानी (वय २०) यांचे निधन झाले. वरंदानी परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळले, परंतु अशाही परिस्थितीत वडील विजयकुमार वरंदानी यांनी आपला मुलगा जतीन वरंदानी यांचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीने मरणोत्तर नेत्रकमळ दान करून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली. त्याबद्दल वरंदानी कुटुंबियांचे आभार व्यक्त करण्यात आले. या सेवाभावी कार्यात वरंदानी परिवारातील आशिष लुल्ला, अंकुश नावानी तसेच वरंदानी परिवारातील इतर सदस्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. स्व. जतीन वरंदानी यांना श्रद्धांजली अर्पण केली.

'पाणी वाचवा,जीवन वाचवा' विषयावर व्याख्यान व जनजागृती

परतवाडा-भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' या विषयावर व्याख्यान व जनजागृती मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पाणी बचतीचे महत्त्व, जलसंवर्धनाची आवश्यकता आणि पाण्याचा योग्य वापर याविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल खांडेकर तसेच कार्यक्रमाच्या मार्गदर्शिका म्हणून राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी

डॉ. दयाश्री कोकाटे यांनी पाण्याचे मानवी जीवनातील महत्त्व विशद केले.

दिवसेंदिवस वाढणारी पाण्याची टंचाई, भूजल पातळीतील घट, पाण्याचा अपव्यय आणि जलप्रदूषण या समस्यांवर त्यांनी मार्गदर्शन केले. पावसाच्या पाण्याचे संकलन, पाण्याचा पुनर्वापर, नळांचा अनावश्यक वापर टाळणे, घरगुती पातळीवर पाण्याची बचत करणे तसेच जलस्रोतांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य असून पाण्याचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःपासून पाणी बचतीची सुरुवात करून समाजात जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले.'पाणी आहे तर जीवन आहे, पाणी वाचवा आणि भविष्य सुरक्षित करा' हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

श्रीसंत विठोबा महाराजांच्या ४९ वा प्रकटदिन महोत्सव उत्साहात

कुऱ्हा/वार्ताहर

कुऱ्हा नगरीचे ग्रामदैवत श्रीसंत विठोबा महाराज यांच्या ४९ व्या प्रकटदिन महोत्सवानिमित्त आयोजित शोभायात्रेने संपूर्ण कुऱ्हा नगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली. टाळ-मृदंगांचा गजर, भजन-कीर्तनाचा निनाद आणि संतांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. दहा दिवस चाललेल्या या महोत्सवाची गुरुवार, २९ ऑक्टोबर रोजी हजारो भाविकांच्या उपस्थितीत महाप्रसादाने उत्साहात सांगता झाली. श्रीसंत विठोबा महाराज यांच्या प्रकटदिनानिमित्त मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ग्रंथवाचन, काकडा आरती, हरिपाठ, कीर्तन, श्रीमद्भागवत कथा, होमहवन, गोवर्धन पूजा आणि काल्याच्या कीर्तनाचा समावेश होता. या धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



दर्शनासाठी भाविकांनी मंदिरात मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. शोभायात्रेदरम्यान विविध चौकांमध्ये सायखेडा भजनी मंडळ आणि विठोबा महाराज भजनी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारूड सादर करण्यात आले.भारूडाच्या माध्यमातून भक्ती आणि प्रबोधनाचा संदेश देण्यात आला. भजन, भारूड आणि महाराजांच्या जयघोषामुळे शोभायात्रेला विशेष रंगत आली. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता दहिहंडीचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर श्रीसंत विठोबा महाराज यांची महाआरती करण्यात आली.दुपारी २ वाजल्यापासून महाप्रसाद वितरणास सुरुवात झाली. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.धार्मिक कार्यक्रम भजन-कीर्तन, भारूड आणि शोभायात्रेच्या माध्यमातून भक्ती, परंपरा आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम या महोत्सवात पाहायला मिळाला.

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात राज्यस्तरीय संगीत कार्यशाळा उत्साहात

अमरावती/का.प्र.

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती येथील संगीत विभागा द्वारे नुकतीच 'रियाजाचे तंत्र' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय संगीत कार्यशाळा प्राचार्य डॉ मीनल भोंडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेचे उद्घाटन, उद्घाटक सुरमणी प्रा.कमल भोंडे, प्रमुख मार्गदर्शक पं.संजयजी पत्की जळगाव व जेष्ठ संगीत शिक्षिका प्रा. मंगला पेठे यांचे प्रमुख उपस्थितीत झाले. या कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना प.संजय पत्की यांनी सप्रयोग व्याख्यानातून धडे दिलेत.रियाज आणि अभ्यास यातील फरक स्पष्ट करून संगीत साधकाने दिवसातून चार तास रीयाज आठ तास अभ्यास आणि उर्वरित १२ तास चिंतन व मनन करावे असे त्यांनी सुचविले.दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत प.संजय पत्की यांनी संगीतातील विविध विषयावर सखोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. कार्यशाळेत मार्गदर्शन

करताना पंडित संजय पत्की म्हणाले की,शिकून शास्त्र कळते तर चोरून शिकल्याने तंत्र,जेवढे शिकून शिकता येत नाही तेवढे चोरून शिकता येते.जे व्हायचे ते होत जाते म्हणून करत राहणे महत्त्वाचे आहे.

कार्यक्रमाच्या उद्घाटक प्रा.सुरमणी कमल भोंडे यांनी कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याची घोषणा करून रियाजाचे तंत्र जाणून घेण्याची सुवर्णसंधी प्राप्त करून दिल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले.कार्यशाळेच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी संगीत विषयात रियाज अत्यंत महत्त्वाचा असतो असे प्रतिपादन करून रियाज ही संगीतसाधना आहे असे स्पष्ट केले. उद्घाटन सत्राचे संचालन जगदीश पाखरे एम.ए.संगीत भाग २ यांनी तर आभार प्रा.अमोल वाडवे यांनी केले. कार्यशाळेची रूपरेषा प्रस्ताविकाचे माध्यमातून प्रा. डॉ. जगन्नाथ इंगोले संगीत विभाग प्रमुख यांनी विशद केली.पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. सोनाली आसरकर, संगीत विभाग यांनी तर कार्यशाळेत सहभागीचे आभार प्रा.डॉ गजानन काळे संगीत विभाग, यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संगीत विभागातील विद्यार्थी चैतन्य बुढकर, समर्थ पाठक,मेघा वनवे, स्वरश्री केतकर, ईश्वरी देशमुख, तनुश्री देशमुख इत्यादी विद्यार्थ्यांनी आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.या कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक,शिक्षक व संगीत कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी,येथे जिल्हास्तरीय 'आविष्कार २०२६'

नवकल्पना, संशोधन आणि सर्जनशीलतेचा संगम

अकोला-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रायोजित जिल्हास्तरीय 'आविष्कार २०२६' स्पर्धेचे आयोजन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, बाभूळगाव, अकोला येथे करण्यात आले. या स्पर्धेत अकोला जिल्ह्यातील विविध वरिष्ठ महाविद्यालयांमधील एकूण १२० संघांनी सहभाग नोंदविला. सुमारे १९० विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधन प्रकल्पांचे, नाविन्यपूर्ण कल्पनांचे तसेच शैक्षणिक संशोधनाचे सादरीकरण करून आपली गुणवत्ता प्रदर्शित केली.

'आविष्कार २०२६' ही स्पर्धा सहा प्रमुख विषयगटांमध्ये आयोजित करण्यात आली. यामध्ये मानवविद्या, भाषा व ललित कला; वाणिज्य, व्यवस्थापन व विधी; शुद्ध विज्ञान; कृषी व पशुसंवर्धन; अभियांत्रिकी व तंत्रज्ञान; तसेच वैद्यक व औषधनिर्माणशास्त्र या विषयांचा समावेश होता. ही स्पर्धा पदवी (UG), पदव्युत्तर (PG) आणि पदव्युत्तर संशोधन (PPG) अशा तीन स्तरांवर आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आविष्कार २०२६ चे अकोला जिल्हा समन्वयक डॉ. पंकज अर्डक यांनी उद्घाटन समारंभात प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी अकोला जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतून सहभागी झालेल्या विद्यार्थी स्पर्धकांचे तसेच महाविद्यालयीन समन्वयकांचे स्वागत केले. संशोधन, नवकल्पना आणि सर्जनशीलतेचे महत्त्व अधोरेखित करून त्यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या सादरीकरणासाठी आणि स्पर्धेतील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

उद्घाटन समारंभाला एल. आर. टी. महाविद्यालय, अकोला येथील प्राध्यापक डॉ. वर्षा सुखदेवे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत थोरात होते. यावेळी विविध विभागांचे प्रमुख डॉ. श्रीकांत सातारकर, डॉ. गोपाल झामरे, डॉ. रश्मी टाले, डॉ. अभिनंदन गुप्ता, डॉ. सुधीर ढोमणे, डॉ. प्रेम भनावत आणि प्रा. सौरभ सोनखास्कर उपस्थित होते.

महाविद्यालयाचे इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन विभागप्रमुख प्रा. गजानन भारसाकळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून सहभागी विद्यार्थ्यांना संशोधन, नवकल्पना आणि उद्योजकतेचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रशांत थोरात यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून संशोधनवृत्ती जोपासण्याचे आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे आवाहन केले.प्रमुख अतिथी डॉ.वर्षा सुखदेवे यांनी संशोधन आणि विकासासाठी सातत्यपूर्ण परिश्रम,समर्पण, सर्जनशीलता आणि तार्किक विचारशक्ती ही आवश्यक कौशल्ये असल्याचे प्रतिपादन केले. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना डॉ.श्रीकांत सातारकर,डॉ. गोपाल झामरे आणि प्रा. गजानन भारसाकळे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

डॉ. मनीषा कोडापे, विद्यापीठ समन्वयक, आविष्कार २०२६ यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली डॉ. पंकज अर्डक यांनी अकोला जिल्हा समन्वयक म्हणून स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी पार पाडली.

त्यांच्या समन्वयातून स्पर्धेचे नियोजन आणि आयोजन यशस्वीरीत्या करण्यात आले.उद्घाटन समारंभाचे संचालन प्रा. शर्वरी दीक्षित यांनी, तर पारितोषिक वितरण समारंभाचे संचालन प्रा. शारदा देशमुख यांनी केले.या उपक्रमासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख, संस्थेचे सर्व सन्माननीय कार्यकारिणी सदस्य तसेच स्थानिक व्यवस्थापन पदाधिकारी यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. शशिकांत ठाकरे, प्रा.ऋतुजा देशमुख,प्रा. विजय कोकाटे,प्रा. धीरज दांडेकर,प्रा.राधिका राऊत,प्रा.अक्षय काळमेघ,प्रा. सुधीर ढोमणे, प्रा. महेश पुंडकर, प्रा. अमित खेडकर,प्रा. चेतना भगत, प्रा. वेद कुलट,विठ्ठल ढोबळे,महेंद्र पिठे आणि सारंग काकड यांनी मोलाचे योगदान दिले. सर्वांनी आपापल्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडून स्पर्धेच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

लाखो गुरुदेवभक्तांची राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना मौन श्रद्धांजली!

श्री क्षेत्र गुरुकुंज मोझरीत शिस्तबद्ध व नयनरम्य सोहळा संपन्न



तिवसा/प्रतिनिधीः- 'मज वेडचि गुरुकुंजा'चे याची प्रचिती आज ३० ऑक्टोबर रोजी श्री क्षेत्र गुरुकुंज मोझरीत येथे आली.मानवतेचे महान पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना मौन श्रद्धांजली अर्पण करण्याकरिता श्री क्षेत्र गुरुकुंज मोझरीत आज सकाळपासून दाखल झालेल्या गुरुदेवभक्तांची हजारोंची संख्या केव्हा लाखात गेली हे लक्षातच आले नाही. आज ठीक ४ वाजून ५८ मिनिटाच्या या मौन श्रद्धांजली कार्यक्रमाला लाखो गुरुदेवभक्तांनी उपस्थिती दर्शवून महाराजांना साश्रूनयनांनी श्रद्धांजली अर्पण केली.येथील श्रीगुरुदेव विद्यामंदिराचे प्रांगणच नव्हे तर मुख्य सभा मंडपाचा आजूबाजूचा परिसर,महासमाधी परिसर, आश्रमिय परिसर अक्षरशः खचाखच भरून गेले होते.असे असतानाही येथील शिस्तीचा अनुभव हा वाखाणन्याजोगा आहे.

अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाच्यावतीने गुरुकुंज आश्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या मौन श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात राज्यातून आलेल्या लाखो गुरुदेव भाविकांनी दुपारी ४ वाजून ५८ मिनिटांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना साश्रूनयनांनी मौन श्रद्धांजली अर्पण केली. संपूर्ण भारतात संत महात्म्याला शिस्तबद्धरित्या लाखो भाविक उपस्थित राहून एकाचवेळी मौनश्रद्धांजली अर्पण करण्याचा हा देशातील एकमेव कार्यक्रम असून मौन श्रद्धांजलीच्या अर्थात मानवतादिन या कार्यक्रमाच्या नियोजनाची अनेकांनी प्रशंसा केली आहे.

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे महानिर्वाण मराठी पंचगानुसार अश्विन वद्य पंचमीला (इंग्रजी पंचगानुसार शुक्रवार ☞(पान २ वर)

दोन तास लाखोचा जनसमुदाय ध्यानस्थ-

सुमारे दोन तास लाखोचा जनसमुदाय राष्ट्रसंतांच्या विश्वात्मक व कार्याचा त्यातून भासणाऱ्या दिव्यत्वाचा अनुभव घेत ध्यानस्थ बसला होता. महाद्वारावरील विशाल घंटेचा निनाद होताच ठिक ४ वाजून ५८ मिनिटांनी शिस्तबद्धरितीने लाखो गुरुदेव भक्तांनी राष्ट्रसंतांच्या महासमाधी स्थळाच्या दिशेने हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजलीच्या कार्यक्रमानंतर राष्ट्रवंदना तसेच आरती झाली. जागतिक स्तरावर धर्मवाद वाढला असून मानवतेचा बळी जाऊन सर्वत्र हिंसाचार वाढला आहे. त्यामुळे या पुण्यतिथी महोत्सवात आम्ही सामुहिक प्रतिज्ञा करतो की, या जागतिक धर्मवादाच्या विरोधात सर्व धर्मपंथातील भाविक प्रतिज्ञा घेतो की, समानता व मानवतेचा झंडा उंचावण्यासाठी सामुदायिक प्रार्थनेच्या माध्यमातून जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू या,अशी प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच यावेळी हिंदु, मुस्लिम, बौद्ध, जैन, ख्रिश्चन अशा सर्व धर्माच्या प्रार्थना त्यांच्या धर्मगुरुंकडून करण्यात आल्या.

हा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी काहीवेळासाठी राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक थांबविण्यात येउन यात्रेतील दुकाने, भोंगे काही वेळाकरिता बंद करण्यात आल्यामुळे सर्वत्र निरव शांतता पसरली होती. निरव शांततेत अतिशय शिस्तबद्धतेने मौन श्रद्धांजलीचा भावपूर्ण सोहळा पार पडला. यावेळी श्रीगुरुदेव सेवामंडळाचे संचालक मंडळ अध्यक्षा पुष्पा बोंडे, संचालक कीर्तीकुमार भांगडीया, सर्वाधिकारी प्रकाश वाघ, उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, सरचिटणीस जनार्दन बोथे, प्रचार प्रमुख गोपाल कडू, श्रीगुरुदेव सेवामंडळाचे राज्यातील आजीवन, जीवन शाखा प्रमुख, सर्व प्रचारक, कार्यकर्ते तसेच अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे,वर्धेचे खासदार अमर काळे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रताप अडसड,माजी मंत्री यशोमती ठाकुर, रविराज देशमुख,नितेश कराळे, नाना महाराज, ॲड. सचिन देव, रामप्रियाजी, विजयादेवी, आरती वानखडे, प्रहारचे संजय देशमुख, डॉ रघुनाथ वाडेकर,इत्यादी धार्मिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील गणमान्य व्यक्ती प्रामुख्याने उपस्थित होते. या श्रद्धांजलीच्या कार्यक्रमाचे नियोजन आध्यात्मिक विभाग प्रमुख डॉ. राजाराम बोथे यांनी केले.

मोबाइलवर संदेश अन् खात्यातून ४९ हजार गायब!

७२ वर्षीय वृद्धाला सायबर ठगांचा फटका

अमरावती/प्रतिनिधीः- मोबाइलवर आलेल्या अनोळखी संदेशानंतर सुरू झालेल्या संपर्काचा शेवट आर्थिक फसवणुकीत झाला. पुष्कर कॉलनीतील ७२ वर्षीय उमेश मोरे यांच्या बँक खात्यातून ४९ हजार ९९९ रुपये ९२ पैसे परस्पर वळते करण्यात आले. गुरुवारी २९ ऑक्टोबर रोजी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांनी बँक आणि सायबर पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मोरे यांच्या मोबाइल क्रमांकावर रूपे अकाउंटसंदर्भातील माहिती असलेला संदेश आला होता. त्यानंतर एका अनोळखी व्यक्तीचा फोनही आला. मात्र, मोरे यांनी संबंधित व्यक्तीशी बोलणे टाळत कॉल कट केला. त्यानंतर ते झोपी गेले.

दुपारी सुमारे २.३० वाजता त्याच व्यक्तीचा पुन्हा फोन आला. यावेळी मोरे यांनी स्पष्टपणे बोलण्यास नकार देत आपल्याला संपर्क करू नये, असे सांगून फोन बंद केला. त्यानंतर काही वेळ सर्व काही ☞(पान २ वर)

आमदाराच्या कार्यालयातून शासकीय कागदपत्रे चोरी

नागरिकांची निवेदने, सीसीटीव्हीचा डीव्हीआर लंपास!

दर्यापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे यांच्या जनसंपर्क कार्यालयालाच चोरट्यांनी लक्ष्य केल्याने दर्यापूर शहरात खळबळ उडाली आहे. कार्यालयातील शासकीय कागदपत्रे, नागरिकांनी विविध कामांसाठी दिलेली निवेदने तसेच सीसीटीव्ही यंत्रणेचा डीव्हीआर चोरून नेण्यात आल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, चोरट्यांनी सीसीटीव्ही यंत्रणेची तोडफोड करून डीव्हीआरच लंपास केल्याने या चोरीमागील उद्देशाबाबत अनेक तर्कवितर्क व्यक्त होत आहेत. या प्रकरणी दर्यापूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.

आमदार कार्यालय हे सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या आणि तक्रारी मांडण्याचे महत्त्वाचे केंद्र आहे. विविध शासकीय कामे, विकासकामे, रस्ते, पाणी, विज, आरोग्य तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात नागरिकांकडून या कार्यालयात निवेदने दिली जातात. मात्र, याच कार्यालयातून नागरिकांची निवेदने आणि महत्त्वाची कागदपत्रे चोरीला जाणे ही गंभीर बाब मानली जात आहे.

या घटनेतील सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे सीसीटीव्ही यंत्रणेचा डीव्हीआर चोरून नेण्यात आला आहे. कार्यालयात चोरी करण्यासाठी आलेल्या चोरट्यांनी सीसीटीव्ही यंत्रणेची तोडफोड करून डीव्हीआर ☞(पान २ वर)

तुरीला पाणी देताना तरुणाचा संशयास्पद मृत्यू

चांदूरबाजार/प्रतिनिधी- चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या बेलोरा ते चांदूरबाजार मार्गावर जगदंबा शाळेजवळ शेतात तुरीला पाणी देत असताना एका २५ वर्षीय युवकाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना घडली. अर्पित विजय माहोरे (रा. वाडेगाव माहोरे) असे मृत युवकाचे नाव असून, तो आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता.

अर्पितने काही वर्षांपूर्वी बेलोरा येथे नातेवाईकांच्या मदतीने सुमारे १४ ते १६ एकर शेती घेतली होती. आज दुपारी दीड वाजताच्या सुमारास तो शेतातील तुरीला पाणी देत असताना तुरीच्या ओळीत मृतावस्थेत आढळला. त्याच्या छाती व पोटावर जळालेले ठिपके आढळून आले. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी तो पाणी देत होता त्या भागात कोणताही इलेक्ट्रिक पोल, स्टार्टर किंवा डीपी नव्हती. वीजप्रवाह नसतानाही त्याला शॉक लागल्याचा संशय व्यक्त होत असून, या प्रकरणात घातपाताची दाट शक्यता लोकांमध्ये चर्चिली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच चांदूरबाजारचे पोलीस ठाणेदार आधारसिंह सोनवणे, एपीआय प्रेमकुमार केदार, पंकज कांबळे आणि रोशन चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. ☞(पान २ वर)

अवैध रेतीसाठा आणि ट्रक जप्त!

दोघांना अटक, दोन आरोपी फरार

अमरावती/प्रतिनिधीः- शहरात अवैधरित्या रेतीची चोरी करून वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध अमरावती शहर गुन्हे शाखेने कारवाईचा बडगा उगारला आहे. गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राजपूत ढाबा ते लालखडी रोडवरील व्हॅली लॉनजवळ अवैध रेतीची वाहतूक करणारा १४ चाकी ट्रक पकडण्यात आला. या कारवाईत २२ लाख रुपये किमतीचा ट्रक आणि १ लाख ८०० रुपये किमतीची अंदाजे ५६ टन रेती असा एकूण २३ लाख ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी चौघांविरुद्ध ☞(पान २ वर)

ई-बाइक डिलरशिपचे आमिष; १.७७ लाखांची फसवणुक

कंपनीच्या वेबसाइटवरील जाहिरातीवर विश्वास महागात

अमरावती/प्रतिनिधीः- व्यवसायाचा विस्तार करण्याची संधी शोधताना एका व्यावसायिकाला ऑनलाइन फसवणुकीचा फटका बसला. ई-बाइकची डिलरशिप मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडून १ लाख ७७ हजार रुपये उकळण्यात आले. अर्ज मंजूर झाल्याचा ई-मेल आणि पेमेंट इनव्हाइस मिळाल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे व्यावसायिकाच्या लक्षात आले. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी गुरुवारी २९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केला आहे. नवाथे प्लॉट येथील रहिवासी सुदर्शन झंवर (वय ३९) हे ई-बाइक विक्रीचा व्यवसाय करतात. व्यवसायाचा विस्तार करून अमरावतीमध्ये नवीन डिलरशिप सुरू करण्याच्या उद्देशाने ते प्रयत्नशील होते. याचदरम्यान त्यांना एका ☞(पान २ वर)

एमआयडीसीत बिबट्याचा धुमाकूळ

दोन दिवस एकाच दालमिलमध्ये शिरकाव!

कुत्र्याची शिकार,सीसीटीव्हीत थरारक हालचाली कैद

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील औद्योगिक वसाहत असलेल्या जुना बायपास रोडवरील एमआयडीसी परिसरात बिबट्याने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. सलग दोन दिवस मध्यरात्री बिबट्याने एकाच दालमिलमध्ये शिरकाव केल्याने औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. पहिल्या दिवशी दालमिलमध्ये घुसून कुत्र्याची शिकार करणाऱ्या बिबट्याने दुसऱ्या दिवशी पुन्हा त्याच ठिकाणी हजेरी लावली. त्याच्या या मुक्त संचाराचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत कैद झाला असून, आता उद्योजकांसह कामगारांच्या जीवितसुरक्षेचा गंभीर प्रश्न ☞(पान २ वर)

आमदार गायकवाड यांचे पोस्टर जाळले

वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद,राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आंदोलन

अमरावती/प्रतिनिधीः- शेतकऱ्यांबद्दल बुलढाण्याचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचे शहरात तीव्र पडसाद उमटले. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या माजी खासदार फौजिया खान यांच्या नेतृत्वाखाली आज शुक्रवार ३० ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमदार संजय गायकवाड यांचे पोस्टर जाळण्यात आले. त्यांच्या विरोधात जोरदार घोषणा बाजी ही यावेळी करण्यात आली.आंदोलकांनी आमदार गायकवाड यांच्या पुतळ्याला जोड्यांनी मार देत पुतळा पेटवून तीव्र निषेध नोंदविला.

शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, नैसर्गिक संकटे, पिकांचे नुकसान आणि आर्थिक अडचणींशी झुंज देणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल लोक प्रतिनिधींनी जबाबदारीने वक्तव्य करणे अपेक्षित आहे. मात्र, आमदार संजय गायकवाड यांच्या वक्तव्यामुळे शेतकरी वर्गाचा अपमान झाल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली. आंदोलना दरम्यान संजय गायकवाड यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यांच्या वक्तव्यामुळे शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या असून, अशा प्रकारच्या वक्तव्यांना राजकीय स्तरावरही गांभीर्याने घेतले पाहिजे, ☞(पान २ वर)

देवडी रस्ता डांबरीकरणाच्या मागणीसाठी अचलपूरमध्ये बाजारपेठ बंद

अचलपूर/प्रतिनिधीः- अचलपूर शहरातील मुख्य रस्ता असलेल्या देवडी परिसरातील रस्त्याच्या दुरावस्थेमुळे त्रस्त झालेल्या व्यापाऱ्यांनी ३० ऑक्टोबर रोजी बाजारपेठ बंद ठेवत आक्रमक आंदोलन केले. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावर साचलेले खड्डे आणि उडणारी धूळ यामुळे त्रस्त व्यापारी वर्गाने रस्त्याचे तात्काळ तात्पुरत्या स्वरूपात डांबरीकरण करण्याची मागणी केली.

विधानपरिषद आमदार बच्चू कडू आणि नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी तातडीने आंदोलनस्थळी दाखल होत व्यापाऱ्यांशी संवाद साधला. प्रशासनाने लवकरात लवकर रस्त्याचे तात्पुरते डांबरीकरण करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आणि प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाल्यानंतर व्यापाऱ्यांनी आपले आंदोलन मागे घेत दुकाने पूर्ववत सुरू केली. या यशस्वी मध्यस्थीमुळे ☞(पान २ वर)

देवडी परिसरातील मुख्य रस्त्याचा कायापालट करण्यासाठी ३ वर्षापूर्वी निधी मंजूर करूनही स्थानिक नगर परिषद प्रशासनाकडून या रस्त्याचे काम अपूर्ण आहे. यामुळे नागरिक व व्यापाऱ्यांना विविध अडचणीचा सामना करावा लागत आहे.यासाठी नगर परिषद प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात उपाययोजना राबविण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे. लवकरच या रस्त्याचा रुंदीकरण साठी सर्व शासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार आहे.

-आमदार बच्चू कडू

चोरीच्या उद्देशाने फिरणारा संशयित ताब्यात

धामणगावील स्प्लेंडर दुचाकी जप्त

अमरावती/प्रतिनिधीः- चोरीच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका तरुणाला बडनेरा पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून धामणगाव रेल्वे येथून चोरीला गेलेली स्प्लेंडर दुचाकी, लोखंडी रॉड आणि मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० ऑक्टोबर रोजी पहाटे ४.५० वाजताच्या सुमारास बडनेरा परिसरात एक इसम चोरीच्या उद्देशाने वाहनासह फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे बडनेरा ☞(पान २ वर)

स्मृतीशेष रा.सु. उपाख्य दादासाहेब गवई स्मृती प्रवेशद्वाराचे लोकार्पण

दादासाहेबांची कारकिर्द दिपस्तंभासारखी प्रेरणा देणारी - आ.संजय खोडके

अमरावती/प्रतिनिधीः- दिवंगत रा.सु. उपाख्य दादासाहेब गवई हे देशाच्या राजकारणातील सर्वसमावेशक नेतृत्व होते, त्यांनी सामाजिक न्यायासाठी दीर्घकाळ लढा दिला. विधानपरिषदेचे आमदार, उपसभापती, खासदार व राज्यपाल अशा विविध पदांवर कार्यरत राहून त्यांनी लोक विकासाचे व सामाजिक परिवर्तनाचे कार्य केले. दादासाहेबांचे दारापुर येथील स्मारक अणि प्रवेशद्वार हे दादासाहेबांच्या प्रदीर्घ व झंझावाती कारकिर्दीची साक्ष देणारा एक दिपस्तंभ असून सर्वांना प्रेरणा देणारे असल्याचे प्रतिपादन विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी केले.

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व दिवंगत रा.सु. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या जयंती निमित्त आज शुक्रवार दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी, दारापूर, येथील अजातशत्रू व्यक्तिमत्व रा. सु. उपाख्य (दादासाहेब) गवई स्मारक प्रवेशद्वाराचा लोकार्पण सोहळा थाटात पार पडला. या प्रसंगी माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई, भारताचे माजी सरन्यायाधीश भुषण गवई, खासदार बळवंत वानखडे, रिपाईचे राष्ट्रीय महासचिव डॉ. राजेंद्र गवई, श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट,अमरावती अध्यक्ष कीर्तिताई गवई (अर्जुन) , ट्रस्टचे सचिव डॉ. कमलाकर पायस, प्राचार्य डॉ. डी.टी. इंगोले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते फित कापून प्रवेशद्वाराचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाला विविध शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, क्षेत्रातील मान्यवर व नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.